


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार ३० ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४




## बोगस पदवी रॅकेट प्रकरण : मास्टरमाईंडला नागपुरातून ठोकल्या बेड्या

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-** नामांकित विद्यापीठांच्या ५ ते १० लाख रुपयांत बनावट पदव्या व गुणपत्रिका विकणा-या रॅकेटच्या मास्टरमाईंडला पोलिसांनी नागपुरातून बेड्या ठोकल्या आहेत. परिमल बाबूराव गौरकर असं या आरोपीचं नाव आहे. त्याला नागपूरमधील हाटेलमधून पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. यासोबतच बनावट स्टॅम्प व कागदपत्रं तयार करणा-या त्याच्या नागपूरचा साथीदार अक्षय खोब्रागडे यालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. बुधवारी दुर्गापूर पोलिसांनी बनावट पदवी विक्री प्रकरणी वैभव सोनुले याला अटक केली. मात्र या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार परिमल गौरकर हा फरार होता.बनावट पदवी प्रकरणातील



मास्टरमाईंड अक्षय खोब्रागडे याच्याकडं कॅनाडातून मिळवलेली पीएचडी आहे. त्यानं ती ऑनलाइन शिक्षण घेउन मिळवल्याचा दावा केला आहे. मात्र ही पीएचडी खरंच ऑनलाइन शिक्षण घेउन मिळवली की रॅकेटचा वापर करून तयार केली, याबाबतचा तपास चंद्रपूर पोलीस करत आहेत.

**कुलगुरू म्हणतात, पदवी, कागदपत्रं बनावट-** दुर्गापूर पोलिसांनी जप्त केलेल्या सर्व पदवी, गुणपत्रिका व कागदपत्राबाबत ⇨(पान २ वर)

# कुंभमेळ्यासाठी बोगस बंपर भरती; अनेक बेरोजगारांना गंडा

**नाशिक/प्रतिनिधी-**कुंभमेळ्याच्या सुमारे साडे पाचशे कोटी रूपयांच्या बनावट वर्क ऑर्डरचे प्रकरण ताजे असतानाच आता भरतीच्या नावाने गंडा घालण्याचा प्रकार उघड झाला आहे. सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत आरोग्य विभागात बंपर भरती असल्याचा बनाव रचून बेरोजगार तरुणांची आणि शासनाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावर खोटी जाहिरात प्रसारित केल्याप्रकरणी हेल्पफोर्स फाउंडेशन मल्टी सर्व्हिस या संस्थेच्या अध्यक्षांसह तिघांवर नाशिकच्या पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वीच कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांच्या स्वाक्षरीच्या बनावट वर्क ऑर्डरचे प्रकरण नुकतेच उघड झाले. याप्रकरणी नाशिक, मालेगाव येथील पाच जणांवर गुन्हेही दाखल झाले आहेत. त्याचा तपास सुरू असतानाच नव्याने असा



प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यानंतर वरिष्ठांच्या सूचनेनुसार डॉ. योगेश चित्ते यांनी या प्रकरणी पंचवटी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यावरून संस्थेचा अध्यक्ष सचिन शिंदे (रा. देवळा), सचिव निलेश घोलप (रा. कळवण) आणि उपाध्यक्ष विक्रांत सूर्यवंशी (रा. पेठ रोड) या तिघा संशयितांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक (गुन्हे) सुनील पवार करीत आहेत. शासनाची कोणतीही अधिकृत परवानगी नसताना या भरतींची जाहिरात सोशल मीडियावर प्रसारित करून अनेक बेरोजगारांची दिशाभूल केल्याचे त्यातून स्पष्ट झाले.सदर कार्यालय गेल्या काही महिन्यांपासून या इमारतीत कार्यरत होते, कार्यालयाबाहेर असलेल्या फलकावर आरोग्यविषयक सेवा देण्याचा उल्लेख होता. मात्र ऑनलाइन जाहिरात करताना सिंहस्थाचा लोगो वापरल्याने त्याला भुलून काही नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क केला का, त्या नागरिकांकडून या तिघांनी पैसे घेतले का, घेतले असतील तर किती जणांची त्यात फसवणूक झाली याबाबत पंचवटी पोलिसांनी तिघांची चौकशी सुरू केली आहे.

## पंतप्रधान मोदी चार दिवसीय परदेश दौ-यावर

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चार दिवसीय परदेश दौ-याला आजपासून सुरुवात झाली आहे. उझबेकिस्तान आणि किर्गिस्तानला या दोन देशांना भेट देणार आहेत. तसंच शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) २६ व्या शिखर परिषदेला नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी किर्गिझ प्रजासत्ताकाची राजधानी बिश्केक इथं एससीओ शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे.दरम्यान, आपल्या परदेश दौ-यावर निघण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, सुरक्षा, संपर्क आणि संधी यांवर आधारित असलेल्या एससीओ शिखर परिषदेसाठीच्या भारताच्या दृष्टिकोनाला पुढं नेण्यास आणि दहशतवादाच्या धोक्यापासून मुक्त प्रदेश उभारण्यासाठी सहकारी सदस्यांसोबत मिळून काम करण्यास ते उत्सुक आहेत. उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताक या दोन देशांच्या दौ-यापूर्वी मोदी यांनी असाही विश्वास व्यक्त केला की, या दौ-यामुळं मध्य आशियातील भारताची सामरिक भागीदारी अधिक मजबूत होईल.



## ‘सीएनजी’ पुन्हा महागला; सर्वसामान्यांना महागाईची ओवाळणी

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** आखातात सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम देशातील इंधनांच्या दरांवरही होत आहे. कधी पेट्रोल-डिझेल, तर कधी एलपीजीच्या दरांमुळे सर्वसामान्यांचा खिसा कापला जात आहे. आता इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडने (आयजीएल) सीएनजीच्या दरामध्ये पुन्हा एकदा वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. आयजीएलने सीएनजीच्या दरामध्ये प्रति किलोमागे ३.८९ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला असून हे नवीन दर शनिवार सकाळपासून लागू होणार आहेत. यामुळे राजधानी दिल्लीमध्ये सीएनजीचे दर ८६.९८ प्रति किलोग्रॅम झाले आहेत. या दरवाढीमुळे सीएनजी वाहनधारकांच्या खिशावर अतिरिक्तताण



येणार आहे.आयजीएलने एका निवेदनात स्पष्ट केले आहे की, आखातातील संघर्ष पुन्हा वाढल्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील मालवाहतुकीवर सातत्याने परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून संकटपूर्व काळाच्या तुलनेत जागतिक स्तरावर एलएनजीच्या किमती जवळपास दुप्पट झाल्या आहेत. याशिवाय, हिवाळा तोंडावर आल्यामुळे युरोपला त्यांच्या नैसर्गिक वायूच्या साठ्यात वाढवण्याची घाई झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून सीएनजीच्या दरांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. विशेष म्हणजे यंदाच्या वर्षात पाच वेळा सीएनजीचे दर वाढले आहेत. आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे तेल आणि गॅस वाहतूक विस्कळीत झाली आहे, त्यामुळे पेट्रोल-डिझेल, सीएनजी, पीएनजीच्या किमती सातत्याने वाढत आहेत.

## मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात; 3 ठार

**नाशिक** : मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर चांदवडजवळ शुक्रवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने जाणा-या ट्रकचा अचानक ताबा सुटल्याने ट्रकने एकापाठोपाठ ६ ते ७ वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात प्राथमिक माहितीनुसार ३ जणांचा जागीच मृत्यू, तर ८ ते १० जण गंभीर जखमी झाले आहेत. शुक्रवारी मध्यरात्री मुंबई-आग्रा महामार्गावरून एक ट्रक जात होता. अचानक ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रकने समोरून जाणा-या कार, ट्रक तसेच इतर लहान-मोठ्या वाहनांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत तब्बल ६ ते ७ वाहनांचा अपघात झाला. अपघाताची तीव्रता एवढी होती की, अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले.

## पॅकबंद पदार्थांच्या पाकिटांवर आता दिसणार धोक्याचा सिम्बॉल

### ■ सुप्रीम कोर्टाचा बडगा ■ एफएसएसएआय वठणीवर!

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर ताशे-यानंतर, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने जास्त साखर, मीठ आणि फॅट्स असलेल्या पॅकेज्ड फूड्सच्या पाकिटावर पुढील बाजूस चित्रात्मक धोक्याचा इशारा असणारे लेबल्स लावण्याचा प्रस्ताव मांडला आहे. पॅकेज्ड फूडमधील हानिकारक घटकांबाबत अनिवार्य इशा-याची मागणी करणा-या एका जनहित याचिकेवरील सुनावणी दरम्यान, एफएसएसएआयशने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सहा पानांचे अनुपालन प्रतिज्ञापत्र सादर करत हा प्रस्ताव सादर केला.



जास्त साखर, सॅच्युरेटेड फॅट आणि मीठ असलेल्या पॅकेज्ड फूड उत्पादनांवर लाल रंगाचा षटकोनी आकाराचा सिम्बाल लागू करण्याचा एफएसएसएआयचा मानस आहे. ग्राहकांना संबंधित उत्पादनांमधील हानिकारक घटकांबद्दल सोपा, ठळक आणि सहज समजण्याजोगा इशारा मिळावा, यासाठी हे लेबल्स सिम्बॉलच्या रूपात डिझाइन केले जातील, असे एफएसएसएआयने स्पष्ट केले आहे. प्रस्तावानुसार, अतिरिक्त सॅच्युरेटेड फॅट, साखर आणि मीठ यापैकी कोणतेही दोन किंवा अधिक घटक जास्त असलेल्या उत्पादनांवर लाल रंगाचा षटकोनी सिम्बाल दर्शविला जाईल. यासाठीची मर्यादा कउन्सिफ-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशनने जारी केलेल्या डायटरी गाईडलाइन्स फार इंडियन्स २०२४ वर आधारित असेल. उत्पादनातील घटकांनुसार या इशा-यावर हाय फॅट , हाय शुगर , हाय साल्ट आणि हायली स्वीटन्ड बेव्हरेज असे स्पष्ट लिहिलेले असेल.विशेष म्हणजे, ग्राहकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी पाकिटाच्या मागील बाजूस असलेल्या पोषण माहिती तक्त्यातील फान्टपेक्षा या इशा-याचा फान्ट⇨(पान २ वर)

# नेपाळमध्ये अडकलेले भाविक सुखरूप महाराष्ट्रात परतले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**नेपाळ आणि तिबेटच्या सीमावर्ती भागातील महापुरात महाराष्ट्रातील २०० ते ४०४ नागरिक अडकल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून, यातील सुमारे १०० ते १२५ नागरिकांचा गट सुरक्षित आहे. सुमारे ६० जणांचा गट बेपत्ता असल्याची भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. तर, १०५ जण मायदेशी परतले आहे. यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेले भाविक महाराष्ट्रात सुखरूप परतल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नेपाळमध्ये अडकलेल्या १०० भाविकांचा महाराष्ट्राकडे सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला आहे. नेपाळपासून पाटणापर्यंत भाविकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक समन्वय आणि सर्वतोपरी मदत करण्यात आली. महाराष्ट्रात सुखरूप परतण्यासाठी त्यांच्या रेल्वे प्रवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व

१०० भाविक पाटणाहून नागपूरकडे सुखरू



प रवाना झाले. राज्य सरकार आणि मुख्यमंत्री कार्यालय त्यांच्या सुरक्षित परतीसाठी सातत्याने समन्वय साधत असून, सर्व भाविक लवकरच महाराष्ट्रात आपल्या घरी सुखरूप पोहोचतील, असे सांगण्यात आले आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील भाविकांच्या सुरक्षित परतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आणि सातत्यपूर्ण समन्वयामुळे सर्व भाविक सुखरूप भारतात परतले. हे भाविक आज नागपूर रेल्वे स्थानकावर सुखरूप दाखल झाले, त्यानंतर ते आपल्या गावी रवाना होत आहेत. संकटाच्या काळात तातडीने मदत, सातत्यपूर्ण समन्वय आणि सुरक्षित परतीची व्यवस्था केल्याबद्दल भाविकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच शासनाचे मनःपूर्वक आभार मानले. दरम्यान, या नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी व्हिडिओ कालवर बोलताना महाराष्ट्र सरकार आणि मुख्यमंत्री कार्यालयाने तातडीने दखल घेउन नागरिकांना भारतात परत आणण्यासाठी दाखवलेली तत्परता याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

## निवडणुका हायजॅक करण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर-ममता

**कोलकाता/ वृत्तसंस्था-**निवडणुका हायजॅक करण्यासाठी भाजपने निवडणूक आयोगाचा वापर केला, असा आरोप तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष व पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला. पक्षाविरोधात १४ हजार खटले दाखल झाले असून गरज भासल्यास आपण सर्वोच्च न्यायालयासोबतच आंतरराष्ट्रीय न्यायालयातदेखील धाव घेउ असा इशारा ममता बॅनर्जी यांनी दिला आहे. तृणमूल छात्र परिषदेच्या स्थापना



दिनानिमित्त कोलकाता येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. भाजपवर जोरदार हल्ला चढवताना ममता म्हणाल्या, भाजप फुटीचे राजकारण करत असून भीती दाखवण्यासाठी पोलिसांचा वापर करत आहे. मतदार याद्यांमधून लाखो नावे बेकायदा हटवून मत चोरीसाठी एसआयआरचा वापर करण्यात आला. विधानसभा निवडणूक हायजॅक करण्यासाठी भाजपने निवडणूक आयोगाचा वापर केला. मी लवकरच ⇨(पान २ वर)




## मनोज जरांगे पाटलांच्या ऊपोषणाला पुन्हा सुरूवात

**अंतरवाली सराटी /प्रतिनिधी-**मराठा आरक्षण आंदोलनात झोकून देणारे मनोज जरांगे पाटील यांनी शनिवार (२९ ऑगस्ट) सकाळी १० वाजल्यापासून बीड जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावात पुन्हा उपोषणाला सुरुवात केली आहे. या निमित्ताने शेकडो मराठा



आंदोलन गावात दाखल झाले असून कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उपोषण सुरू करण्यापूर्वी जरांगे पाटील यांनी आता विजयाच्या उंबरठ्यावर उभे असून मागे हटणार नाही, असे ठणकावून सांगितले.मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वी १० आंदोलने केली होती. सरकार मागण्या मान्य करत असले तरी अंमलबजावणी करत नाही. त्यामुळे संतप्त झालेले जरांगे पाटील यांनी पुन्हा आणि शेवटचे अस्त्र म्हणून उपोषणाला सुरुवात केली आहे. सरकारने ५८ लाख नोंदी मान्य केल्या असल्या तरी त्यांना प्रमाणपत्रे दिलेली नाहीत. शिवाय प्रमाणपत्र दिल्यानंतर त्यांनी व्हॅलिडिटी करण्याची आग्रही मागणी केली. त्यामुळे आता माघार नाही. आरक्षणाची संपूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत उपोषण सोडणार नाही, असा निर्धार जरांगे पाटील यांनी केला आहे. उपोषणाच्या सुरुवातीलाच जरांगे यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढविला आहे, आज गोडीने बोलतोय, उद्या बिघडू शकतो, असा इशाराही दिला. या निमित्ताने राज्यात ५८ लाख नोंदी सापडल्यात आता या ⇨(पान २ वर)

## झेरॉक्स दुकानात सापडले 3500 एसआयआर फॉर्म

### भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा, 4 बीएलओ निलंबित

**नवी मुंबई / प्रतिनिधी-**जिल्ह्यातील खारघरमध्ये एसआयआर फार्मवरून राजकीय राडा झाल्याची घटना समोर आली आहे. एका झेराक्स दुकानात हजारो एसआयआर फार्म झेराक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिका-यांनी दुकानात धाव घेतली. यावेळी हे फार्म झेराक्ससाठी घेउन आलेला व्यक्ती भाजपचा युवा पदाधिकारी असल्याचे समोर आले. या प्रकरणी ४ बीएलओंना निलंबित करण्यात आले असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान, हे प्रकरण अतिशय गंभीर असून, केवळ बीएलओंना निलंबित करून भागणार नाही तर त्यांना आदेश देणा-या अधिका-यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. खारघरमधील एका झेराक्स दुकानात हजारो एसआयआर फार्म झेराक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिका-यांनी दुकानात धाव घेतली. त्यावेळी ठाकरे गट आणि भाजप पदाधिका-यांमध्ये झटापट झाली. खारघर पोलिस या प्रकरणाची दखल घेत नसल्याने पोलिस ठाण्यात ठाकरे गटाने ठिय्या आंदोलन केले. या प्रकरणी अखेर भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्यावर खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पाच बीएलओ प्रतिनिधींना रायगड जिल्हाधिकारी यांनी निलंबित केले आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# खासदार बोंडे यांना धमकावल्या प्रकरणी पराग गुडधेंविरुद्ध गुन्हा दाखल

## भाजपा पदाधिकाऱ्यांची विविध पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांनी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना धमकावल्याप्रकरणी भारतीय जनता पार्टीने आज शनिवार २९ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये तक्रारी दाखल केल्या आहेत. राजपूतपुरा निवासी सत्यजित किशोरसिंह राठोड यांनी शनिवारी दुपारी ३.४५ वाजता नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीत म्हटले आहे की, पराग गुडधे (वय ४७) यांनी २८ ऑगस्ट रोजी सोशल मीडियावर व्हिडिओ जारी करून खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले.व्हिडिओमध्ये



गुडधे यांनी शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्याबद्दल बोंडे यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना 'तोंड सांभाळून बोला, अन्यथा तोंड फोडू' अशी धमकी दिल्याचा आरोप आहे.या प्रकरणी पोलिसांनी कलम ३५१(२), ३५१(३), ३५२ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक पुनीत कुलट हे पुढील तपास करीत आहेत.राजापेठ ठाण्यातही तक्रार- भाजपा शहर शहराध्यक्ष डॉ.नितिन धांडे हे पदाधिकाऱ्यांसह राजापेठ पोलीस ठाण्यात पोहोचले. त्यांनी पराग गुडधे विरुद्ध तक्रार दिली. तक्रारीत म्हटले आहे की, गुडधे यांनी सोशल मीडियावर व्हिडिओच्या माध्यमातून अमरावतीची शांतता व सुव्यवस्था बिघडवण्याच्या उद्देशाने भडकाऊ वक्तव्य केले तसेच खासदार डॉ. बोंडे यांना जीवे मारण्याची धमकी दिली.डॉ. धांडे यांनी गुडधे यांचा व्हिडिओ देखील तक्रारीसोबत पोलिसांना दिला आहे.अचलपूर - पथ्रोट येथेही भाजप कार्यकर्त्यांनी अधिकृत तक्रार दाखल केली. अंजनगाव सुर्जी येथे सुधीर गोळे आणि मनीष मेन यांच्या नेतृत्वात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. यावेळी डॉ. विकास कविटकर, गजानन लोंढे, हेमलता लोंढे, प्रिया देशमुख, मिलिंद गोतमारे, सुवर्णा सरोदे, आशीष टिपरे, प्रवीण नेमाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.फ्रेजरपुरा ठाण्यात भाजपा विद्यार्थी परिषदेच्या वतीनेही तक्रार देण्यात येणार असल्याची माहिती आहे.यावेळी भाजपा शहर जिल्हा उपाध्यक्ष मंगेश खोंडे हे देखील उपस्थित होते.पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## परतवाडा पोलिस स्टेशनमध्ये भाजपा मेळघाट ग्रामीणचे निवेदन

### शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख गुडधेंवर कारवाईची मागणी

अचलपूर/प्रतिनिधीः- राज्यसभा खा. डॉ. अनिल बोंडे यांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्य करून मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करीत भाजपा मेळघाट ग्रामीण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, सरचिटणीस सुधीर रसे यांच्या नेतृत्वाखाली परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे यांना लेखी तक्रार दिली आहे. यावेळी भाजपा मेळघाट ग्रामीण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, सरचिटणीस सुधीर रसे ,गजानन कोल्हे,अचलपूर नगर परिषद स्वीकृत नगरसेवक अभय माथने,नगरसेवक चिंटू बहोरिया, ॲड.मांडले, दीपक दौलतानी,प्रसन्न काठोळे,छोटू लाडोळे, विकी सोनपरोते , योगेश थोरात आदी उपस्थितीत होते. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

## विकास विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** विलास नगर येथील विकास विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. शासनाच्या निर्देशानुसार दि. २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या उपक्रमांतर्गत 'खेलेगा भारत, जितेगा भारत' ही यंदाची थीम घेऊन विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळाचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा मेश्राम यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. तसेच भारतीय हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची व क्रीडा क्षेत्रातील योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना 'फिट इंडिया'ची शपथ देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मैदानावर धावणे, लंगडी, फुटबॉल, हॉकी आदी खेळांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन सहायक शिक्षक प्रवीण भागवत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. मैदानावरील विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिस्त आणि विविध क्रीडा उपक्रमांचे नियोजन यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## १ व १० वरिल उर्वरित

### मास्टरमाईंडला नागपुरातून

सहा विद्यापीठांना गुरु वारी पत्र पाठवून अहवाल मागितला होता. शुक्रवारी काही विद्यापीठातील कुलगुरूंनी त्या डिग्री व कागदपत्रांबाबत माहिती दिली. या पदव्या आणि कागदपत्र बनावट असल्याचं या कुलगुरूंनी पोलिसांना तोंडी सांगितलं आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

कोठडीतून होणारउलगडा

पदवी प्रकरणातील मास्टरमाईंड परिमल गौरकर आणि बनावट कागदपत्रं छापणारा अक्षय खोब्रागडे या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी मागण्यात आली आहे. चौकशीदरम्यान या दोघांनी आतापर्यंत किती जणांना अशा प्रकारे बोगस पदव्या विकल्या, या रॅकेटमध्ये आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे, या बोगस पदव्यांच्या आधारे कोणी सरकारी वा खासगी नोकरी मिळवली आहे का, याचे मोठे नेटवर्क उघड होण्याची शक्यता आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक संतोष शेगोकार यांनी दिली.

### पॅकबंद पदार्थांच्या पाकिटांवर

साईज एक पाइंट मोठा असावा, असा प्रस्तावही दिला आहे.

**दोन टप्प्यांत अंमलबजावणीचा प्रस्ताव-** अन्न उद्योगाला उत्पादनांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा आणि ग्राहकांच्या माहितीच्या अधिकाराशी तडजोड होउ नये, यासाठी ही यंत्रणा दोन टप्प्यांत राबवण्याचा प्राधिकरणाचा विचार आहे. पहिल्या टप्प्यात, दोन किंवा अधिक हानिकारक घटक जास्त असलेली उत्पादने आणि विशिष्ट गोड पेये या नियमाच्या कक्षेत येतील. दुस-या टप्प्यात, कोणत्याही एका हानिकारक घटकाचे प्रमाण जास्त असलेल्या उत्पादनांसाठीही हा नियम लागू केला जाईल.

**नैसर्गिकर पदार्थांना सूट-** एकच घटक असलेले अन्नपदार्थ किंवा नैसर्गिकरीत्या फॅट, साखर किंवा मीठ जास्त असलेल्या पदार्थांना हा नियम लागू होणार नाही. प्रतिज्ञापत्रात तूप, खाद्यतेल, मीठ, साखर, गूळ आणि मध यांसारख्या उत्पादनांचा विशेष उल्लेख आहे. मात्र, या उत्पादनांवर अन्न सुरक्षा आणि लेबलिंगच्या इतर नियमांचे बंधन कायम राहील.

**सुप्रीम कोर्टाच्या कठोर ताशेरे-** टीएस अँड अवर हेल्थ सोसायटीने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीवेळी पॅकेज्ड फूडमधील साखर, मीठ आणि सॅच्युरेटेड फॅटची पातळी स्पष्टपणे दर्शवणारे इंटरप्रिटेटिव्ह लेबल्स आणण्यात प्राधिकरणाला आलेल्या अपयशावर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. याच्या अवघ्या पंधरवड्यानंतर,एफएसएसएआयने धोक्याचा इशारा न देण्याच्या आपल्या आधीच्या निर्णयातून माघार घेतली आहे.

**भारताने अविकसितच राहावे का ?-** सुप्रीम कोर्ट आंतरराष्ट्रीय मानके भारतात लागू करता येणार नाहीत, या केंद्र सरकारच्या भूमिकेवरही न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित करत, भारताने अविकसितच राहावे का ?अशी विचारणा केली. विशेषतः अशा पॅकेज्ड फूडकडे सर्वाधिक आकर्षित होणा-या लहान मुलांच्या आरोग्याबाबत खंडपीठाने गंभीर चिंता व्यक्त केली.

### निवडणुका हायजॅक करण्यासाठी

राज्याचा दौरा सुरू करणार आहे. माझ्या सभांना परवानगी न दिल्यास रस्त्यावर उतरून जनतेमध्ये मी जाणार. बघू, त्यांच्याकडे किती अंडी आणि वीटा जमा आहेत, असे ममता म्हणाल्या.

भाजपने पोलिसांना राक्षसी संस्था बनविले

तृणमूलच्या शासन काळात पोलिसांचा मानवतावादी चेहरा होता. परंतु, भाजपने पोलिसांना राक्षसी संस्थेत बदलले, असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला. समर्थकांविरोधात पोलिसांकडून होणारा बळाचा वापर मी रोखणार आहे. हा माझा रक्षाबंधनानिमित्त संकल्प आहे, असे ममता म्हणाल्या.

गद्दारांसाठी पक्षाचे दरवाजे बंद

पक्ष सोडून गेलेले खासदार आणि आमदारांना पक्षाचे दरवाजे कायमचे बंद झाल्याचे तृणमूलचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी स्पष्ट केले. स्वतःच्या स्वार्थासाठी कठीण परिस्थितीत पक्षाची साथ सोडणा-यांना पक्षात कदापि परतू दिले जाणार नाही, असे अभिषेक बॅनर्जी म्हणाले.

### मनोज जरांगे पाटलांच्या

सर्वांना कुणबी प्रमाणपत्र द्या आणि ज्यांनी प्रमाणपत्र काढले त्यांना व्हॅलिडिटी द्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समजून घ्यावे, चर्चेसाठी आलात तर स्वागत नाहीतर लढा सुरूच राहणार असा इशारा देतानाच आता आमच्याकडून वेळ देणे शक्य होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर मराठ्यांनो आता गाफील राहू नका, घरात बसून राहू नका. मी अन्नपाण्यावाचून उपोषणाला बसलोय. तुम्ही तातडीने अंतरवाली सराटीला या आणि अंतिम लढ्यास सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी समाजबांधवांना केले आहे. आता मराठा समाजाने सरकारवर वि□ास ठेवणे बंद करावे असे आवाहन करतानाच मराठा समाजाला मोठे होउ न देण्याचे सरकारचे धोरण असल्याचा आरोप केला.आता संघर्ष केला तर मराठ्यांच्या पुढच्या पिढीचा फायदा होईल, असे स्पष्ट करतानाच मनोज जरांगे पाटील यांनी बलिदान दिलेल्या मराठ्यांच्या कुटुंबाला नोकरी आणि मदत देण्याची मागणी केली. तसेच हे शेवटचे आंदोलन असून सर्व मागण्या सरकारने मान्य कराव्यात आणि पुन्हा आंदोलन करण्याची वेळ आणू नये, असे स्पष्ट केले. तसेच गाफिल राहिल्यास दगाफटका होउ शकतो, याकडे लक्ष वेधले.

### पाच कोटींच्या भूखंड फसवणूकप्रकरणी

करण्यास प्रवृत्त करून उल्हासनगर व अकोला येथे बनावट कुलमुखत्यारपत्र आणि खरेदीखत तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. या बनावट दस्तावेजांच्या आधारे भूखंड विक्री करून सुमारे पाच कोटी रुपयांची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक ३०३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक अचित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलिस निरीक्षक नितीन लेव्हर्कर यांना तपासाच्या सूचना दिल्या. गुप्त माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अवघ्या दोन तासांत संशयितांचा शोध घेत तिघांना ताब्यात घेण्यात आले.

अटक केलेल्यांमध्ये आस्तिक श्रीकृष्ण चव्हाण (वय ३०, रा. संतोषनगर, मलकापूर), राहुल अशोकराव जाधव (वय ४३, रा. नायगाव, जुने शहर) आणि प्रियंका लक्ष्मण पाटील ऊर्फ प्रियंका नामाजी चव्हाण (वय ३०, रा. सरस्वतीनगर, अकोला) यांचा समावेश आहे.

तिन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सहा दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली. बनावट कागदपत्रांची निर्मिती नेमकी कुठे आणि कशी झाली? या प्रक्रियेत आणखी कोण सहभागी आहे? भूखंडाच्या खरेदीखताच्या प्रक्रियेत कोणाची मदत घेण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे पोलिस तपासातून शोधली जाणार आहेत.

खरेदीखत तयार व नोंदणीच्या प्रक्रियेत संबंधित शासकीय यंत्रणेतील कोणाचा सहभाग अथवा निष्काळजीपणा होता का, याचाही तपास होण्याची शक्यता आहे. युवासेनेच्या अकोला पूर्व उपजिल्हाप्रमुखाला कथित भूखंड फसवणूकप्रकरणी अटक झाल्याने राजकीय वर्तुळातही चर्चेला उधाण आले आहे. या कारवाईनंतर संबंधित पदाधिकाऱ्याबाबत पक्षाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे. पाच कोटींच्या भूखंडाच्या या कथित व्यवहारामागे केवळ तिघेच होते की यामागे आणखी मोठी साखळी कार्यरत होती, याचा उलगडा पोलिस तपासातून होणार आहे.

### डफरीनमध्येच घोळ, सरकार

झालेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. रुग्णालय प्रशासन आणि पीडब्ल्यूडी विद्युत विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याने यात मोठा घोळ असल्याचे त्यांनी सांगितले.चित्रा वाघ म्हणाल्या,डफरीन रुग्णालयाच्या निरीक्षणासाठी आलेल्या पथकात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी नव्हते. सांबा, विद्युत विभागाच्या टीमने ३० जून आणि २२ ऑगस्टला रुग्णालयात फायर ऑडिट साठी भेट दिली होती. मात्र रुग्णालय प्रशासनाने सहकार्य न केल्याचा आरोप सांबा विभाने केला. तर रुग्णालय प्रशासन म्हणते आम्ही पत्र दिले होते पण प्रतिसाद मिळाला नाही.

एका निश्चित यंत्रणेतच ही सगळी गडबड सुरू आहे. असा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणी पोलीस तपासोबतच सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. जिल्ह्याचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनीही जबाबदारी स्वीकारावी.सर्व सरकारी रुग्णालयांचे फायर सेफ्टी ऑडिट तात्काळ करावे.या घटनेमागील खरे कारण शोधण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमावी. चित्रा वाघ म्हणाल्या की, राज्य सरकारने डफरीन रुग्णालयासाठी ९ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. मात्र त्यातून रुग्णालय प्रशासनाने मागितलेल्या सुविधा का दिल्या नाहीत? जर सरकार पैसा देत असेल तर व्यवस्था का होत नाही? याची जबाबदारी कोणाची? चित्रा वाघ यांनी पत्रकारांशी संवाद साधण्यापूर्वी जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि सीएस डॉक्टर विनोद पवार यांच्याशी ही या प्रकरणावर विस्तृत चर्चा केली. पत्रकार परिषदेत खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी, पक्षनेता चेतन गावंडे, शहराध्यक्ष नितीन धांडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**एकमेकांवर आरोप-** रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शेंडे यांनी सांगितले की, आमच्याकडे फायर ऑडिटसाठी निधी उपलब्ध होता. मात्र पीडब्ल्यूडीच्या टीमने आम्हाला फक्त अग्निशमन यंत्रांच्या रिफिलिंगबाबत सांगितले. फायर ऑडिटबाबत आमच्याशी कोणतीही चर्चा झाली नाही.त्यावर सांबा अधिकारी म्हणाले की, आम्ही पत्र दिले होते.

### 'विमुक्त दिना'निमित्त सोमवारी

भारतीय शिव भटके-विमुक्त (डीएनटी) सेनेच्या वतीने 'शिवसेना भटके-विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद – २०२६' चे आयोजन सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी मुंबई येथे श्री षण्मुखानंद सरस्वथी सभागृह, सायन येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य मार्गदर्शन लाभणार आहे. परिषदेचे आयोजक व भटके – विमुक्त (डीएनटी) समाजाचे राष्ट्रीय नेते, मंत्री संजय राठोड यांच्यासह राज्यभरातील शिवसेनेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, समाजातील उपेक्षित प्रश्नांवर प्रसिद्ध लेखक तथा डीएनटी अभ्यासक 'उपरा'कार लक्ष्मण माने, 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड, डीएनटी फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय संयोजक दिगंबर राठोड हे विचारवंत आणि अभ्यासक परिषदेत सखोल मार्गदर्शन करणार आहेत. शिवसेनेने तळागाळातील व वंचित घटकांना सत्तेच्या व समाजाच्या केंद्रस्थानी आणले. त्याच विचाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भटके-विमुक्त समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय करत या समाजाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची धुरा मंत्री संजय राठोड यांच्याकडे सोपवली. त्यामुळे मुंबई येथे होत असलेली ही परिषद केवळ औपचारिकता ठरणार नाही, असा विश्वास समाजबांधव व्यक्त करत आहे. भविष्यात या समाजाला आरक्षण, निवारा, रोजगार, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्थैर्य आणि योग्य राजकीय प्रतिनिधित्व कसे मिळवून देता येईल, याचा ठोस कृती आराखडा या परिषदेत तयार केला जाणार आहे.

**संस्कृतीचा जागर: 'भटके-विमुक्त लोककला संगम'-** हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रातील भटके-विमुक्त समाजाच्या पारंपरिक लोककला, दुर्मीळ वाद्ये आणि वेशभूषांचे थेट सादरीकरण होणार आहे. सुप्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप आणि त्यांचा संच 'भटके-विमुक्त लोककला संगम' हा सांस्कृतिक कार्यक्रम या सोहळ्यात सादर करणार आहेत. 'एकत्र येऊया... संघटित होऊया... हक्क, न्याय आणि विकासाची नवी दिशा घडवूया' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला महाराष्ट्रातील सर्व भटके-विमुक्त समाजबांधव, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने मुंबईत होणाऱ्या या परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन परिषदेचे आयोजक तथा अखिल भारतीय शिव भटके – विमुक्त (डीएनटी) सेनेचे राष्ट्रीय नेते संजय राठोड यांनी केले आहे.

### चांदूर बाजारात बबलू देशमुख

वाटप, कोठारा लेप्रसी येथील कुष्ठरुग्णांसाठी प्रीतिभोजन तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

यानंतर माधान रोडवरील रघुवंशी मंगल कार्यालयात बबलू देशमुख यांच्या अभिष्टचिंतन व नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून बबलू देशमुख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात खासदार बळवंत वानखडे यांनी बबलू देशमुख यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. कोणतेही पद किंवा सत्ता नसतानाही वाढदिवसानिमित्त एवढी मोठी गर्दी होणे हे त्यांच्या कार्याचे फलित आहे. बबलू देशमुख हे सातत्याने जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होतात आणि अहोरात्र जनतेसाठी काम करतात. त्यामुळेच कार्यकर्त्यांची त्यांच्यावरील निष्ठा आजही कायम असल्याचे दिसून येते, असे त्यांनी सांगितले.

स्वतःच्या खर्चाने कार्यक्रमाला उपस्थित राहणारी कार्यकर्त्यांची ही गर्दी त्यांच्या नेतृत्वावरील विश्वासाची खरी कमाई असल्याचेही वानखडे यांनी नमूद केले. देशातील सर्वाधिक काळ जिल्हाध्यक्ष पद भूषविणाऱ्यांमध्ये बबलू देशमुख यांचे नाव अग्रस्थानी असून, वरिष्ठांनी त्यांच्या कार्याची दखल घेतलेली हीच खरी पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी हरिभाऊ मोहोड, रामेश्वर अभ्यंकर, डॉ. रवींद्र वाघमारे, रावसाहेब लंगोटे, प्रमोद दाळू, प्रताप किटूकले, विलास बोरेकार, गणेशराव बेलसरे अरविंद लंगोटे, रमेशराव घुलक्षे, महेरुला भाई,बाबूभाई इनामदार,प्रमोदराव घुलक्षे, योगेशराव पवार, येतेशाम नबील,किशोर देशमुख, हरिभाऊ मोहोड, रामेश्वर अभ्यंकर, डॉ. रवींद्र वाघमारे, रावसाहेब लंगोटे, प्रमोद दाळू, प्रताप किटूकले, विलास बोरेकार, गणेशराव बेलसरे अरविंद लंगोटे, रमेशराव घुलक्षे, महेरुला भाई,बाबूभाई इनामदार,प्रमोदराव घुलक्षे, योगेशराव पवार, येतेशाम नबील,किशोर देशमुख, नामदेवराव तनपुरे, राहुल गवई नामदेवराव तनपुरे, राहुल गवई, उत्कर्ष देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील पदाधिकारी काँग्रेसचे विविध सेल, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

### अखेर दुसरा नर बिबटही

माहिती वन विभागाला मिळाल्यानंतर पथकाकडून सातत्याने त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत होते. या परिसरात यापूर्वी एका बिबट्याला सुरक्षितरीत्या रेस्क्यू करण्यात आले होते. मात्र, दुसरा नर बिबट्याही याच भागात वावरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

दुसऱ्या बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने मागील काही दिवसांपासून नियोजनबद्ध मोहीम राबविली होती. गुरुवारी आणि शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत परिसरात पथकाकडून बारकाईने पाहणी व निगराणी करण्यात आली. शनिवारी पहाटे बिबट्याच्या हालचाली निश्चित झाल्यानंतर रेस्क्यू पथकाने कारवाई सुरू केली.

बिबट्या नजरेच्या टप्प्यात येताच वनपाल अमोल गावनेर यांनी वाहनातूनच डार्ट करून त्याला बेशुद्ध केले. त्यानंतर पथकाने अत्यंत सावधगिरीने बिबट्याला ताब्यात घेत पिंजऱ्यात हलविले. रेस्क्यूदरम्यान बिबट्याला कोणतीही इजा होऊ नये तसेच परिसरातील नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी, याची विशेष काळजी घेण्यात आली. पकडण्यात आलेल्या नर बिबट्याचे वय सुमारे १० वर्षे असल्याची प्राथमिक माहिती आहे. रेस्क्यू केल्यानंतर वन विभागाच्या पथकाने त्याची वैद्यकीय तपासणी करून प्रकृती सुरक्षित असल्याची खात्री केली.

**नागरिकांनी घेतला सुटकेचा निःश्वास-**

मार्डी रोड आणि जलशुद्धीकरण केंद्र परिसरात बिबट्याचा सातत्याने वावर आढळून येत असल्याने नागरिकांच्या चिंतेत वाढ झाली होती. या भागात नागरिकांची तसेच जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांची नियमित वर्दळ असल्याने बिबट्याला सुरक्षितरीत्या पकडणे वन विभागासाठी आव्हानात्मक होते. अखेर दुसऱ्या नर बिबट्यालाही सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यात यश आल्याने परिसरातील नागरिकांनी मोठा दिलासा व्यक्त केला. वन विभाग आणि रेस्क्यू पथकाच्या संयुक्त व नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे शनिवारी सकाळी सुमारे ६ वाजता ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण झाली.

### एमआयडीसीत तेलाच्या 'भेसळी'वर

आल्या. विशेष म्हणजे रिपॅकर ऑइलसाठी परवाना असतानाही ट्रेडिंग केले जात असल्याचेही समोर आले. त्यामुळे ६ लाख २१ हजार ३०० रुपये किमतीचा ३ हजार ४२८ किलो ४०० ग्रॅम तेलसाठा जप्त करण्यात आला.

यानंतर मे. भारतकुमार अँड ब्रदर्स या पेढीची झाडाझडती घेण्यात आली. येथेही रिफाइंड सोयाबीन ऑइलच्या साठ्याची तपासणी करताना भेसळीचा संशय, अद्ययावत प्रयोगशाळेचा अभाव, सुठे तेलाची विक्री आणि प्रयोगशाळेचे अहवाल उपलब्ध नसल्याचे आढळले. या कारवाईत ५ लाख ६१ हजार ३५० रुपये किमतीचा ३ हजार ५९८ किलो ४०० ग्रॅम तेलसाठा जप्त करण्यात आला.

दोन्ही पेढ्यांकडे रिपॅकर ऑइलसाठी परवाने असतानाही तपासणीत गंभीर अनियमितता आढळल्याने प्रशासनाने परवाने निलंबित केले आहेत. जप्त तेलाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे आणि सहआयुक्त सचिन केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी किशोर बोरचाटे व रवींद्र सोळंके यांनी कारवाईत सहभाग घेतला. सहाय्यक आयुक्त देवानंद वीर यांनी याबाबत माहिती दिली.

### पोलिस अधिक्षक निकेतन कदम

नागरिकांनी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासमोर विविध समस्या मांडल्या. यामध्ये सर्वाधिक तक्रारी कौटुंबिक हिंसा, पती-पत्नीतील वाद आणि घरगुती कलह यासंदर्भातील होत्या. प्रत्येक तक्रार संयमाने ऐकून घेत पोलीस अधीक्षक कदम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. धारणीचे पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांनी संबंधित पक्षांना समोरासमोर बोलावून समुपदेशन केले आणि अनेक प्रकरणांचा जागेवरच तोडगा काढला. नागरिकांच्या समस्या तत्काळ निकाली काढण्यावर भर देत पोलीस प्रशासनाने संवेदनशील आणि लोकाभिमुख भूमिका घेतल्याचे यावेळी दिसून आले.

**'प्रोबेशन काळातील कामगिरी'-** धारणी पोलीस ठाण्यात प्रोबेशन काळात कार्यरत असताना IPS निकेतन कदम यांनी मेळघाटातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासोबतच सामाजिक प्रश्नांवरही प्रभावी काम केले. आदिवासीबहुल भागातील प्रसिद्ध घुंगरू बाजारात अल्पवयीन मुला-मुलींचे बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती व कायदेविषयक मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे बालविवाहांच्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे दिसून आले. याशिवाय दारूबंदी, गुटखाबंदी, अमली पदार्थांच्या विक्री व सेवनाविरोधात कठोर कारवाई, वाहतूक शिस्तीवर भर आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवले होते. कठोर अंमलबजावणीसोबतच गुन्हेगारांचे समुपदेशन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचाही त्यांनी यशस्वी प्रयत्न केले होते.

**'मेळघाटातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार'-** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दर महिन्याला मेळघाटातील एका आश्रमशाळेला भेट देण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना कायद्याची जाणीव, करिअर मार्गदर्शन, सायबर गुन्हे, व्यसनमुक्ती आणि सामाजिक जबाबदारी याविषयी समुपदेशन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी राबविण्यात येणार आहे.

### गंभीर नवजात बालकांना तातडीने

यांसारख्या विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी रुग्णालयांनी नातेवाईकांना सहकार्य करावे, असे निर्देश देण्यात आले आहे.

सदर आदेशांचे उल्लंघन केल्यास किंवा उपचारात जाणीवपूर्वक विलंब, टाळाटाळ केल्यास संबंधित रुग्णालय प्रशासन आणि जबाबदार व्यक्तींवर कडक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता सर्व खासगी व शासकीय रुग्णालयांनी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाला पूर्ण सहकार्य करावे, तसेच नवजात रुग्णांच्या जीवितास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आदेश देण्यात आले आहे.

### आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन

आता थेट मंत्रालयात हालचाली सुरू झाल्या आहेत. आगामी १ सप्टेंबर २०२६ रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, अपर आयुक्त संदीप गोलाईत, आंदोलक विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या संदर्भातील अधिकृत पत्र शासनाकडून तातडीने निर्गमित करण्यात आल्या नंतरच विद्यार्थ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात अर्जुन युवनाते, दिनेश टेकाम, मन्ना दारसिंबे, विठ्ठलराव मरापे, रोहित झाकर्डे, संदीप तोटे, गंगाराम जांभेकर, देवानंद धुर्वे, सुरेखा उईके, दादाराव भूसूम, श्याम बहाळे, शिव भील, अब्रार केदार, हेमराज राऊत यांच्यासह शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते.

### बसपाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

या साठीच बसपाने नशामुक्त फ्रेझरपुराचा मुद्दा हाती घेतला आहे. यापूर्वीही या मागणीसाठी परिसरात आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने लवकरात लवकर प्रश्नाचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले होते पण अजून पर्यंत यावर कोणताही निर्णय नाही झाला. यामुळे परिसरातील नगरसेवक आणि नागरिकांनी पुन्हा आंदोलन करण्याचा निर्धार घेतला आहे.या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने महिला सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत नगरसेविका विद्या माटे, जिल्हाध्यक्ष राजू गजभिये, उपाध्यक्ष सुरेश मेश्राम, बडनेरा विधानसभा अध्यक्ष नीलेश बनसोड, अमरावती विधानसभा अध्यक्ष धनराज गुल्हाने, प्रदेश सचिव दीपक पाटील यांच्यासह योगीराज रोटगे, प्रफुल्ल लोखंडे, अश्विनी लोखंडे, सुजल बनसोड, यश काळे, आशिष जामनेकर, अनिल माटे, कांता बनसोड, संगीता पाटील, स्वाती वैद्य, अनिता मेश्राम, किरण शहारे, रवी मेश्राम, गौरव माटे, मीना डोंगरे, रंजना मंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, ३० ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# त-हाळा-पांगरी महादेव रस्त्याला तडे ; कामावर प्रश्नचिन्ह

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील काम पुन्हा वादात ; काम अपूर्ण असतानाच रस्त्याला भेगा

**मंगरूळपीर :** मंगरूळपीर तालुक्यातील तऱ्हाळा ते पांगरी महादेव या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरू असलेले काम पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. नव्यानेच तयार होत असलेल्या या रस्त्याला काही ठिकाणी तडे गेल्याचे निदर्शनास आल्याने कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, रस्त्याचे काही काम अद्याप अपूर्ण असतानाच तयार झालेल्या भागाला भेगा पडल्याने संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

तऱ्हाळा ते पांगरी महादेव हा मार्ग मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून विकसित करण्यात येत आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात येत असताना सुरुवातीपासूनच रस्त्याच्या कामावरून नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्या आहेत. कामाच्या प्रगतीबाबत तसेच कामाच्या दर्जाबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले. काही काळ काम बंद राहिल्याने पांगरी महादेव येथील नागरिकांनी आंदोलनाचा इशाराही दिला होता. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती.

रस्त्याचे काम रखडल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारीनंतर तहसीलदार मंगरूळपीर यांच्या उपस्थितीत २३ मे २०२६ रोजी तऱ्हाळा ते पांगरी रस्त्याच्या ठिकाणी नागरिकांसोबत बैठक घेण्यात आली होती. यावेळी रस्त्याचे काम तातडीने सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची मागणी नागरिकांनी केली होती. काम वेळेत पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला होता. या बैठकीस कंत्राटदाराच्या प्रतिनिधीलाही उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. कंत्राटदाराच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या जगदीश मुठाळ यांनी रस्त्याचे काम दोन दिवसांत सुरू करण्याचे आश्वासन उपस्थित नागरिकांना दिल्याचा उल्लेख संबंधित पत्रव्यवहारात करण्यात आला आहे.



### चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून होणाऱ्या रस्त्याच्या कामाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि बारमाही वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे मोठा निधी खर्च करून तयार होणाऱ्या रस्त्याच्या कामात कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांची आहे. नव्याने तयार होत असलेल्या रस्त्याला तडे जाण्याच्या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, कामाची गुणवत्ता तपासावी आणि दोष आढळल्यास संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### 'कंत्राटदाराला कोणाचे अभय?'

रस्त्याच्या कामाबाबत सुरुवातीपासूनच तक्रारी होत असताना काम काही काळ बंद राहणे, नागरिकांना आंदोलनाची भूमिका घ्यावी लागणे, त्यानंतर प्रशासनाच्या बैठकीत काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन देणे आणि आता नव्याने तयार झालेल्या रस्त्याला तडे जाणे, या संपूर्ण प्रकारामुळे संबंधित कंत्राटदाराला कोणाचे अभय आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, रस्त्याच्या कामाची संबंधित विभागाने तांत्रिक तपासणी करून तडे जाण्याचे नेमके कारण स्पष्ट करावे. कामाचा दर्जा नियमांनुसार आहे की नाही, याची तपासणी करून दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, तसेच अपूर्ण काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

प्रशासनाच्या बैठका, नागरिकांच्या तक्रारी आणि काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना होऊनही आता नव्याने तयार झालेल्या रस्त्याला काही ठिकाणी तडे गेल्याचे समोर आले आहे.

# 'भाजी मार्केट'साठी आरक्षित जागेवर अतिक्रमण!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नगरपरिषदेच्या मंजूर विकास योजनेत (डीपी) गोंदेश्वर येथील गट क्र. १३ मधील जागा 'भाजी मार्केट'साठी आरक्षित असताना त्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. याबाबत या परिसरातील नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला असून नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.



भाजी मार्केटसाठी आरक्षित असलेल्या जागेवरील अतिक्रमण हटवावे आणि सदर जागेला अकृषक (एनए) परवानगी देऊ नये, अशी मागणी नगरसेवक सतीश ऊर्फ गल्ला वानखेडेसह परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, सदर जागा सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित असून, त्यावर मालमत्ताधारकाने कुंपण घालून अतिक्रमण केले आहे. त्यामुळे संबंधित जागेची तातडीने मोजणी व पाहणी करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी करण्यात आली आहे, तसेच आरक्षित जागेचे नियमबाह्य पुनर्निरीक्षण करून ती स्वतःच्या मालकीची दर्शविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. सदर जागेसाठी अकृषक परवानगीचा अर्ज सादर केला असल्यास तो फेटाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत एनए परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. विकास योजनेत सार्वजनिक सुविधेसाठी आरक्षित असलेल्या जागेचा खासगी वापर झाल्यास शहराच्या नियोजनावर तसेच नागरिकांच्या सुविधांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# जिल्हा रुग्णालयात ४१ व्या नेत्रदान पंधरवाड्याचे उद्घाटन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षीणता नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ४१ वा नेत्रदान पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. या पंधरवाड्याच्या निमित्ताने नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील नेत्रबुब्बुळे संकलन केंद्रात आयोजित कार्यक्रमात नेत्रदान पंधरवाड्याचे उद्घाटन आरोग्यसेवा मुंबईचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर आणि अकोला मंडळाचे उपसंचालक आरोग्यसेवा डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नेत्रदानाचे सामाजिक महत्त्व, अंधत्व निर्मूलनासाठी नेत्रदानाची आवश्यकता तसेच समाजामध्ये नेत्रदानाबाबत जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन केले.

# बाल हिताचे उकृष्ठ कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २७ ऑगस्ट रोजी बाल कल्याण समिती, वाशिम कडून जिल्ह्यातील बालकांच्या क्षेत्रात उकृष्ठ कार्य करणा-या अधिकारी, कर्मचारी यांच्या सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सन्मान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहूणे म्हणून बाल न्याय मंडळाचे सदस्य शिंदे, बाल कल्याण समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे, सदस्य, विनोद पट्टेबहादुर, सदस्या, डॉ. मंजुश्री जांभरुणकर, सदस्य, बालाजी गंगावणे, सदस्य, ॲड. अनिल उंडाळ व दिशा मुलींचे निरीक्षण गृह अधिक्षक अनिकेत कांबळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



कार्यक्रमाचे सुरुवातीला दिपप्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. अलका मकासरे यांनी केले.

तर बालविकासाचे उकृष्ठ कार्य करणा-या दहा विजेत्यांची घोषणा बाल कल्याण समिती सदस्य विनोद पट्टेबहादुर यांनी केली. प्रोत्साहनपर पुस्तक व पुष्पगुच्छ लक्ष्मी काळे, अर्चना वानखडे, दिपाली दळवी, प्रांजली चिपडे बक्षीस मुख्य सन्मानार्थी मध्ये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे एकनाथ राठोड, अजय यादव, रामेश्वर वाळले, रमेश वाघ, चाईल्ड हेल्पलाईन, वाशिमचे गोपीशंकर आरु, प्रतिभा घनसावंत, दिशा मुलींचे निरीक्षण, बालीकागृहाचे राजुभाऊ सनिसे, शिवाजी गांवडे, सौ. रंजना मोरे यांचा समावेश आहे. पुरस्कार प्रार्थीना पुररस्कार स्वरुप मानचिन्ह, सन्मानपत्र, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन गौरवविण्यात आले. अध्यक्षीय भाषणात उत्तम शिंदे यांनी बालकांच्या संरक्षण, संगोपन, शिक्षण, पुनर्वसन, विकास, समुपदेशन तसेच बाल हक्कांच्या संरक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय, संवेदनशील व प्रशंसनीय कार्य करणा-यां सन्मानार्थी कडून भविष्यात अधिक सर्वोत्तम काम करण्याची जबाबदारी पुरस्कातून तुम्हा, आम्हावर पडल्याने जिल्ह्यात एकही काळजी व संरक्षणाचे पिडीत बालक न्यायीक हक्कापासुन वंचित रहाणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन केले.

# वाशीम - अकोला रोडवर सावरगावजवळ भीषण अपघात; १९ वर्षीय तरुणी ठार, युवक गंभीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम-अकोला रोडवरील सावरगाव परिसरात आज दुपारी २:३० वाजे दरम्यान चारचाकी वाहन क्रमांक एम एच ३७ ए एच २२६९ व एका दुचाकी आडवी आल्याने भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे . या अपघातात कु. ऋतुजा बालाजी गोटे (वय १९, रा. विनायक नगर, वाशीम) हिचा जागीच मृत्यू झाला.

तर ज्ञानेश्वर लादे (वय २०, रा. वसारी) हा युवक गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले असल्याची माहिती मिळत आहे.




अपघात नेमका कसा घडला, कोणत्या वाहनांचा सहभाग होता आणि त्यामागील कारण काय, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. या घटनेची माहिती मिळताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, वाशीम ग्रामीण पोलीस ठाण्याकडून अपघाताबाबत अधिकृत माहिती घेण्यात येत असून, पुढील तपशील मिळाल्यानंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# राखी पौर्णिमेनिमित्त चिमुकल्यांचे वृक्ष रक्षाबंधन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला राखी पौर्णिमेचा सण भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे आणि रक्षणाचे प्रतीक मानला जातो. याच भावनेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत एसएमसी इंग्लिश स्कूल, वाशिमच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांनी परिसरातील प्राचीन वृक्षांना राख्या बांधून अनोख्या पद्धतीने 'वृक्ष रक्षाबंधन' साजरे केले.

'वृक्ष आमचे भाऊ असून त्यांना दीर्घायुष्य लाभावे आणि प्रदूषणाच्या दैत्यापासून त्यांनी आमचे रक्षण करावे,' अशी भावना व्यक्त करत विद्यार्थ्यांनी प्राचीन वृक्ष अर्थात 'मातृवृक्षांना' राख्या बांधल्या. वृक्षांचे संरक्षण, संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. एसएमसी इंग्लिश स्कूलच्या राष्ट्रीय हरित सेनेतर्फे गेल्या १७ वर्षांपासून वृक्ष रक्षाबंधनाचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. सर्वत्र होत असलेल्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून जागतिक तापमानवाढीची समस्या गंभीर होत आहे. त्यामुळे केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या वृक्षांचे संवर्धन व संरक्षण करणेही तितकेच आवश्यक असल्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी पर्यावरणाला हानिकारक घटकांचा वापर टाळून स्वतःच्या हाताने तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांनी वृक्षांना रक्षाबंधन केले. हा उपक्रम केवळ औपचारिकता न राहता भविष्यातही वृक्षांच्या सुरक्षिततेची वेळोवेळी खात्री करून त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे तसेच राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक व मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक पऱ्हाड, सहायक वनसंरक्षक पदमाकर मोगरे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी अंशुल शिर्के यांच्या मार्गदर्शनाचेही विद्यार्थ्यांना लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका राधिका देशमुख, प्रियांका भुते, पृथा देशमुख वनपाल बेले, हरणे, रविंद्र कामडी, वनरक्षक संतोष जुमडे, वानखडे यांनी सहकार्य केले.



# समस्त मुस्लिम समाजातर्फे रक्तदान शिबिर

### ११७ रक्तपिशव्यांचे संकलन सामाजिक बांधिलकीतून सहभाग




■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथे समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने मालेगाव शहरातील पोलीस ठाण्यासमोर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. या शिबिरात तब्बल ११७ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

नगिना मस्जिद, गांधी नगर, जामा मस्जिद चौक, पठाणपुरा, अक्सा कॉलनी यांसह मालेगाव जहांगीर परिसरातील विविध मोहल्ल्यांतील नागरिकांनी या शिबिरात उत्साहाने सहभाग नोंदविला. तरुणांसह विविध वयोगटांतील नागरिकांनी पुढाकार घेत रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना संकटकाळात वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# खेडकर नगरात श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त खेडकर नगरातील श्रीकृष्ण मंदिरात ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भजन, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, अभिषेक, महापूजा तसेच श्रीकृष्ण जन्मसोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन श्रीकृष्ण मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात ३० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता श्री गजानन महाराज महिला मंडळाच्या भजनाने होणार असून, रात्री ८ वाजता ह.भ.प. घनश्याम सावजी यांचे 'नकारात्मकतेचा अंत, अध्यात्मिकतेची सुरुवात' या विषयावर प्रवचन होईल. ३१ ऑगस्ट रोजी वैष्णवी महिला भजनी मंडळाचे भजन आणि ह.भ.प. अशोकराव सकळकळे यांचे 'श्रीमद्भगवद्गीतेतील पाच श्लोकांचे चिंतन' या विषयावर प्रवचन होणार आहे. १ सप्टेंबर रोजी श्री दत्तगुरु महिला भजनी मंडळाचे भजन तसेच श्री गुरुदेव सामुदायिक प्रार्थना भजन सेवा मंडळाचा भजन कार्यक्रम होईल. २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता श्रीकृष्ण अभिषेक व महापूजा, त्यानंतर श्री विठ्ठल महिला भजनी मंडळाचे भजन आणि रात्री ह.भ.प. मुरकर महाराज यांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन होणार आहे.

३ सप्टेंबर रोजी श्री माऊली महिला भजनी मंडळाचे भजन व रात्री विठ्ठल परिवार अकोला यांच्या वतीने संगीतमय विठ्ठल नामजपाचा कार्यक्रम होईल. ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण अभिषेक व महापूजा, जीजी माय महिला भजनी मंडळाचे भजन, जय हनुमान सांप्रदायिक भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम तसेच रात्री १० वाजता ह.भ.प. शिवहरी महाराज इस्तापे यांचे कीर्तन होऊन श्रीकृष्ण जन्मसोहळा साजरा करण्यात येणार आहे.

५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता ह.भ.प. नंदकिशोर महाराज ढेंगे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी १२.३० ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला ह.भ.प. सदानंद महाराज गावंडे (विठ्ठल आश्रम, धोतर्डी) यांचे मार्गदर्शन व विशेष उपस्थिती लाभणार आहे. श्रीकृष्ण जन्मोत्सवातील सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीकृष्ण मंदिर ट्रस्ट, खेडकर नगर, अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की श्री अनिल रेणुकादास सोहोळकर, वय अं ७० वर्षे, रा. वनदेवी नगर, बायपास, कारंजा, जि.वाशीम यांनी बिस्मिल्लाखां मजीदखान यांचेकडून मौजे काळी कारंजा, ता.कारंजा, जि.वाशीम मधील रहिवासी क्षेत्रातील निवासी प्लॉट (खुली जागा) क्रमांक १९३/२/६५, क्षेत्र– १२८.०० चौ.मीटर (१३७७.२८ चौ.फुट) खरेदी दस्त क्रमांक १३१३/२००१ दिनांक १२/०४/२००१ नुसार कायदेशीररित्या खरेदी केला असून सदर मालमत्तेवर त्यांचा निर्विवाद मालकी हक्क व ताबा आहे.

उपरोक्त नमूद मालमत्ता व त्याचा पूर्वइतिहास असा की ही खरेदी दस्त क्रमांक १८९९/१९९३ नुसार सदर मालमत्ता श्री गजानन तुळशीराम लोणकर, रा. कारंजा यांनी सौ. नादेराबेगम ज नासीमोद्दिन जहागीरदार तसेच नासिमोद्दिन ग्यासोद्दिन जहागीरदार, दोघेही रा.कारंजा यांचेकडून दिनांक ३०/०९/१९९३ रोजी खरेदीखताद्वारे विकत घेतली होती. तसेच इ.स.१९९९ साली उपरोक्त मालमत्ता ही गणेश राधेश्याम शर्मा, रा.कारंजा यांनी सदर मालमत्तेचे मूळ मालक श्री गजानन तुळशीराम लोणकर, रा.कारंजा यांचेकडून खरेदी दस्त क्रमांक १९६४/१९९९ नुसार खरेदी दिलेला होता.

उपरोक्त नमूद प्लॉट हा गणेश राधेश्याम शर्मा यांचे नावे होती, त्यानंतर त्यांनी खरेदी दस्त क्रमांक २३६३/२००० नुसार सदर प्लॉट सौ.सीमा गणेश शर्मा यांना विक्री केला, सौ सीमा गणेश शर्मा यांनी सदर प्लॉट बिस्मिल्लाखां मजीदखान व बिस्मिल्लाखां मजीदखान यांनी सदर प्लॉट आमचे पक्षकार श्री अनिल रेणुकादास सोहोळकर यांना विक्री केला होता. त्यासंबंधित सदरचे गणेश राधेश्याम शर्मा व सौ.सीमा गणेश शर्मा यांचा झालेला खरेदी व्यवहार इ.स. २००० साली घेतलेले मूळ खरेदी दस्त क्रमांक २३६३/२००० तसेच उपरोक्त नमूद खरेदी दस्त क्रमांक १३९३/२००१ तसेच १८९९/१९९३ हे दिनांक २९/०८/२०२६, शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास बायपास कारंजा येथे आमचे पक्षकार टू व्हीलर गाडीवरून घरी जात असतांना राधाकृष्ण हॉटेल जवळ कारंजा, जि.वाशीम येथे एका कापडी पिशवीतून गहाळ झालेत. याबाबत कारंजा शहर पो.स्टे येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. तरी सदरचे खरेदी दस्त क्र २३६३/२००० तसेच उपरोक्त नमूद खरेदी दस्त क्रमांक १३९३/२००१ तसेच १८९९/१९९३ कोणास आढळून आल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर संपर्क साधावा.

**पत्ता- श्री अनिल रेणुकादास सोहोळकर,**
रा.वनदेवी नगर, बायपास, कारंजा, जि.वाशीम
मो.क्र-९१७५४८७७८४ दिनांक-२९/०८/२०२६
स्थळ- कारंजा, जि.वाशीम पक्षकारातर्फे

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत संपादित होणा-या जमिनीचा योग्य मोबदला मिळावा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वैनगंगा- नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत कारंजा तालुक्यातील संपादित होणाऱ्या जमिनीचा चालू बाजारभावानुसार जमिन धारकांना योग्य मोबदला मिळावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचेकडे कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

२३ ऑगस्ट रोजी नागपूर येथील रामगिरी बंगल्यावर आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन कारंजा तालुक्यातील वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत संपादित होणाऱ्या जमीन, विहीर, पाईपलाईन, फळझाडे, पक्के घर, झाडे, कोठा इत्यादी संपत्तीचा चालू बाजारभावानुसार योग्य मोबदला मिळावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्प हा विदर्भातील दुष्काळग्रस्त व पाणीटंचाईग्रस्त भागासाठी अत्यंत महत्त्वाचा व महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. यामध्ये संपादित होणाऱ्या जमिनी या कारंजा–कामरगाव–अमरावती महामार्गालगत असून कामरगाव येथे अप्पर तहसीलदार कार्यालय, मोठी बाजारपेठ, शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालये तसेच इतर नागरी सुविधा उपलब्ध आहेत. सदर जमिनींपैकी काही जमिनी अकृषक स्वरूपाच्या कॉलनी तसेच ले-आऊट व बाजारपेठ परिसरालगतच्या असल्याने त्यांचे बाजारमूल्य सर्वसाधारण कृषी जमिनीपेक्षा अधिक आहे. प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन संपादित झाल्यानंतर संबंधित जमीनमालकांकडे उर्वरित जमीन किंवा उत्पन्नाचे अन्य साधन उपलब्ध राहणार नसल्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे केवळ शासकीय मूल्यांकनाच्या आधारे मोबदला न देता जमिनीचा चालू बाजारभाव, जमिनीचा वापर, स्थानिक विकास, आजूबाजूच्या जमिनींचे व्यवहार आणि प्रकल्पामुळे होणारे कायमस्वरूपी नुकसान यांचा सर्वंकष विचार जमीनमालकांना विश्वासात घेऊन प्रत्यक्ष पाहणी, पंचनामा व मूल्यांकन करण्यात यावे. संपादित होणाऱ्या जमिनी तसेच त्यावरील सर्व संपत्तीचा चालू बाजारभावानुसार न्याय मोबदला निश्चित करण्यासाठी विशेष समितीमार्फत फेरतपासणी व पुनर्मूल्यांकन करण्यात यावे, अशी आग्रही मागणी निवेदनातून केली आहे.यावेळी डॉ.राजीव काळे, युवा नेतृत्व देवव्रत डहाके उपस्थित होते.

कामरगाव ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर व्हावे कामरगावची लोकसंख्या, भौगोलिक विस्तार, बाजारपेठ, शैक्षणिक व व्यापारीदृष्ट्या सातत्याने विकसित होत आहे. परिसरातील नागरिकांच्या वाढत्या गरजा तसेच गावाचा भविष्यातील नियोजित विकास लक्षात घेता, कामरगाव ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्यात यावी अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. तालुक्यातील लाडेगाव येथे १९६२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सुमारे एक महिना मुक्कामी राहिले होते.

### मुख्यमंत्री यांचेकडे मागणी



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७३ ■ रविवार, ३० ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## वर्धा आता अक्षरांची राजधानी

# राज्यातील पहिले 'पुस्तकांचे शहर' म्हणून नवी ओळख

### ३५ हजार पुस्तके ग्रंथालयांना मिळणार ; वाचनसंस्कृतीला नवी दिशा

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या कर्मभूमी असलेल्या वर्धा जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. राज्यातील पहिले 'पुस्तकांचे शहर' म्हणून वर्धा शहराची निवड करण्यात आली असून शहरातील विविध ग्रंथालयांसाठी तब्बल ३५ हजार पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थी, साहित्यप्रेमी, संशोधक आणि वाचकांना मोठा लाभ होणार असून वर्ध्यातील वाचनसंस्कृतीला नवे बळ मिळणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा विभागाचा आढावा आणि साहित्यिकांशी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत बोलत होते. कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सूरज गोहाड, प्रदीप दाते, प्रा. सरोजिनी देशमुख, रवींद्र शोभणे, माजी प्राचार्य पद्माकर बाविस्कर, डॉ. गजानन कोठेवार, सुलभा पाटील, संजीव लाभे यांच्यासह साहित्यिक उपस्थित होते.

वर्ध्याला समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. गांधी आणि विनोबा यांच्या विचारभूमीमुळे वर्ध्याची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर 'पुस्तकांचे शहर' ही संकल्पना वर्ध्यातून सुरू होणे महत्त्वपूर्ण मानले जात आहे. शहरातील विविध ग्रंथालयांना ३५ हजार पुस्तके उपलब्ध झाल्यानंतर वाचकांना मोठ्या प्रमाणात साहित्य सहज उपलब्ध होणार आहे. पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची देवाणघेवाण वाढण्यासोबतच युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासही या उपक्रमाची मदत होणार आहे.



**पालकमंत्र्यांच्या मागणीला प्रतिसाद-** राज्यात 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना राबविली जात आहे. त्याच धर्तीवर 'पुस्तकांचे शहर' करण्याची मागणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केली. वर्ध्याला असलेली साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेता या उपक्रमाची सुरुवात वर्ध्यापासून करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याला डॉ. सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत राज्यातील पहिले पुस्तकांचे शहर म्हणून वर्ध्याची निवड जाहीर केली.

**प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र मराठी भाषा अधिकारी-** मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र वर्ग-१ दर्जाचा मराठी भाषा अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. शासकीय कामकाजात मराठीचा वापर वाढविणे, विविध बोलीभाषांचे जतन करणे तसेच मराठीच्या प्रचार आणि प्रसाराला गती देणे ही जबाबदारी या अधिकाऱ्यांमार्फत पार पाडली जाणार आहे.

**लंडनमध्ये वैश्विक मराठी भाषा केंद्र-** मराठी भाषेला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी लंडनमध्येही महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. पहिले मराठी मंडळ सुरू झालेल्या ऐतिहासिक इमारतीची महाराष्ट्र शासनाने लिलावातून खरेदी केली आहे. येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने 'आंतरराष्ट्रीय मराठी भाषा वैश्विक केंद्र' सुरू करण्यात येणार आहे.

**नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ**

ग्रामीण आणि शहरी भागातील दर्जेदार अप्रकाशित साहित्याला व्यासपीठ देण्यासाठी मराठी भाषा विभाग पुढाकार घेणार आहे. साहित्याची तपासणी करून दर्जेदार साहित्य प्रकाशित केले जाणार असून प्रकाशित पुस्तके शासनाकडून खरेदी करून राज्यातील विविध ग्रंथालयांपर्यंत पोहोचविली जाणार आहेत. त्यामुळे नवोदित आणि ग्रामीण साहित्यिकांना प्रोत्साहन मिळणार आहे.

दरम्यान, कार्यक्रमात जिल्ह्यातील साहित्यिकांनी विविध समस्या आणि मागण्या मंत्री डॉ. सामंत यांच्यासमोर मांडल्या. या मागण्यांवर शासन सकारात्मक निर्णय घेऊन लवकरच तोडगा काढेल, असे आश्वासन त्यांनी दिले.

## कोरड्या नाल्याला कोटींची 'पूरभिंत'; आमदार साहेब, हा कोणता विकास?

### पाणीच वाहत नाही, पूरही येत नाही, तरी संरक्षण भिंतीसाठी कोट्यवधींचा घाट अतिक्रमण हटविण्याची मात्र घाई

**आष्टी शहीद जनमाध्यम :** थार येथील अतिक्रमण कारवाईने आता प्रशासनाच्या विकासकामांच्या नियोजनावरच गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. ज्या नाल्यात वर्षभर पाणी वाहत नाही, पूरस्थिती निर्माण होत नाही, त्या कोरड्या नाल्यावर कोट्यवधी रुपये खर्च करून संरक्षण भिंत उभारण्याचा निर्णय नेमका कोणाच्या डोक्यातून आला आमदार साहेब, हा कोणता विकास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा पद्धतीने विकासकामे करण्यास सांगितले आहे का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दोन दिवसांपूर्वी अनुसया घोरपडे यांच्या टीनाच्या शेडवरील अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायतीने पोलिस बंदोबस्तात कारवाई सुरू केली. जेसीबी शेडकडे सरकत असतानाच खासदार अमर काळे यांना माहिती देण्यात आली. काळे घटनास्थळी दाखल झाले आणि अधिकाऱ्यांकडे कारवाईचा आदेश, नियम व अधिकार याबाबत जाब विचारला. त्यानंतर कारवाई थांबली. या घटनेनंतर आता संरक्षण भिंतीच्या कामाचीच चर्चा गावात रंगली आहे.



नाल्यात पाणी नाही, मग पूरसंरक्षण कशाचे विहारापासून जांब नदीपर्यंत नाला असल्याचे सांगितले जात असले तरी येथे पूर येत नसल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. मग कोट्यवधींचा निधी नेमका कशासाठी नाला कोरडा झाल्यावर संरक्षण भिंत का बांधण्यात आली आधी पूरस्थितीचा अभ्यास झाला होता का निधी मंजूर करताना प्रत्यक्ष पाहणी झाली होती का असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. विशेष म्हणजे संरक्षण भिंतीचे बांधकाम अर्धवट असताना शेड हटविण्याची घाई का करण्यात आली, हा प्रश्नही कायम आहे. बांधकाम करणाऱ्या यंत्रणेलाच शेडमुळे अडचण नसल्याचे पत्र दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईमागील नेमका उद्देश काय, याबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. विकासाच्या नावाखाली निधी खर्च करायचा आणि गरज नसलेल्या कामांना संरक्षण द्यायचे, हा कोणता विकास? मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विकासाच्या संकल्पनेत जनतेच्या पैशाचा असा वापर अपेक्षित आहे का, असा प्रश्न आता थेट सत्ताधाऱ्यांनाच विचारला जात आहे. नाल्याचा प्रत्यक्ष प्रवाह, संरक्षण भिंतीची गरज, कामाचा अंदाज, निधी मंजुरी आणि अतिक्रमण कारवाई या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## सहा किलोमीटरसाठी दीड वर्ष; हा कसला विकास

### गिट्टी-खड्ड्यांनी मार्गाची वाट लावली; रस्त्याची 'भूतबाधा' न हटवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**वर्धा जनमाध्यम :** विकासाच्या नावाने कोट्यवधींच्या घोषणा आणि कागदावर प्रगतीची रंगीत चित्रे दाखविली जात असताना आर्वी तालुक्यातील नांदपूर-टाकरखेड मार्गाने प्रशासनाच्या कारभाराची पोलखोल केली आहे. अवघ्या सहा किलोमीटरच्या या रस्त्याचे काम तब्बल दीड वर्षांपासून रखडले असून, रस्त्यावर पसरलेली गिट्टी, खड्डे आणि उखडलेल्या मार्गामुळे नागरिकांचा रोजचा प्रवास जीवघेणा ठरत आहे. प्रशासनाच्या या सुस्त कारभाराचा निषेध करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी थेट रस्त्यावरच अनोखे आंदोलन करीत 'भूतबाधा' उतरविण्याचा इशारा दिला.



टाकरखेड येथे २० ऑगस्टपासून संत लहानुजी महाराज पुण्यतिथी महोत्सव सुरू आहे. या महोत्सवासाठी हजारो भाविकांची या मार्गावरून ये-जा सुरू असतानाही प्रशासनाला रस्त्याच्या दुरवस्थेचे गांभीर्य जाणवले नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. श्रद्धेच्या ठिकाणी जाणाऱ्या भाविकांना खड्डे, गिट्टी आणि धुळीचा सामना करावा लागत असताना विकासाच्या गप्पा मारणाऱ्या यंत्रणेने डोळे मिटले आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

'विश्वविक्रमी विकासाचे दावे कुठे गेले असा प्रश्न करीत प्रा. डॉ. सुधाकर भुयार यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर निशाणा साधला. सहा किलोमीटरचा रस्ता पूर्ण करण्यासाठी दीड वर्ष लागत असेल तर विकासाच्या दाव्यांची वस्तुस्थिती काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

प्रा. संजय वानखेडे यांनीही प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना दररोज या रस्त्यावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्ता की खड्ड्यांचे साम्राज्य, असा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने काम सुरू न केल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

या आंदोलनात प्रा. डॉ. सुधाकर भुयार, प्रा. संजय वानखेडे, पंकज गोडबोले, महेश बिरोले, मनोज राऊत, शेखर पालेकर, मलिक पटेल, तोहसीफ भाई यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## वणा नदीतून वाळूची चोरी; विनापरवाना ट्रॅक्टर पकडला

**हिंगणघाट जनमाध्यम :** डंकिन येथील वणा नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळू उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीवर हिंगणघाट पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत सुमारे १२० घनफूट म्हणजेच एक ब्रास वाळूसह ट्रॅक्टर व ट्रॉली असा एकूण ६ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई डंकिन रोडवरील बिडकर यांच्या शेताजवळ गुरुवारी मध्यरात्री करण्यात आली.

### हिंगणघाट पोलिसांची कारवाई; ६.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांच्या माहितीनुसार, हिंगणघाट पोलिस ठाण्याचे कर्मचारी परिसरात अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग करीत असताना डंकिन येथील वणा नदीच्या पात्रातून विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर वाळू भरून हिंगणघाटकडे येत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी पंचांसह डंकिन रोडवर बिडकर यांच्या शेताजवळ नाकाबंदी केली.

काही वेळातच विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर येताना दिसला. पोलिसांनी तो थांबवून तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये सुमारे एक ब्रास वाळू आढळून आली. ट्रॅक्टर चालकाने आपले नाव पंकज प्रकाशराव क्षिरसागर (४७, रा. बिडकर वार्ड, हिंगणघाट) असे सांगितले. तोच ट्रॅक्टरचा चालक व मालक असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. वाळू वाहतुकीचा कोणताही शासकीय अधिकाऱ्याचा परवाना नसल्याचे चौकशीत समोर आले. तसेच ट्रॅक्टरची कागदपत्रे आणि वाहन चालविण्याचा परवानाही नसल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. नदीपात्रातून वाळू अवैधरित्या उत्खनन करून चोरी केल्याचेही चालकाने सांगितल्याची नोंद तक्रारीत आहे.

या प्रकरणी पोलिस हवालदार अनुप टपाले यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिस ठाण्यात कलम ३०३ (२) भा.न्या.सं. सह कलम १३०/१७७ व ३ (१), १८१ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा

## उत्कृष्ट तपासाला महासंचालकांचा सलाम; वर्धा एसपींसह सहायक निरीक्षकाचा गौरव

### सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्काराने सौरभकुमार अग्रवाल व संदीप कापडे सन्मानित

**वर्धा जनमाध्यम :** गंभीर गुन्ह्यांचा अचूक तपास, तांत्रिक पुराव्यांचा प्रभावी वापर आणि न्यायालयात भक्कम पुरावे सादर करून आरोपींना कठोर शिक्षा मिळवून देणाऱ्या वर्धा पोलिस दलातील दोन अधिकाऱ्यांचा महाराष्ट्र पोलिस दलाच्या वतीने गौरव करण्यात आला. पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि सहायक पोलिस निरीक्षक संदीप कापडे यांना सन २०२३ कालावधीतील 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. अपर पोलिस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्या हस्ते २५ ऑगस्ट रोजी हा पुरस्कार देण्यात आला.





सौरभ कुमार अग्रवाल हे २०१९ मध्ये जळगाव जिल्ह्यात कार्यरत असताना चोपडा ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्याचा तपास त्यांच्या समोर मोठे आव्हान होते. गुन्ह्यात भादंवि कलम ३०७, ३७६(अ), ३७६(ब), ३५४, ३६३, ३६६(अ), ३४१, ३२३, ५०६ तसेच पॉक्सो आणि ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. अग्रवाल यांनी पथकासह तांत्रिक विश्लेषण, अचूक पुरावे आणि साक्षीदारांची भक्कम साखळी उभी करत तपास पूर्ण केला. या तपासाच्या आधारे न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

दरम्यान, संदीप कापडे हे चंद्रपूर जिल्ह्यात कार्यरत असताना ५९ किलो गांजा जप्त करून दोन आरोपींविरुद्ध रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल या प्रकरणाचा तांत्रिक पुराव्यांच्या आधारे काटेकोर तपास करण्यात आला. न्यायालयाने दोन्ही आरोपींना आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली.

गंभीर गुन्ह्यांचा प्रभावी तपास करून न्यायालयात दोषसिद्धीचे प्रमाण मजबूत करण्यासाठी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीची पोलिस महासंचालकांनी दखल घेत दोन्ही अधिकाऱ्यांना 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्काराने सन्मानित केले.

## शेतशिवारात वाघीण-पिलांचा तळ; चार गावांत भीतीचा कळस

### दिवसा दर्शनाने खळबळ; वनविभागाचे गस्ती पथक रवाना;

### चार गावांमध्ये भीतीचे वातावरण

**आष्टी शहीद जनमाध्यम :** एकीकडे शेतात पिकांची चिंता, तर दुसरीकडे जीवाची भीती... आष्टी तालुक्यातील बांबरडा-चामला मार्गावर वाघीण आणि तिच्या तीन पिलांचा दिवसाढवळ्या मुक्त संचार सुरू असल्याचे शनिवारी समोर आल्याने परिसरातील ग्रामस्थांच्या काळजाचा ठोका चुकला आहे. रस्त्यालगत आणि शेतशिवारात वाघीण तीन पिलांसह फिरताना दिसल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



रात्रीच्या अंधारात नव्हे, तर भरदिवसा शेतशिवार आणि रस्त्याच्या परिसरात दिसून आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.

मारुती घटी यांच्या शेताजवळ वाघीण आणि तीन पिले फिरताना एका कारचालकाला दिसली. कारचालक चापले यांनी हा थरारक प्रसंग कॅमेऱ्यात कैद केला. त्यानंतर या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

गेल्या काही दिवसांपासून बांबरडा परिसरात वाघ आणि अस्वलाचा वावर असल्याची चर्चा होती. मात्र, आता वाघीण आणि तीन पिलांचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने या चर्चेला दुजोरा मिळाला आहे. विशेष म्हणजे हा वावर

**दोन दिवसांपूर्वीच गायीचा बळी आता वाघीण-पिलांचा धसका**

दि. २७ रोजी अंबादास चंदीवाले यांच्या मालकीच्या गायीवर वाघाने हल्ला करून तिला ठार केले होते. या घटनेची धग कायम असतानाच वाघीण तीन पिलांसह परिसरात फिरताना आढळल्याने वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पशुधनानंतर आता माणसांच्या सुरक्षेची चिंता ग्रामस्थांना सतावत आहे.

वाघीण आणि तिची पिले रस्त्याच्या वळणाजवळ दिसताच त्यांना पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. मात्र, हा कुतूहलाचा विषय नसून गंभीर धोक्याचा इशारा आहे. पिलांसह असलेली वाघीण अधिक आक्रमक होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी गर्दी करून वन्यप्राण्यांच्या जवळ जाणे टाळण्याची गरज आहे. एका चुकीच्या धाडसाची किंमत जीवावर बेतू शकते. घटनेची माहिती बांबरडा येथील पोलीस पाटलांनी तळेगाव वनविभागाला दिल्यानंतर वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तळेगाव व आष्टी येथील वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता चामला शिवारात वाघीण आणि तीन पिले फिरत असल्याची माहिती प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले. वनविभागाचे गस्ती पथक चामला गावाच्या दिशेने रवाना करण्यात आले आहे.

## वर्धेच्या प्रतिष्ठेत मानाचा तुरा; राहुल तेलरांधे राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्याचे सुप्रसिद्ध छायाचित्रकार राहुल तेलरांधे यांनी राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. रेवणसिद्ध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संस्था, अमरावतीतर्फे वेल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रायोजकत्वाखाली तीन दिवसीय राज्यस्तरीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ३०० हून अधिक नामांकित छायाचित्रकारांनी सहभाग घेतला.



'रिफ्लेक्शन अँड शॅडो' या विषयावर राहुल तेलरांधे यांनी सादर केलेल्या छायाचित्राने परीक्षकांची विशेष दाद मिळवत प्रथम पुरस्कार पटकावला. संस्थेतर्फे आयोजित पारितोषिक वितरण व समारोप सोहळ्यात त्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

तेलरांधे यांनी यापूर्वीही विविध छायाचित्र स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळविले आहेत. त्यांच्या या सातत्यपूर्ण यशामुळे वर्ध्यातील युवा छायाचित्रकारांना प्रेरणा मिळत आहे.

मात्र, छायाचित्रकलेच्या क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करूनही प्रशासकीय स्तरावर त्यांच्या योगदानाची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

पारितोषिक वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ब्रिजलाल बियाणी व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक घोटे होते. डॉ. रविकांत कोल्हे, जयंत डेहनकर, प्राचार्य राजेश चंदनपाट यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. छायाचित्रांचे परीक्षण विकास केमदेव, शशी ढवळी आणि वन्यजीव संरक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रवीण चकोते यांनी केले.

## नेपाळच्या संकटातून १०६ भाविकांची सुखरूप घरवापसी

**वर्धा जनमाध्यम :** नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील १०६ भाविकांच्या मदतीला राज्य सरकार धावून आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सर्व भाविकांचा महाराष्ट्राकडे सुरक्षित परतीचा प्रवास सुरू झाला आहे. संकटाच्या काळात शासनाने तत्काळ मदतीचा हात दिल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे. या १०६ भाविकांमध्ये वर्धा जिल्ह्यातील चार भाविकांचा समावेश आहे.



नेपाळमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे भाविकांच्या परतीच्या प्रवासात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानंतर नेपाळपासून पटणापर्यंत भाविकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक समन्वय आणि मदत करण्यात आली. त्यानंतर शनिवारी सकाळी ७ वाजून ३६ मिनिटांनी रेल्वे क्रमांक १७६०९ ने सर्व भाविक पटणाहून नागपूरच्या दिशेने सुखरूप रवाना झाले.

दीर्घ प्रवासानंतर आज रविवारी पहाटे ४ वाजून ३५ मिनिटांनी भाविक नागपूरला पोहोचले. त्यामुळे कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. नेपाळमधील धार्मिक यात्रेला गेलेल्या भाविकांसाठी संकटाचा काळ चिंतेचा ठरला होता. मात्र, शासनाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे त्यांच्या सुरक्षित परतीचा मार्ग मोकळा झाला.

**संकटात सरकार आपल्या पाठीशी-**

प्रशासनाने केलेल्या ।ातडीच्या मदतीबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले. धार्मिक यात्रेदरम्यान निर्माण झालेल्या संकटात शासनाने संवेदनशीलता दाखवत समन्वय साधल्याने भाविकांची सुखरूप घरवापसी शक्य झाली. वर्ध्यातील चार भाविकही सुखरूप परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आता आम्ही वाचणार नाही, मुलांची काळजी घ्या

## नेपाळमधील पुरात भोपाळच्या 29 बेपत्ता यात्रेकरूंचा अखेरचा फोन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** घर पाण्यात अर्धे बुडाले आहे. आता आम्ही वाचणार नाही. मुलांची काळजी घ्या नेपाळमध्ये आलेल्या पुरामध्ये बेपत्ता झालेल्या भोपाळमधील २९ यात्रेकरूंच्या कुटुंबीयांना गुरु वारी सकाळी आलेला हा अखेरचा फोन आता त्यांच्या काळजाचा ठोका चुकवत आहे. देवकी अधिकारी यांना सकाळी सुमारे साडेनउ वाजता नातेवाईकांचा फोन आला. नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे जीव वाचवण्यासाठी ते उंच ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

देवकी यांच्या म्हणण्यानुसार, कुटुंबीयांनी डोंगरावर चढून सुरक्षित ठिकाणी जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी एका स्थानिकाच्या घरात आश्रय घेतला. मात्र, पुराचे पाणी वाढत गेले आणि ते घरही अर्धे पाण्याखाली गेले. त्यांनी सांगितले की घर अर्धे पाण्यात बुडाले आहे. आता आम्ही वाचणार नाही. मुलांची काळजी घ्या, असे देवकी यांनी सांगितले.

**शेवटचा संपर्क घराच्या छतावरून**

भोपाळमधील कृष्ण-राधिका खनाल आणि रामचंद्र-भावती खनाल अधिकारी तसेच त्यांचे कुटुंबीय श्रावण पौर्णिमेनिमित्त गोसाईंकुंड यात्रेसाठी नेपाळला गेले होते. या गटात एकाच विस्तारित कुटुंबातील २९ जणांचा समावेश होता. यामध्ये भाउ-भावजय, बहिणी-मेहुणे आणि इतर नातेवाईकांचा समावेश होता. गुरु वारी सकाळी त्यांनी कुटुंबीयांना आपण एका घराच्या छतावर आश्रय घेतल्याचे सांगितले. त्यानंतर मात्र त्यांच्याशी कोणताही संपर्क होउ शकलेला नाही.

कुटुंबीयांनी पुन्हा पुन्हा फोन करण्याचा प्रयत्न केला. काही काळ फोन लागत होता, मात्र समोरून कोणताही आवाज येत नव्हता. त्यानंतर फोनचाही संपर्क तुटला. यानंतर कोणताही संपर्क झालेला नाही. एकूण २९ जण गेले होते आणि ते सर्व आमच्या ओळखीचेच आहेत. आतापर्यंत त्यांच्यापैकी कोणाबाबतही आम्हाला कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे कुटुंबीयांनी सांगितले.

**नेपाळ-तिबेटमध्ये मोठी जीवितहानी**

नेपाळ आणि तिबेटमध्ये आलेल्या पुरामुळे मृतांचा आकडा ५३८ वर पोहोचला असून ९७७ जण अद्याप बेपत्ता आहेत. सुमारे ३,७४२ जणांची सुटका करण्यात आली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, चीनच्या बाजूला असलेले सुमारे ४०० भारतीय सुरक्षित आहेत. मात्र, सुमारे ३२० भारतीय आणि १०० हून अधिक भारतीय वंशाचे नागरिक अद्याप बेपत्ता असल्याचे मंत्रालयाने सांगितले. भोपाळमधील या २९ यात्रेकरूंच्या कुटुंबीयांसाठी मात्र आता प्रत्येक फोनक?ल आशेचा किरण ठरत आहे. त्यांच्या नातेवाईकांचा ठावठिकाणा लागण्याची प्रतीक्षा कुटुंबीय करत आहेत.



## 17 दिवसानंतर आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे

■ 90 दिवसांत कृती आराखडा बनवणार, ■ 2 GR जारी

**मुंबई** - आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेले १७ दिवसांचे आंदोलन अखेर मागे घेण्यात आले आहे. २९ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जमातीच्या संघटना आणि विद्यार्थी प्रतिनिधींसोबत बैठक झाली. या बैठकीनंतर शासनाने दोन शासन निर्णय जारी केले आहेत. या बैठकीत विद्यार्थी आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी मागील दोन वर्षांत राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये झालेल्या विद्यार्थी मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला तसेच डॉ. सुभाष साळुंखे समितीच्या अहवालासह यासंदर्भातील इतर अहवालांमधील शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीच्या पार्श्वभूमीवर शासनाने आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या घटनांचा अभ्यास करून आवश्यक उपाययोजनांसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी पुढील तीन महिन्यांत डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल, आश्रमशाळांमधील समस्यांवर उपाययोजना सुचविणा-या इतर संस्थांचे अहवाल तसेच न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा अभ्यास करावा. त्यातील कार्यवाहीचे मुद्दे निश्चित करून कृती आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर या कृती आराखड्याची पुढील तीन महिन्यांत अंमलबजावणी करावी. तसेच अंमलबजावणीनंतरचा कार्यवाही अहवाल तातडीने शासनाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ५०० शासकीय तसेच विविध सेवाभावी संस्थांमार्फत ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालवल्या जातात. या आश्रमशाळांमध्ये सर्पदंश, आजारपण, अपघात यांसह विविध कारणांनी विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ३० मे २०१६ रोजी आरोग्य सेवेचे सेवानिवृत्त महासंचालक डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठित करण्यात आली होती. या समितीने १९ ऑक्टोबर २०१६ रोजी शासनाला अहवाल सादर केला होता. समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. आता या अहवालांसह न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करून कालबद्ध कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश शासनाने दिल्याने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागणीवर निर्णय झाला आहे.आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय वसतिगृहांमध्ये अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना भोजनासाठी देण्यात येणारी डीबीटी बंद करून मेसची सुविधा उपलब्ध करून देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तालुका आणि ग्रामीण स्तरावरील वसतिगृहांप्रमाणेच शहरातील शासकीय वसतिगृहांसाठी भोजन ठेका देण्याची कार्यवाही संबंधित अपर आयुक्तांनी पुढील तीन महिन्यांत पूर्ण करावी असे निर्देश मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. DBT बंद होण्यापासून प्रत्यक्ष मेस सुरू होईपर्यंतच्या काळात विद्यार्थ्यांच्या भोजनाची कोणतीही गैरसोय होउ नये याची दक्षताही घेण्याचे निर्देश सरकारने दिले.

## हिमालयाची भ्रमंती करणारे मुंबईचे ज्येष्ठ गिर्यारोहक डॉ. मिलिंद चितळे यांच्यासह कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेला 40 भाविकांचा समूह बेपत्ता

**मुंबई/प्रतिनिधी :** नेपाळमध्ये आलेल्या महापुरात मोठा हाहाकार उडाला आहे. या नैसर्गिक आपत्तीत कैलास-मानसरोवर यात्रेसाठी गेलेले अनेक भारतीय भाविक बेपत्ता झाले असून, यामध्ये तब्बल ३० वर्षांपेक्षा जास्त काळ हिमालयात भ्रमंती करणारे मुंबईतील ज्येष्ठ गिर्यारोहक डॉ. मिलिंद चितळे यांचाही समावेश आहे. नेपाळ प्रशासनाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेनंतर सुमारे १७८ भारतीय नागरिकांशी संपर्क होउ शकलेला नाही. द इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिले आहे.डॉ. मिलिंद चितळे यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय व्यवसाय बाजूला ठेवून गिर्यारोहणाला आपले आयुष्य समर्पित केले होते. मुंबईतील हिल्स अँड ट्रेल या त्यांच्या ट्रेकिंग संस्थेच्या माध्यमातून सुमारे ४० भाविकांचा समूह कैलास-मानसरोवर यात्रेसाठी गेला होता. या गटामध्ये डॉ. चितळे, त्यांच्या पत्नी जान्हवी चितळे आणि मुंबईतील अनेक नामांकित नागरिक सहभागी होते. महापुरानंतर या संपूर्ण समूहाशी असलेला संपर्क तुटला आहे. बेपत्ता असलेल्या भाविकांमध्ये मुंबईतील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ गायत्री देशपांडे आणि त्यांचे पती तसेच हिंदुजा रुग्णालयातील रक्तशास्त्र विभागाचे प्रमुख आनंद देशपांडे यांचा समावेश आहे. याशिवाय नागपूरचे ६८ वर्षीय सुनील सुभेदार आणि ६४ वर्षीय चेतना गुप्ता यांच्यासारख्या अनेक ज्येष्ठ नागरिकांचाही या गटात समावेश आहे. डा. देशपांडे दांपत्याची भाची मैथिली मुंदडे यांनी सांगितले, रविवारनंतर आमचा



त्यांच्याशी कोणताही संपर्क झालेला नाही. आम्ही सतत फोन लावण्याचा प्रयत्न करत आहोत, परंतु संपर्क होउ शकत नाहीये. त्यांचा मुलगा अमेरिकेत असतो, त्याच्याशीही बोलणे होउ शकलेले नाही.

**प्रवासाची आवड अन् ३ हजार ट्रेक्सचा अनुभव-** डा. मिलिंद चितळे (वय ६० हून अधिक) यांनी १९८३ मध्ये ग्रँट मेडिकल कालेजमधून एमबीबीएस पूर्ण केले होते. मात्र, निसर्ग आणि गिर्यारोहणाच्या आवडीमुळे त्यांनी १९९७ मध्ये हिल्स अँड ट्रेलची स्थापना केली. त्यांनी हिमालयात ३,००० हून अधिक ट्रेक्स आणि मोहिमा पूर्ण केल्या असून कांचनजंगा पर्वतावर २३,००० फुटांपर्यंत चढाई केली आहे. पर्वत बचाव तंत्र आणि प्रथमोपचारावर त्यांनी पुस्तकही लिहिले असून २००५ मध्ये त्यांना गिरिमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी आतापर्यंत २५ हून अधिक वेळा कैलास-मानसरोवर यात्रा यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

**कुटुंबीयांची चिंता वाढली; शोधमोहीम सुरू-** नागपूरचे सुनील सुभेदार यांचे सुपुत्र स्वानंद सुभेदार यांनी सांगितले की, २६ ऑगस्ट रोजी वडिलांशी शेवटचे बोलणे झाले होते. ते तिमुरे येथे होते आणि चीनच्या सीमेकडे जाण्याच्या तयारीत होते. त्यानंतर त्यांचा मोबाईल बंद येत आहे.तर दुसरीकडे, बेपत्ता असलेल्या चेतना गुप्ता यांचे पती आनंद गुप्ता यांनी सांगितले की, इमिग्रेशन सेंटरजवळ असताना चेतनाशी संवाद झाला होता. एका सहप्रवाशाचा पासपोर्ट काठमांडूमध्ये राहिल्यामुळे ते सर्वजण थांबले होते. त्यानंतर संपर्क तुटला. सध्या गुप्ता कुटुंबातील तीन सदस्य माहिती घेण्यासाठी काठमांडूमध्ये दाखल झाले आहेत.नेपाळमधील स्थानिक प्रशासन आणि बचाव पथके पूरग्रस्त भागात मदत व बचाव कार्य राबवत आहेत. भारतीय दूतावास देखील नेपाळ सरकारचे सतत संपर्कात असून बेपत्ता भारतीयांचा शोध घेण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत.

## नेपाळवर पुन्हा महाभयंकर संकट! कधीही फुटू शकते सरोवर

**काठमांडू /वृत्तसंस्था-** नेपाळमध्ये नुकत्याच आलेल्या महापुरानंतर लेंडे नदीवरील नव्याने तयार झालेले हिमनदी सरोवर कधीही फुटू शकते, असा इशारा चीनने दिला आहे. सरोवरातील पाण्याचा रंग गडद होत असून, ते वेगाने वाढत आहे. या स्फोटामुळे प्रति




सेकंद ५०० घनमीटर पाणी वाहून मोठे नुकसान होउ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.मीडिया रिपोर्ट्स नुसार, चीनने ही माहिती सर्वात आधी नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाशी शेअर केली आहे. पाण्याचा रंग सातत्याने गडद होत आहे. हा धोक्याचा इशारा आहे. याचा अर्थ सरोवर कधीही फुटण्याचे संकेत मिळत आहे, असे चीनने नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाला दिलेल्या संदेशात म्हटले आहे.

या आठवड्यात नेपाळ आणि तिबेटमध्ये आलेल्या भीषण फ्लॅश फ्लडनंतर हे सरोवर तयार झाले आहे. ग्लेशियर तुटल्याने मोठा ढिगारा खाली आला. या प्रचंड ढिगा-यामुळे नदीचा मार्ग बंद झाला. त्यामुळे एक नैसर्गिक बांध तयार झाला. त्याच्या मागे पाणी जमा होउ लागल्याने मोठं सरोवर तयार झाले.हे सरोवर चीनच्या जवळ चोचेन नदी आणि नेपाळच्या दिनेशने पुरेपू नदीच्या संगमावर बनले आहे. चीनच्या जलसंसाधन मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सरोवरात पाण्याचा स्तर सातत्याने वाढत आहे. शुक्रवारी यात आतापर्यंत सुमारे २५ लाख घन मीटर पाणी जमा झाले आहे. धोका पाहता चीनने खालच्या परिसरात राहणा-या लोकांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

## सप्टेंबरच्या सुरूवातीलाच पावसाचा जोर वाढणार

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्रात यंदा मान्सूनची वाटचाल अपेक्षेप्रमाणे झालेली नसताना सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ४ आणि ५ सप्टेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर मराठवाड्याच्या काही भागांत



पावसाचे प्रमाण वाढण्याचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा पावसाची स्थिती कमकुवत होण्याची शक्यता असून, १० ते २४ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रात पाउस सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ विभागांमध्ये पावसाची मोठी तूट कायम आहे. मराठवाड्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २७ टक्के कमी, तर विदर्भात २४ टक्के कमी पाउस नोंदवला गेला आहे. जून आणि जुलै महिन्यात देखील पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची तूट आहे. ऑगस्ट महिन्यातही पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने सप्टेंबरमधील काही दिवसांच्या पावसाकडे शेतक-यांचे लक्ष लागले आहे.

**पूर्व विदर्भाला यलो अलर्ट-** दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिंगोली, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पाउस पडण्याचा अंदाज आहे. उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता आहे. पश्चिम बंगाल आणि बांगलादेशच्या किना-यालगत समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वा-यांची स्थिती निर्माण झाली आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे पश्चिम बंगाल आणि ओडिशाच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम पुढील काही दिवसांत मध्य भारतातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान पूर्व भारतात चांगला पाउस राहण्याची शक्यता आहे.

## 2050 पर्यंत हिमालयातील हिमनद्या 35-45 टक्क्यांनी घटण्याची शक्यता

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** नेपाळ आणि हिमालयाच्या पट्ट्यात हिमनद्या अत्यंत वेगाने वितळत आहेत. एका नव्या अहवालानुसार, २०५० पर्यंत गंगा आणि ब्रह्मपुत्रा नद्यांच्या खो-यातील हिमनद्या ३५ ते ४५ टक्क्यांनी



कमी होउ शकतात. यामुळे भविष्यात हिंदुस्थानातील अनेक राज्यांना आधी महापूर आणि त्यानंतर भीषण पाणीटंचाई अशा दुहेरी संकटाचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, गेल्या ३० वर्षांत नेपाळमधील तब्बल एक तृतीयांश बर्फ वितळून नष्ट झाला आहे. आधीच्या दशकाच्या तुलनेत गेल्या दशकात हिमनद्या वितळण्याचा वेग ६५ टक्क्यांनी वाढला आहे. हिमनद्या वितळल्यामुळे सुरुवातीच्या काळात नद्यांना मोठे पूर येतील, तर दीर्घकाळात पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होईल. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि आसाम या राज्यांना याचा सर्वाधिक फटका बसेल.

**हिमालयातील तापमानवाढीचा वेग दुप्पट-** फायनान्शियल टाइम्सच्या अहवालानुसार, हिमालयाच्या पट्ट्यात तापमान वाढीचा वेग जगाच्या सरासरीपेक्षा जवळपास दुप्पट आहे. वाढत्या तापमानामुळे केवळ हिमनद्याच वितळत नाहीत, तर पर्वतांचा कणा समजला जाणारा पर्माफ्रास्ट कमकुवत होत आहे. यामुळे डोंगराळ भागात भूस्खलन, हिमकलन आणि अचानक पूर येण्याचा धोका वाढला आहे. पोर्टस्माउथ युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एन्व्हायर्नमेंट, भूगोल आणि भूगर्भशास्त्रातील डा. क्लेअर बोस्टन यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिमनद्या अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने वितळत आहेत. हिमनद्या आणि वितळलेल्या बर्फाचे एकूण प्रमाण पाहिले, तर ते अंदाजापेक्षा जास्त असल्याचे संशोधनात समोर आले आहे. पृथ्वीवरील बर्फ वितळल्यास जगबुडी होण्याचा धोका आहे.

## चित्रकूटमध्ये मंदाकिनी नदीनं मोडला 23 वर्षापूर्वीचा रेकॉर्ड; 2 राज्य अलर्टवर

**चित्रकूट /वृत्तसंस्था :** उत्तर प्रदेशच्या चित्रकूट जिल्ह्यात सातत्याने होणा-या पावसामुळे मंदाकिनी नदीने रौद्ररूप धारण केले आहे. नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली असून मागील २३ वर्षाचा रेकॉर्ड मोडला आहे. २००३ साली नदीच्या पाणी पातळीत १३४ सेंटीमीटर वाढ झाली होती. त्यानंतर यंदा १३४.०२ सेंटीमीटरपर्यंत पाणी पोहचले आहे.मंदाकिनी नदीच्या वाढत्या प्रवाहामुळे उत्तर प्रदेश-मध्य प्रदेश सीमेवरील रामघाट पूर्णपणे पुराच्या वेढ्यात अडकला आहे. या घाटावर शेकडो दुकाने पाण्यात बुडाली आहेत. अनेक मठ, मंदिरात पाणी शिरले आहे. परिस्थिती इतकी भयावह आहे की, लोक आपला जीव वाचवण्यासाठी घराच्या छतावर बसले आहे. प्रशासन इथल्या लोकांना सुरक्षित स्थळी नेण्याचा प्रयत्न करत आहे. नदीची पाणी पातळी वाढल्याने रामघाटात हनुमानधाराकडे जाणा-या मार्गावर बनलेला पुलही पाण्यात वाहून गेला आहे.



चित्रकूटहून मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्याकडे जाणा-या मार्गावरही पाणी साचले आहे. ज्या रस्त्यावर आधी वाहने धावायची तिथे बोटींची मदत घ्यावी लागत आहे. बोटीच्या मदतीने पुरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले जात आहे. मंदाकिनी नदीचे पाणी यूपी-एमपी सीमेवरील मोठ्या भागात पसरले आहे. उत्तर प्रदेशातील तरौंहा, गोबरिया, बहादूरसह अनेक गावे प्रभावित झाली आहेत. पुराच्या पाण्यात शेकडो लोक अडकलेत. जिल्हा प्रशासन आणि रेस्क्यू पथकाकडून या लोकांना बाहेर काढले जात आहे. या पुरामुळे दोन्ही राज्यातील प्रशासन अलर्ट मोडवर आहे.

दरम्यान, पुराची स्थिती पाहून प्रशासनाने घाटांवर आणि पाणी भरलेल्या परिसरात जाण्यापासून लोकांना मज्जाव केला आहे. लोकांनी सुरक्षितस्थळी जावे असं आवाहन प्रशासन करत आहे. पुरात अडकलेल्या लोकांसाठी खाण्यापिण्याची आणि राहण्याची सोय केली जात आहे. अधिका-यांची टीम पुरक्षेत्रावर नजर ठेवून आहे. या संकटप्रसंगी एनडीआरएफच्या ४ टीम, एसडीआरएफच्या ४ टीम आणि इतर यंत्रणा काम करत आहेत. पुरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यावर प्राधान्य दिले जात आहे. मध्य प्रदेश प्रशासनाने हेलिकाप्टरच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले आहे.

## जातिनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम हवा; अनिल देशमुखांची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी-** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मनोज जरांगे पाटील यांनी जात पडताळणी समित्या रद्द करण्याची मागणी केली आहे. यावर बोलताना, ओबीसी समाजाच्या जातीचा स्वतंत्र क?लम प्रश्नावलीत असायला हवा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी केली आहे.मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले असून मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी ते उपोषण करत आहेत. यावरही अनिल देशमुख यांनी भूमिका मांडली. जरांगे पाटील यांच्या काही मागण्या असून त्या मागण्यांवर सरकारने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक असल्याचे देशमुख म्हणाले. आंदोलकांच्या मागण्यांबाबत सरकारने काय निर्णय घेतला आहे, कोणत्या मागण्या मान्य करता येतील आणि कोणत्या मागण्यांबाबत अडचणी आहेत, हे सरकारने स्पष्टपणे सांगावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाकडूनही स्वतंत्र आंदोलन सुरू असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न हाताळताना सरकारने अत्यंत काळजीपूर्वक आणि सर्व घटकांना विश्वासात घेउन निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट झाले.

अनिल देशमुख यांनी केंद्र सरकारच्या जातिनिहाय जनगणनेच्या प्रश्नावलीवर गंभीर आक्षेप घेतला. प्रश्नावलीमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी स्वतंत्र रकाने आहेत; मात्र इतर मागासवर्गीय समाजासाठी



स्वतंत्र जातनिहाय रकाना नसल्याचे त्यांनी सांगितले. देशमुख यांच्या मते, ओबीसी समाजामध्ये अनेक जातींचा समावेश होतो. त्यामुळे ओबीसीसाठी स्वतंत्र रकाना ठेवून त्यामध्ये संबंधित जातीची नोंद केली गेली, तर देशातील ओबीसी समाजाची वास्तविक जातनिहाय लोकसंख्या स्पष्ट होउ शकते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाची कोअर कमिटीची बैठक मुंबईत पार पडत असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबत चर्चा होणार असल्याच्या राजकीय चर्चांना उधाण आले होते. मात्र, या चर्चांना अनिल देशमुख यांनी स्पष्टपणे नकार दिला. नाशिकच्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कथित बोगस भरती प्रकरणावरूनही अनिल देशमुख यांनी सरकारवर हल्लाबोल केला. कुंभमेळ्यात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून बेरोजगार तरुणांना गंडवण्याचा प्रकार समोर आल्याचा दावा त्यांनी केला. देशमुख यांच्या मते, बेरोजगार तरुणांकडून नोकरीच्या नावाखाली पैसे किंवा कागदपत्रे घेउन त्यांची फसवणूक केली जात असेल, तर हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून केवळ छोट्या पातळीवरील व्यक्तींवर कारवाई न करता त्यामागील सूत्रधारांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. जोपर्यंत या प्रकरणातील सूत्रधारांचा पर्दाफाश होत नाही, तोपर्यंत विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही, अशा आशयाची भूमिका देशमुख यांनी मांडली. नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या तरुणांना सरकारी भरती, परीक्षा आणि विविध प्रकल्पांच्या नावाखाली फसवले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे नाशिकमधील कथित भरती प्रकरणाची पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

## समृद्धी महामार्गावर चोरट्यांचा धुमाकूळ

**नागपूर :** समृद्धी महामार्गावरील मुंबई व नागपूर कारिडारवर दरोडेखोरांच्या टोळीने धुमाकूळ घालत एकाच वेळी तीन गाड्यांना टार्गेट केले. रस्त्यावर धारदार वस्तू व खिळे फेकून लुटारूंनी श्रीकांत मिश्रा, पांडुरंग माने आणि मोहम्मद फरान यांच्या वाहनांचे टायर पंक्चा केले. वाहने थांबताच १० अज्ञात भामट्यांनी दगडफेक करत मिश्रा व माने यांच्याकडील मौल्यवान ऐवज बळजबरीने लुटला. तर अरिहन लानी यांनी गाडी न थांबवता पळ काढून स्वतःचा बचाव केला.

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर प्रवास करणा-या तरुणाला अडवून त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून नेल्याची घटना समोर येत आहेत. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एफआयआरनुसार, साहिल सतीश सोनवणे (वय २२) हे २६ ऑगस्ट रोजी नागपूरहून मुंबईच्या दिशेने समृद्धी महामार्गावरून प्रवास करत होते. दुपारी सुमारे ४.१० वाजता मुंबई कारिडारमधील एक्झिट क्रमांक १८ जवळील टोलनाक्याच्या परिसरात त्यांची गाडी थांबवण्यात आली.यावेळी एका सेल्टोस गाडीने त्यांची गाडी अडवली, तक्रारीनुसार, चार जणांनी सोनवणे यांच्या गाडीच्या दिशेने येत त्यांच्याशी वाद घातला. त्यानंतर एका व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून घेतली. या झटापटीत सोन्याची चेन तुटून आरोपी ती घेउन पसार झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. हिसकावून नेलेल्या सोन्याच्या चेनची किंमत सुमारे १ लाख ५० हजार रुपये असल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे.

## कुंभमेळ्याच्या बजेटमधून २५ हजार कोटींची ऊधळपट्टी

### खा.संजय राउतांचे सरकारवर गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी-** नाशिकमध्ये होउ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात २५ हजार कोटींची उधळपट्टी होत आहे. विकासकामांच्या निमित्ताने मोठा भ्रष्टाचार होत आहे, असा गंभीर आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी शनिवारी (२९ ऑगस्ट) केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी (२८ऑगस्ट) नाशिकमध्ये होते. त्यावेळी त्यांच्या सभेला उपस्थिती पाहिली तर नाशिककरांनी मुख्यमंत्र्यांच्या मेळाव्यावर, भाषणावर बहिष्कार टाकल्याचे दिसून येईल, असाही दावा संजय राउत यांनी केला



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत म्हणाले, मुख्यमंत्र्यांकडे आता लोकांनी गांभीर्याने पाहणे सोडले. कुंभमेळ्याचे योग्य नियोजन नसल्याने नाशिकमध्ये कशीही कामे सुरू आहेत आणि नाशिकरांचे हाल होत आहेत, असा आरोप राउत यांनी केला.

कुंभमेळ्याच्या भ्रष्टाचारावर केवळ विरोधकच टीका करत नाही तर साधूही टीका करत आहेत, असे संजय राउत यांनी सरकारला सुनावले. नाशिकमध्ये कुंभमेळ्याच्या निमित्ताने जे ४५ हजार कोटी रुपये बजेट आहे त्यातील किमान २५ हजार कोटी रुपये कुंभमेळा मंत्री आणि त्यांचे अधिकारी उडवणार आहेत. याची सुरुवात झाली आहे, असा गंभीर आरोप यावेळी खासदार संजय राउत यांनी केला. सरकारला नाशिकमधील खड्डे दिसत नाहीत का? या खड्ड्यांनी घेतलेले बळी दिसत नाहीत का? असे सवाल राउत यांनी केले. या सरकारची अवस्था महात्मा गांधीजींच्या तीन माकडांप्रमाणे झाली आहे. गांधीजींची माकडे नितीमत्तेची होती. यांची वेगळी आहे. या माकडांना भ्रष्टाचार दिसत नाही, ते भ्रष्टाचारावर बोलणार नाही आणि भ्रष्टाचार पाहात नाहीत. त्यामुळे सरकार काय करत आहे, असा सवाल राउत यांनी उपस्थित केला.

जे मुख्यमंत्री राम मंदिरातील दानचोरीवर बोलत नाहीत त्यांना कुंभमेळ्यातील भ्रष्टाचारावर बोलण्याचा अधिकार नाही, असा घणाघाती आरोप यावेळी संजय राउत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला. ज्यांनी अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटी लुटली त्यांचेच तुम्ही वारसदार आहात, असा टिकेचा आसडून राउत यांनी ओढला.

**मुख्यमंत्र्यांना खोटे बोलण्यासाठी डिग्री द्यावी लागेल-** नाशिकमधील कामांमध्ये कसलेही नियोजन नाही, फक्त टेंडर काढून कंत्राटदारांना कामे देणे एवढेच यांचे काम आहे. १० वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी नाशिक शहराला दत्तक घेतले होते हे ते विसरले. तेव्हापासून नाशिक शहराची दुर्दशा झाली आहे. त्यामुळे यांना मुख्यमंत्री फडणवीसांना खोटे बोलण्यासाठी डिग्री द्यावी लागेल जशी दिल्ली विद्यापीठाने पंतप्रधान नरेंद्र मोदींना मास्टर डिग्री इन एन्टायर पालिटिक्स दिली होती, असे टीकास्त्र संजय राउत यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विश्वास तुटला, उत्तरदायित्व हवे!

देशात पेपरफुटीसंदर्भात एकामागून एक प्रकरणे समोर येत आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, झारखंड आणि महाराष्ट्रात उघडकीस आलेल्या परीक्षा गैरव्यवहारांनी पेपरफुटीचे अर्थकारण आणि त्यातील जटिल गुंतागुंत देशासमोर आली. महाराष्ट्रात शिक्षक भरती परीक्षेची प्रश्नपत्रिका विकणारी टोळी पोलिसांनी पकडली. 'नीट' परीक्षेवेळी काही तज्ज्ञांनी ही परीक्षा 'एनटीए'ऐवजी केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच यूपीएससीकडून आयोजित करावी अशी शिफारस केंद्र सरकारला केली होती. संविधानातील कलम ३१५ ते ३२३ मध्ये केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोगांची तरतूद आहे. राजकीय सत्तेपासून तुलनेने स्वतंत्र, गुणवत्ताधारित आणि देशभरातील उमेदवारांना समान संधी देणारी निवड व्यवस्था हा भारतीय प्रशासकीय रचनेचा मूलभूत आधार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे घटनात्मक मूळही याच व्यवस्थेत आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर हा आयोग अस्तित्वात आला असून तो घटनात्मक आहे. राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, वनसेवा तसेच विविध गट अ आणि गट ब पदांसाठी अधिकारी निवडण्याची महत्त्वाची जबाबदारी आयोगावर आहे. गुणवत्ता, स्पर्धा आणि समान संधीच्या आधारावर प्रशासनात प्रवेश मिळू शकतो, या विश्वासाचे तो प्रतीक आहे; परंतु एमपीएससीच्या औषध निरीक्षक गट ब भरती परीक्षेलाही पेपरफुटीची वाळवी लागावी, हे चिंताजनक आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित आयोगाच्याच अधिकाऱ्यांना अटक झाल्याने कुंपण शेत खात आहे, हे पुन्हा सिद्ध झाले. यातून आयोगाच्या अंतर्गत व्यवस्थेची अभेद्यता किती, हा मूलभूत प्रश्न उभा राहिला आहे. या प्रकरणात सहा जणांना अटक केली असून त्यात आयोगाच्या अवर सचिवासह ३ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ही परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी झाली. १२ जूनला निकाल जाहीर झाला आणि ५०६ उमेदवार मुलाखतीस पात्र ठरले. पैकी ४८८ जणांच्या मुलाखती झाल्याचे वृत्त आहे; मात्र परीक्षेच्या २ दिवस आधीच काही प्रश्न विशिष्ट उमेदवारांपर्यंत पोहोचल्याच्या तक्रारी पुढे आल्या आणि आयोगाला संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घ्यावा लागला. तज्ज्ञांनी तयार केलेल्या प्रश्नसंचातून कथितरीत्या प्रश्न बाहेर काढून स्वतंत्र संच तयार केला आणि तो विकल्याचा तपास यंत्रणांचा आरोप आहे.एका उमेदवाराला मिळालेल्या ९१ प्रश्नांपैकी ७७ प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्या उमेदवाराने गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांक मिळवला होता आणि प्रश्न मिळवण्यासाठी त्याच्या वडिलांनी पाच लाख रुपये दिल्याचा पोलिसांचा दावा आहे. आता २०० पैकी १२० पेक्षा अधिक गुण मिळवलेल्या उमेदवारांची तसेच नंदुरबार आणि परिसरातील काही उमेदवारांची कामगिरी तपासली जात आहे. सध्या एकच लाभार्थी निश्चित झाला आहे. तपासाची व्याप्ती वाढवली आहे. अन्य उमेदवारांना पुरावा नसताना संशयित ठरवणे चुकीचे ठरेल; पण प्रश्नपत्रिकेचा बाजार एका व्यक्तीपुरता होता की त्यामागे संघटित जाळे होते, हे शोधणे अत्यावश्यक आहे.या प्रकरणातील प्रेमाचा अँगल रंजक आहे. संबंधित उमेदवाराने प्रश्नांचा संच मैत्रीणीला पाठवला. त्यानंतर दोघांचे वैयक्तिक संबंध बिघडले आणि तक्रार आयोगापर्यंत पोहोचली; पण वाद झाला नसता, तर हा प्रकार उघड झाला असता का, हा अस्वस्थ करणारा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण, व्यवस्थेतील गैरप्रकार पकडण्याची यंत्रणा योगायोगावर अवलंबून असेल, तर ती सुरक्षा व्यवस्था म्हणता येणार नाही. जुलैमध्ये आरोप पुढे आले तेव्हा आयोगाने पेपर फुटल्याचा पुरावा नसल्याचे सांगत हात वर केले होते. आता आयोगाशी संबंधित अधिकाऱ्यांनाच अटक झाली. 'चूक कधीच होत नाही' असे म्हणून कोणत्याही संस्थेची विश्वासार्हता निर्माण होत नाही. चूक किंवा संशय निर्माण झाल्यावर ती संस्था किती वेगाने, पारदर्शक चौकशी करते, स्वतःची अग्निपरीक्षा देण्यासही कचरत नाही, त्यावर विश्वासार्हतेची भिंत उभी राहते. डिजिटल सुरक्षा, नियंत्रित प्रवेश आणि तपासणीच्या आधुनिक सुविधा उपलब्ध असताना पुन्हा संस्थेच्या आतूनच गळती झाल्याचा आरोप होणे अधिक चिंताजनक आहे.दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्ग प्रतिबंध) अधिनियम, २०२४ हा कायदा राज्य सरकारने आणला. यानुसार परीक्षेत अनुचित मार्गाचा अवलंब करणाऱ्या व्यक्तीस ३ ते ५ वर्षांचा कारावास आणि १० लाखांपर्यंत दंडाची तरतूद आहे. सेवा पुरवठादारासाठी १ कोटीपर्यंत दंड आणि परीक्षेचा खर्च वसूल करण्यासह इतर कठोर तरतुदी आहेत. ते आवश्यकच; पण प्रश्नपत्रिकेची किंमत लाखांत मोजणाऱ्यांना पकडण्याची शक्यता नगण्य वाटत असेल, तर शिक्षेची भीती कागदावरच राहते. अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोगाच्या सर्व परीक्षांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा केली. यापूर्वीच्या परीक्षा गैरप्रकारांनंतरही समित्या, चौकशा आणि तांत्रिक सुधारणा झाल्या. यावेळी सरकारने प्रश्नपत्रिका निर्मितीपासून परीक्षा सुरू होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचे स्वतंत्र सुरक्षा परीक्षण करायला हवे. संवेदनशील पदांवर दीर्घकाळ एकाच कर्मचाऱ्याची नियुक्ती टाळणे, दुहेरी प्रमाणीकरण, 'नीड-टू-नो?' प्रवेश, बाह्य सायबर सुरक्षा लेखापरीक्षण आणि संशयास्पद गुणपद्धती शोधणारे डेटा विश्लेषण या बाबी आता ऐच्छिक राहिलेल्या नाहीत.कोचिंग क्लासेस आणि परीक्षा व्यवस्थेतील व्यक्ती यांच्यातील संभाव्य आर्थिक संबंधांचीही स्वतंत्र चौकशी आवश्यक आहे. एखाद्या प्रशिक्षण संस्थेकडे परीक्षेपूर्वी प्रश्न पोहोचत असतील, तर त्या संस्थेचे विद्यार्थी, आर्थिक व्यवहार, डिजिटल संपर्क आणि पूर्वीच्या परीक्षांतील असामान्य निकाल तपासणे रास्त आहे. अर्थात, ही तपासणी पुराव्यावर आधारित असली पाहिजे. आज परीक्षांमधील गैरप्रकारांची सर्वाधिक झळ प्रामाणिक उमेदवारांना सोसावी लागत आहे. महिनोन महिने अभ्यास, पुणे-मुंबईतील निवासाचा खर्च, शिकवणी, पुस्तके, प्रवास, परीक्षा, त्यानंतर मुलाखत आणि अखेरीस संपूर्ण भरतीच रद्द या प्रत्येक टप्प्याला तरुणाच्या आयुष्यातील अत्यंत मोलाचा वेळ जोडलेला असतो. आयोगाने फेरपरीक्षेसाठी पुन्हा अर्ज किंवा शुल्क आवश्यक नसल्याचे सांगितले आहे; पण गेलेल्या पाच महिन्यांचा काळ उमेदवारांना परत देता येणार नाही. तसेच पुढील परीक्षा निर्धोक पार पडेलच, याची खात्री देण्याची क्षमता सदर परीक्षा व्यवस्थेत कुणाकडेही नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. राज्य लोकसेवा आयोगाने आजवर जपलेल्या गरिमेला मोठे भगदाड याच व्यवस्थेतील नतद्रष्टांनी आणि गद्दारांनी पाडले आहे. तुटलेला धागा गाठ मारल्यानंतर जोडला जातो; पण अखंड होत नाही, गाठ तशीच राहते. तशाच प्रकारे राज्य लोकसेवा आयोग भविष्यात याबाबत कठोर उपाययोजना करेलही; पण हा जिद्दी डाग धुतला जाणार नाही.

# समुद्राच्या गाभ्यातील अदृश्य विष



विशाल महासागर दुरून जितके स्वच्छ, अथांग आणि शांत दिसतात, तितकीच चिंताजनक कहाणी त्यांच्या खोल गर्भात दडली आहे. एकेकाळी पृथ्वीवरील सर्वात सुरक्षित नैसर्गिक अधिवास मानले जाणारे समुद्र आता रासायनिक प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहेत. ते शेकडो वर्षे नष्ट होत नाही. या प्रदूषणापासून व्हेल आणि डॉल्फिनसारखे विशाल सागरी सस्तन प्राणीही सुरक्षित राहिलेले नाहीत. समुद्र म्हणजे जीवनाचा उगम, जैवविविधतेचा अथांग खजिना आणि पृथ्वीच्या हवामान संतुलनाचा सर्वात महत्त्वाचा आधार. पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भूभाग व्यापणारे महासागर केवळ पाण्याचे साठे नाहीत, तर महाप्रचंड जीवसृष्टीचे आश्रयस्थान आहेत. मानवाने औद्योगिक प्रगतीच्या नावाखाली गेल्या शतकभरात निसर्गावर केलेल्या प्रयोगांचे सर्वाधिक दुष्परिणाम आता समुद्रांच्या तळाशी जमा होत आहेत. प्लास्टिक प्रदूषण, तेलगळती, सांडपाणी आणि रासायनिक कचरा या संकटांमध्ये आता 'पीएफएएस' किंवा 'फॉरएव्हर केमिकल्स' या आणखी एका अदृश्य शत्रूची भर पडली आहे. हे असे कृत्रिम रसायन आहे, जे एकदा पर्यावरणात गेले, की सहज नष्ट होत नाही. त्याची उपस्थिती शेकडो वर्षे टिकू शकते आणि परिणाम अनेक पिढ्यांपर्यंत जाणवू शकतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या जागतिक अभ्यासात व्हेल आणि डॉल्फिनसारख्या सागरी सस्तन प्राण्यांच्या शरीरात या रसायनांचे वाढते प्रमाण आढळल्याने जगभरातील पर्यावरण अभ्यासक चिंतेत आहेत. महासागराच्या सर्वात वरच्या अन्नसाखळीमध्ये असलेल्या या प्राण्यांच्या शरीरात इतक्या मोठ्या प्रमाणावर विषारी रसायने साठत असतील, तर समुद्रातील संपूर्ण परिसंस्थेच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह उभे राहणे स्वाभाविक आहे.

'पीएफएएस' म्हणजे पर आणि 'पॉलीफ्लुओरोअल्किल पदार्थ'. ही रसायने पाणी, तेल आणि उष्णतेला प्रतिरोधक असल्यामुळे त्यांचा वापर नॉन-स्टिक भांडी, जलरोधक कपडे, खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंग, अग्निशमनासाठी वापरले जाणारे फोम, सौंदर्यप्रसाधने आणि अनेक औद्योगिक उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. या रसायनांचा सर्वात मोठा दोष म्हणजे त्यांचे रासायनिक बंध अत्यंत मजबूत असतात. त्यामुळे ती नैसर्गिक प्रक्रियेत विघटित होत नाहीत. म्हणूनच त्यांना 'फॉरएव्हर केमिकल्स' असे नाव देण्यात आले आहे. औद्योगिक सांडपाणी, कारखान्यांमधील रासायनिक कचरा, महानगरांमधील सांडपाणी आणि अग्निशमनासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांद्वारे 'पीएफएएस' नद्यांमध्ये पोहोचतात. नद्या हा सर्व कचरा शेवटी समुद्रात आणून सोडतात. समुद्रात गेल्यानंतर ही रसायने सूक्ष्म प्लँक्टन, शिंपले, लहान मासे, मोठे मासे आणि अखेरीस व्हेल व डॉल्फिनसारख्या सर्वोच्च भक्षकांच्या शरीरात जमा होत जातात. या प्रक्रियेला जैवसंचयन आणि जैववृद्धी असे म्हटले जाते. अन्नसाखळीच्या प्रत्येक टप्प्यावर या रसायनांची एकाग्रता वाढत जाते. परिणामी, सर्वात वरच्या स्तरावरील सागरी जीवांमध्ये त्याचे प्रमाण सर्वाधिक आढळते. ही बाब केवळ सागरी प्राण्यांपुरती मर्यादित नाही. कारण मानवही या अन्नसाखळीचा भाग आहे. समुद्री मासे आणि इतर सागरी खाद्यपदार्थांद्वारे ही रसायने मानवी शरीरातही प्रवेश करतात.

> **समुद्राचे वाढते तापमान, आम्लीकरण, प्लास्टिक प्रदूषण आणि अतिमासेमारी यामुळे सागरी परिसंस्था कमकुवत झाली आहे. त्यात 'फॉरएव्हर केमिकल्स'ची भर पडणे हे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. समुद्रामध्ये अमर्याद कचरा सामावून घेण्याची क्षमता आहे, हा समज आता पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. समुद्र सर्व काही गिळून टाकतो; पण ते नष्ट करत नाही. उलट ते प्रदूषण अन्नसाखळी-मार्फत आपल्या ताटात परत येते.**

### भारतासाठी महत्वाचा विषय

जगातील अनेक देशांमध्ये मानवी रक्त, यकृत आणि अगदी नवजात बालकांच्या शरीरातही 'पीएफएएस'चे अंश आढळले आहेत. वैज्ञानिक संशोधनानुसार या रसायनांमुळे कर्करोग, थायरॉइडचे विकार, हार्मोनल असंतुलन, यकृताचे आजार, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे, वंध्यत्व आणि गर्भाच्या विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न राहिला नसून सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर विषय बनला आहे. व्हेल आणि डॉल्फिनच्या संदर्भात परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. हे सस्तन प्राणी मानवी जीवनाप्रमाणेच दीर्घायुषी असतात. त्यांच्या शरीरात वर्षानुवर्षे साठणारी विषारी रसायने सहज बाहेर पडत नाहीत. विशेष म्हणजे मादी प्राणी गर्भधारणेदरम्यान आणि स्तनपानाच्या काळात ही रसायने आपल्या पिलांकडे हस्तांतरित करतात. म्हणजेच नव्या पिढीचा जन्मच प्रदूषणाच्या वारशासह होतो. ही बाब पर्यावरणीय न्यायाच्या संकल्पनेलाच आव्हान देणारी आहे. आपण निर्माण केलेल्या प्रदूषणाची शिक्षा निरपराध जीवांना आणि त्यांच्या पुढील पिढ्यांना भोगावी लागत आहे. भारतासाठी हा विषय विशेष महत्त्वाचा आहे. आपल्या देशाची सुमारे साडेसात हजार किलोमीटर लांबीची किनारपट्टी, विशाल सागरी जैवविविधता आणि मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेली लाखो कुटुंबे या सर्वांवर या प्रदूषणाचा परिणाम होऊ शकतो. दुर्दैवाने भारतात 'पीएफएएस' संदर्भातील संशोधन अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे.

### कठोर नियमांची आवश्यकता

काही औद्योगिक भागांमध्ये आणि नद्यांमध्ये या रसायनांचे अस्तित्व आढळले असले, तरी सागरी परिसंस्थेवर त्याचा नेमका किती परिणाम झाला आहे, याबाबत व्यापक माहिती उपलब्ध नाही. हीच सर्वात मोठी चिंता आहे. दिसत नाही ते अस्तित्वात नाही, असा समज धोकादायक ठरू शकतो. भारत औद्योगिकीकरणाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. रासायनिक उद्योग, वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स आणि संरक्षण क्षेत्रात 'पीएफएएस'चा वापर विविध स्वरूपात होत असल्याची नोंद आहे. त्यामुळे उत्पादनासोबतच या रसायनांच्या व्यवस्थापनाचे कठोर नियम तयार करणे आवश्यक आहे. विकसित देशांनी या संदर्भात काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. युरोपीय महासंघाने अनेक 'पीएफएएस' रसायनांवर बंदी किंवा कठोर निर्बंध लागू केले आहेत. अमेरिकेतही काही राज्यांनी स्वतंत्र कायदे करून त्यांचा वापर मर्यादित केला आहे. या उपाययोजनांमुळे काही भागांमध्ये या रसायनांचे प्रमाण कमी होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. यावरून योग्य धोरणे आणि प्रभावी अंमलबजावणी केल्यास बदल घडवून आणणे शक्य असल्याचे स्पष्ट होते. भारतातही पर्यावरणीय कायदे अधिक सक्षम करण्याची गरज आहे. उद्योगांना सांडपाण्यावर अत्याधुनिक प्रक्रिया करणे बंधनकारक करणे, 'पीएफएएस' युक्त उत्पादनांवर स्पष्ट लेबलिंग करणे, पर्यावरणीय निरीक्षण यंत्रणा मजबूत करणे आणि या रसायनांच्या वापराला पर्याय विकसित करणे आवश्यक आहे. संशोधन संस्थांना, विद्यापीठांना आणि पर्यावरण प्रयोगशाळांना यासाठी विशेष प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

### जागतिक सहकार्याची गरज

या समस्येचा आणखी एक पैलू म्हणजे ग्राहकांची भूमिका. आपण रोज वापरत असलेल्या अनेक वस्तूंमध्ये 'पीएफएएस' असू शकतात. नॉन-स्टिक भांडी, जलरोधक कपडे किंवा काही खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग वापरताना त्यामागील पर्यावरणीय किंमत आपल्याला माहिती नसते. पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याची तयारी समाजात निर्माण झाली, तर उद्योगांनाही आपली उत्पादन पद्धती बदलावी लागेल. आज गरज आहे ती जागतिक सहकार्याची. प्लास्टिकप्रमाणेच 'पीएफएएस'वरही आंतरराष्ट्रीय करार करण्याची वेळ आली आहे. प्रदूषणाला सीमा नसतात. एका देशातील कारखान्यातून बाहेर पडलेले रसायन हजारो किलोमीटर दूर असलेल्या महासागरात आणि तेथील जीवसृष्टीत पोहोचू शकते. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नसून संपूर्ण मानवजातीचा आहे. या निमित्ताने विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलनाचा प्रश्न पुन्हा एकदा आपल्यासमोर उभा आहे. औद्योगिक प्रगती आवश्यक आहे; पण ती निसर्गाच्या विनाशाच्या किंमतीवर होऊ नये. समुद्र ही मानवाची मालमत्ता नाही; ती पुढील पिढ्यांची अमूल्य ठेव आहे. आपण आज घेतलेले निर्णयच उद्याच्या महासागरांचे भविष्य ठरवतील. व्हेल आणि डॉल्फिनच्या शरीरात वाढणारे 'फॉरएव्हर केमिकल्स' हे केवळ वैज्ञानिक संशोधनाचे निष्कर्ष नाहीत, तर मानवाला दिलेला गंभीर इशारा आहेत. हा इशारा वेळेत ओळखून ठोस धोरणे, कठोर कायदे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि जबाबदार जीवनशैली स्वीकारल्यास महासागरांचे आरोग्य वाचवणे अजूनही शक्य आहे. अन्यथा, भविष्यात विकासाचा इतिहास लिहिताना मानवाने आपल्याच हाताने समुद्र विषारी बनवल्याची नोंद करावी लागेल.

**मिलिंद बेंडाळे**

# भ्रष्टाचाराच्या पडद्याआडचा कॉर्पोरेट हेअरकट

झी उद्योग समूह, सुभाषचंद्र गोयल, ९९.९७ टक्के हेयर कट, अण्णा आंदोलन, बँकेवर दरोडा घालणारे दरोडेखोर .त्या दरोडेखोरांनी शेजारच्या गल्लीत घातलेला राडा ! झी उद्योग समूहाच्या सुभाषचंद्र यांनी, २२,००० कोटी रुपयांच्या ग्यारंटी पैकी मी फक्त ६.२५ कोटी रुपये, म्हणजे फक्त ०.०३ टक्के रकमेची भरपाई करू शकतो असे सांगितले. ---- ने ती भरपाई मान्य केली.

म्हणजे कर्जदारांना दिलेल्या कर्जाच्या ९९.९७ टक्के रकमेवर पाणी सोडावे लागणार आहे.

याबद्दलच्या बातम्या आणि चर्चा काल/ परवा मेन्स्ट्रीम आणि सोशल मीडियावर झाली. त्याची पुनरुक्ती नको करूया. आणि जे काही घडत आहे त्याची मुळे अण्णा आंदोलनपर्यंत कशी पोचतात ते समजून घेऊया.अण्णा आंदोलनाचे देशाच्या राजकीय अर्थव्यवस्थेच्या वैचारिक फ्रेममध्ये योगदान काय?

देशात भ्रष्टचार होताच. पण अण्णा आंदोलनाने देशाच्या आर्थिक प्रश्नाबाबतचा पब्लिक डिस्कोर्स / सार्वजनिक चर्चाविश्व भ्रष्ट्राचार केंद्री बनवला. बास्स. एकच निकष.दुसऱ्या शब्दात एखादा आर्थिक व्यवहार प्रचलित कायद्याला धरून असेल तर त्यावर या अण्णा लोकांचे काहीही म्हणणे नाही. मग त्या कायद्यातील तरतुदी कितीही कॉर्पोरेट भांडवलाला भरघोस सवलती देणाऱ्या, जन विरोधी, पर्यावरण विरोधी, गरीब नागरिक विरोधी असल्या तरी त्यावर चर्चा नाही.कारण हे कायदे जनतेने निवडून दिलेल्या जनप्रतिनिधींनी बनलेल्या कायदेमंडळाने केलेले असतात. त्यावर टीका करायची, सत्ताधारी पक्ष म्हणजे देश, त्यावर टीका म्हणजे देशद्रोह असे narrative बनवले गेले.

आर्थिक व्यवहारांचा ना अभ्यास, ना राजकीय अर्थव्यवस्थेतील पॉवर डायन्यामिक्स कसे चालते याचे ज्ञान ना कुवत. अशा अण्णांना पुढे करून कॉर्पोरेट भांडवलशाहीने अण्णा आंदोलन स्पॉन्सर केले. सामान्य नागरिकांचे राजकीय आर्थिक शिक्षण करण्याचा जो काही अवकाश शिल्लक होता तो आक्रसून टाकला. मेनस्ट्रीम मीडिया मालकीचा केला. त्यावर देखील आर्थिक कायद्यांची चिरफाड बंद केली.

अनेकानेक कॉर्पोरेट भांडवल / बँकिंग/ वित्त क्षेत्रासाठीचे आर्थिक कायदे,योजना, रेग्युलेटरी नियम बनवले गेले. त्या फ्रेम मध्ये राहून अर्थव्यवस्थेतील सरप्लस, हजारो कोटी रुपये, कॉर्पोरेट क्षेत्र आणि पिरॅमिडच्या वरच्या भागात वेगाने ट्रान्सफर होऊ लागला.

मेक नो मिस्टेक. भ्रष्टाचाराची किंमत देखील सामान्य नागरिकच मोजत असतो. पण भ्रष्टाचार म्हणजे राजकीय अर्थव्यवस्था नाही. हायपोथेटिकली (कठीण आहे मान्य) कल्पना करा देशात एका रुपयाचा भ्रष्टाचार नाहीये. तरी देखील दारिद्र्य, आर्थिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास टोकाचाच राहणार आहे. त्यापैकी एक भारतीय दिवाळखोरी कायदा (IBC) आणि त्याअंतर्गत स्थापन झालेली NCLT. जो २०१६ मध्ये कार्यरत झाला. मोठ्या कॉर्पोरेटना खुले आम कायद्याला धरून मोठ्या मोठ्या रकमा खिशात घालण्याचा राजमार्ग तयार झाला.गेल्या दहा वर्षात NCLT ने मंजूर केलेले हेयर कट, बँकांची बुडालेली कर्जे, त्यांनी राईट ऑफ केलेल्या कर्जाचे आकडे, केंद्र सरकारने दिलेले भागभांडवल याचे लाखो कोटी रुपयांचे आकडे पब्लिक डोमेन मध्ये आहेत.

९० टक्के हेयर कट गटात शिरलेले सुभाषचंद्र लेटेस्ट आहेत. त्याआधी डेक्कन क्रोनिकल ९५ टक्के, वेडिओकॉन ९५ टक्के, सिनर्जी ९४ टक्के, उषदेव इंटरनॅशनल ९३ टक्के, सिवा इंडस्ट्रीज ९३ टक्के, रिलायन्स, अनिल अंबानी ९९ टक्के. आहेत. ९० टक्के हेयर कट च्या खाली तर भली मोठी यादी आहे.

गेल्या दहा वर्षात NCLT कडे आलेल्या केसेस मध्ये सरासरी हेयर कट ६८ टक्के राहिला आहे. म्हणजे १०० रुपये देणे असेल तर कॉर्पोरेट क्षेत्राने फक्त ३२ रुपये परतफेड केली आहे. या हेयर कटची एकूण रक्कम १० लाख कोटी रुपये आहे.

देशातील प्रत्येक थकीत कर्जाची केस NCLT कडे वर्ग होत नाही. इतरही अनेक पद्धतीने कर्जसंस्था/बँका आणि कर्ज घेतलेल्या कंपन्या यांच्यात सेटलमेंट होत असते. सर्व काही त्या त्या कायद्याला/योजनेला / रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या फ्रेममध्ये होत असते. त्या मार्गाने गेल्या दहा वर्षात अजून १५ लाख कोटी रुपये बँका / कर्जसंस्थानी हेयर कट सहन केला आहे.

पोस्ट मोठी होईल म्हणून थांबतो. पण थोडक्यात एक अनुषंगिक मुद्दा. कर्ज थकवल्यानंतर एमएसएमई क्षेत्रातील लाखो उद्योग आणि प्रवर्तक, गृह कर्ज घेणारे, शैक्षणिक कर्ज घेणारे विद्यार्थी, मायक्रो क्रेडिट घेणारे गरीब आणि अर्थात कोट्यवधी शेतकरी स्त्रियांना काय नरक यातनांमध्ये ही सिस्टीम ढकलते ? कित्येक जण फक्त त्यामुळे आत्महत्या करत आहेत. किती बेशरम आहे ही सिस्टीम !

कॉर्पोरेट धार्जिण्या आर्थिक कायद्यांवर सार्वजनिक चर्चा न होता भ्रष्टाचारावर व्हाव्यात हाच कॉर्पोरेट क्षेत्राचा राजकीय अजेंडा होता/राहील.का कोणास ठाऊक. परवा ओटीटी वर बघितलेला एक चित्रपट आठवला. भर शहरी वस्तीत असणाऱ्या बॅन्केच्या शाखेचे शटर बंद झाल्यावर, अंधार पडल्यावर दरोडेखोरांना बँकेत घुसून बँकेच्या सेफ मधून पैसे लंपास करायचे असतात. कुलूप/सेफ वगैरे फोडताना आवाज होणार असतो. पोलीस चौकी जवळच असते. पोलीस आवाजाचा माग काढत येण्याची शकयता असते. दरोडेखोर लोकल दादा लोकांना पैसे देऊन शेजारच्या गल्लीत जोरदार राडा घालायला सांगतात. मोठा गोंगाट, हाणामारी ऐकून पोलीस चौकीतील पोलीस त्या गल्लीत जातात. गोष्टीत साधर्म्य जाणवले तर तो काही गोष्ट सांगणाऱ्याचा हेतू नाही. !

**संजीव चांदोरकर**

# महापौरांचा विरोध चुकीचा आणि पक्षपाती कसा?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने सरसंघचालक मोहन भागवत हे अमेरिका, कॅनडा आणि युकेच्या दौऱ्यावर न्यू यॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला न्यू यॉर्कचे महापौर झोहरान ममदानी यांनी दर्शवलेला विरोध अत्यंत चुकीचा, पूर्वग्रहदूषित आणि राजकीय दुटप्पीपणाचा आहे.अमेरिका हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र मानले जाते आणि तेथील संविधानातील 'प्रथम घटनादुरुस्ती' ही प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य देते. असे असताना, एका मोठ्या सामाजिक-सांस्कृतिक संघटनेच्या प्रमुखाच्या कार्यक्रमाला विरोध करणे हे खुद्द अमेरिकन लोकशाहीच्या आणि मूलभूत अधिकारांच्या तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधात आहे.मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथील 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' हा कार्यक्रम भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबक' (संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे) या सर्वसमावेशक विचारावर आधारित आहे. संपूर्ण विश्वाला बंधुतेचा संदेश देणाऱ्या कार्यक्रमाला 'संकुचित' किंवा 'विशिष्ट घटकांना वगळणारा' ठरवणे हा निव्वळ वस्तुस्थितीचा विपर्यास आहे.हा कार्यक्रम न्यू यॉर्कमधील हजारो भारतीय-अमेरिकन नागरिकांनी आणि विविध स्थानिक संस्थांनी अत्यंत उत्साहाने आयोजित केला आहे. महापौरांनी घेतलेली विरोधी भूमिका ही तेथील शांतताप्रिय, करदात्या आणि समृद्ध भारतीय समुदायाच्या सांस्कृतिक हक्कांचा आणि भावनांचा थेट अनादर करणारी आहे. मात्र, दुसरीकडे सरसंघचालक जेव्हा परकीय भूमीवर जाऊन भारतीय संस्कृती आणि जागतिक एकात्मतेचा संदेश देतात, तेव्हा त्याला लगेच राजकीय चश्म्यातून पाहून विरोध केला जातो. हा उघड उघड वैचारिक दुटप्पीपणा आहे.त्यामुळे, झोहरान ममदानी यांनी भारताच्या विविधतापूर्ण आणि समृद्ध संस्कृतीची खरी ओळख न समजता, केवळ विशिष्ट राजकीय अजेंड्यापोटी केलेला हा विरोध पूर्णपणे चुकीचा आणि असमर्थनीय आहे.

**-अविनाश देशपांडे**

रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

## आश्वासन नको, कागदपत्रे द्या! आदिवासी विद्यार्थ्यांचा पावसातही एल्गार कायम..!

### १२,५०० पदे, १७ संवर्ग व पेसा भरतीचा प्रश्न अनुत्तरित,१ सप्टेंबरच्या मुंबई बैठकीकडे लक्ष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २९ :** आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार युवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी यवतमाळ येथे सुरू असलेले आंदोलन अद्यापही कायम आहे. मागण्यांवर केवळ आश्वासने न देता त्यासंदर्भातील अधिकृत कागदपत्रे व पदांचा स्पष्ट आराखडा द्यावा, या मागणीवर विद्यार्थी ठाम आहेत. सकाळपासून सुरू असलेल्या पावसाची पर्वा न करता मोठ्या संख्येने विद्यार्थी आंदोलनस्थळी ठिय्या देऊन बसले आहेत.



दरम्यान, अमरावती येथून आदिवासी विद्यार्थ्यांनी काढलेला लाँग मार्च बाबुळगावपर्यंत पोहोचला होता. रात्री उशिरापर्यंत प्रशासन व आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून १ सप्टेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घेऊन न्याय देण्याचे आश्वासन दिल्यानंतर लॉंग मार्चमधील विद्यार्थ्यांना अमरावतीकडे परत पाठविण्यात आले. मात्र, यवतमाळमधील आंदोलनकर्त्यांनी ठोस कागदपत्रे मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याची भूमिका कायम ठेवली आहे. आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात दुसरी बैठक पार पडली. या चर्चेत प्रशासनाने सकारात्मक भूमिका मांडली असली तरी विद्यार्थ्यांचे पूर्ण समाधान झाले नाही. त्यामुळे आता तिसरी आणि महत्त्वाची बैठक १ सप्टेंबर रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्या समक्ष होणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी दिली.विद्यार्थ्यांच्या मते, आदिवासी क्षेत्रातील १७ संवर्गांची पदभरती, बिंदूनामावलीतील कथित घोळ, १२ हजार ५०० हून अधिक पदांचा प्रश्न तसेच पेसा व नॉन-पेसा भरतीतील जागांचा तिढा अद्याप कायम आहे. जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता हे प्रश्न राज्यस्तरीय असल्याने त्यावर अंतिम उत्तर देता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. आम्हाला आश्वासन नको किती पदे मंजूर, किती भरली आणि किती रिक्त आहेत, याची अधिकृत कागदपत्रांसह माहिती द्या, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. या प्रश्नांवर १ सप्टेंबरच्या बैठकीत ठोस निर्णय झाल्यास अनेक रिक्त पदांवर आदिवासी युवकांना संधी मिळू शकते. त्यामुळे आदिवासी विकास मंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या संविधानिक आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मुंबईतील बैठकीत नेमका काय निर्णय होतो, याकडे राज्यभरातील आदिवासी विद्यार्थी व बेरोजगार युवकांचे लक्ष लागले आहे.

## ३१ ऑगस्टला बंदीटाकळीत रस्ता रोकोचा इशारा !

### वन विभागाच्या परवानगीसह शेतजमिनी व शमशानभूमीच्या प्रश्नांवर नागरिक आक्रमक !!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २९ :** बंदी भागातील नागरिकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी बंदीटाकळी बसस्थानकासमोर रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची पूर्वसूचना उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.

वन विभागाच्या हद्दीतून जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण, भोगवटदार वर्ग-२ जमिनींचे हक्क व वाटणी, विविध गावांसाठी शमशानभूमीची जागा तसेच रस्ते, पाणी, आरोग्य व वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने कार्यवाहीची मागणी केली आहे.

विशेषतः वन विभागाच्या हद्दीत येणाऱ्या रस्त्यांमुळे दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. बंदीटाकळी फाटा ते तांडा व गावाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता वन विभागाच्या हद्दीतून जातो. या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी अंदाजे एक कोटी रुपयांचे काम प्रस्तावित असतानाही वन विभागाच्या आवश्यक परवानगी अभावी काम रखडले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने परवानगी देऊन रस्त्याच्या कामाचा मार्ग मोकळा करावा, बंदी भागातील अनेक शेतकरी पिढ्यान्पिढ्या भोगवटदार वर्ग-२ जमिनीवर शेती करीत आहेत. मात्र या जमिनींच्या हक्कांबाबत अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शेतकऱ्यांचे हक्क स्पष्ट करून कायद्यानुसार हक्कसोड, आपसी वाटणी तसेच स्वतंत्र सातबारा उतारा मिळण्याची प्रक्रिया सुलभ करावी, बंदी भागातील अनेक गावांमध्ये अंत्यविधीसाठी स्वतंत्र व अधिकृत शमशानभूमीची जागा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने बंदीटाकळी, सेवालाल नगर, एकंबा, खरबी, परोटी, गाडी, सोनदाबी, बोरी, जेवली, थेरडी, भवानी, मोरचंडी आणि चिंखली या गावांसाठी शासकीय अथवा वन विभागाच्या नियमानुसार शमशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय बंदी भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, वीजपुरवठा आणि शेतकऱ्यांच्या विविध समस्या तातडीने सोडवाव्यात, वन विभागाशी संबंधित प्रलंबित बाबींवरही प्रशासनाने संबंधित विभागांना सूचना देऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे हे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बबलू जाधव पाटील यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी रूपेश डुबडे, सदानंद मोटे, दत्ता शाँगे, रणवीर जाधव, रोहिदास राठोड, रामदास बर्मटेके यांच्यासह बंदी भागातील नागरिक उपस्थित होते.

## ‘बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही!’

### यवतमाळच्या राख्या थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या निवासस्थानी, संजय राठोड यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संवाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** ‘यवतमाळ जिल्ह्यातील माझ्या लाडक्या बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी हा भाऊ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील,’ अशी भावनिक ग्वाही शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

यवतमाळातील भगिनींनी रक्षाबंधनानिमित्त पाठविलेल्या राख्या थेट त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी पोहोचल्यानंतर शिंदे यांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संवाद साधत यवतमाळच्या बहिणींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिवसेना महिला आघाडीच्या वतीने शुक्रवारी यवतमाळातील हॉटेल समर्थ प्राईड येथे रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हजारो महिलांनी उपस्थित राहून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेला राख्या बांधल्या. महिलांनी प्रेमाने तयार केलेली शुभेच्छापत्रेही यावेळी देण्यात आली. या सर्व राख्या व शुभेच्छापत्रे घेऊन शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले व ज्योती वाघाडे विमानाने मुंबईला रवाना झाल्या. ठाणे येथील निवासस्थानी त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना राखी बांधून यवतमाळातील बहिणींच्या शुभेच्छा दिल्या. राख्या व शुभेच्छापत्रे पाहून भारावलेल्या शिंदे यांनी दर्शना इंगोले यांच्या मोबाईलवरून पालकमंत्री संजय राठोड यांना थेट व्हिडीओ कॉल केला. यावेळी त्यांनी यवतमाळातील भगिनींशी आपुलकीने संवाद साधत रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, यवतमाळातील सोहळ्यात पालकमंत्री संजय राठोड यांच्या वतीने महिलांसाठी विशेष पाहुणचार करण्यात आला. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी स्वतः आग्रहाने भोजन वाढल्याने उपस्थित भगिनींनी या अनोख्या रक्षाबंधन सोहळ्याचे कौतुक केले.

## जीवघेण्या हल्ल्यातील व अल्पवयीन मुलीचा पाठलाग करणारा आरोपी गजाआड!

### पुसद ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २९ :** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या दोन गंभीर घटनांतील आरोपींवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारत पाच जणांना अटक केली. एका प्रकरणात तरुणावर विळ्याने जीवघेणा वार करून गंभीर जखमी केल्याचा आरोप असून, दुसऱ्या प्रकरणात नववीत शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा छळ केल्याचा आरोप आहे.

दि.२७ ऑगस्ट रोजी श्रीरामपूर परिसरात सुखविंदरसिंग उर्फ सोमी जसबिरसिंग भाटीया याला विकास वाळके, दिलीप शेंबडे व भारत गावंडे यांनी पकडल्याची तक्रार पोलिसांना मिळाली. यावेळी भारत गावंडे याने विळ्याने जीवघेणा वार केल्याचा आरोप आहे. गंभीर जखमी सुखविंदरसिंग याच्यावर यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी गुन्हा क्र. ५५६/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, मोरथ-वाकोडी येथील अल्पवयीन मुलीचा मागील काही दिवसांपासून संदीप रामेश्वर कदम हा पाठलाग करून छळ करीत असल्याची तक्रार प्राप्त झाली. त्यावरून गुन्हा क्र. ५५७/२०२६ अंतर्गत संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला. दोन्ही प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी स्वतंत्र पथके रवाना केली. गोपनीय माहितीच्या आधारे भारत गावंडे, विकास वाळके, दिलीप शेंबडे व अनंता गावंडे यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. तर संदीप कदम याला यवतमाळ येथून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात पुसद ग्रामीण पोलिसांच्या पथकाने केली. दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास सुरू आहे.

## थोडक्यात



### शेतकरी संघर्षाच्या इतिहासाला संशोधनाची नवी धार!

**अनुपकुमार पाचकोरे यांना आचार्य (पीएच.डी.) पदवी बहाल**

**महागाव :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत ‘यवतमाळ जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व शतकातील शेतकरी आंदोलनाचे ऐतिहासिक अध्ययन (१८६०-१९४७)’ या विषयावर सखोल संशोधन पूर्ण केल्याबद्दल प्रा. अनुपकुमार जगदेवराव पाचकोरे यांना आचार्य (पीएच.डी.) पदवी बहाल करण्यात आली. डॉ. सिद्धार्थ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. ओपन व्हिवा प्रसंगी प्राचार्य डॉ. जयंत चतुर, बाह्य परीक्षक डॉ. मिलिंद भगत, डॉ. कविता तातेड, डॉ. संतोष बनसोड व डॉ. चंद्रकांत सरदार उपस्थित होते. पाचकोरे यांनी ब्रिटिश काळातील शेतकरीविरोधी धोरणे, आर्थिक शोषण आणि विविध शेतकरी आंदोलनांचा ऐतिहासिक वेध घेतला. त्यांच्या यशाबद्दल मान्यवरांनी अभिनंदन केले.




### मुकूटबनमध्ये सोमवारी NCMC कार्डसाठी धावपळ, नागरिकांसाठी विशेष शिबिर

**७ ऑगस्टला नोंदणी केलेल्यांना कार्ड वाटप, आधार, लिंक मोबाईल व २५० रुपये आणण्याचे आवाहन**

**झरी :** एसटी प्रवासातील अर्ध्या तिकीटाच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या NCMC कार्ड नोंदणीसाठी मुकूटबन येथे सोमवारी (ता. ३१) विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रफीक कनोजे यांच्या कॉम्प्लेक्ससमोर सकाळी ९ वाजता शिबिराला सुरुवात होईल. प्रकाश मॅकलवार, सुरेंद्र गेडाम व रफीक कनोजे मित्रपरिवाराच्या वतीने तसेच साईरेड्डी अड्डीवार बंधू ग्राहक सेवा केंद्र, पाटण यांच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. NCMC नोंदणीची अंतिम मुदत १ सप्टेंबर २०२६ असल्याने पात्र नागरिकांनी तातडीने नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, ७ ऑगस्टला नोंदणी केलेल्या नागरिकांना याच शिबिरात कार्डचे वाटप केले जाणार आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड, आधारशी लिंक मोबाईल क्रमांक व २५० रुपये आणणे आवश्यक आहे. नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### शिरोलीत उद्या ‘दृष्टीदान’चा महायज्ञ,भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर

**गरजू रुग्णांना नागपुरात मोफत उपचाराची सुविधा**


**घाटंजी :** ‘रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा’ या भावनेतून तालुक्यातील शिरोली येथे रविवार, ३० ऑगस्ट २०२६ रोजी भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना जिल्हाप्रमुख आकाश राठोड यांच्या पुढाकारातून महात्मे नेत्रपेढी नेत्र रुग्णालय, नागपूर आणि जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर होणार आहे. शिबिरात महात्मे नेत्र रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची नेत्र तपासणी करून आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत. मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथील रुग्णालयात पाठविण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, नागपूर येथे जाणाऱ्या रुग्णांसाठी निवास व भोजनाची व्यवस्था पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना डोळ्यांच्या आजारांवरील उपचार सहज उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने दरवर्षी अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

परिसरातील गरजू नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आकाश राठोड यांच्यासह माजी सभापती अभिषेक ठाकरे, माजी जि.प. सदस्य आशिष पाटील लोणकर, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश चव्हाण, विधानसभा समन्वयक सतीश डफळे पाटील व शिवसेना नेते नारायण भोयर सर यांनी केले आहे.

## चातारीत बेकायदा वृक्षतोडीला वन अधिकाऱ्यांची ‘मूकसंमती’?

### बेलोरा क्षेत्र सहाय्यकांवर ठेकेदाराशी संगनमताचा गंभीर आरोप,ACF, मोबाईल स्क्वॉडच्या भूमिकेवरही संशय

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** मौजा चातारी येथील आदिवासी मालकीच्या जमिनीवर आवश्यक पूर्वपरवानगी न घेताच मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणात बेलोरा येथील क्षेत्र सहाय्यकांनी लाकूड ठेकेदाराशी संगनमत करून वृक्षतोडीस संमती दिल्याचा आरोप करण्यात आला असून, वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित आदिवासी शेतकऱ्याच्या जमिनीवर लाकूड ठेकेदाराकडून विनापरवाना वृक्षतोड सुरू होती. वन समितीच्या अध्यक्षांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळीच उघडकीस आला आणि पुढील वृक्षतोड रोखण्यात आली. मात्र, तोपर्यंत काही झाडे तोडण्यात आली असून, त्यांचे लाकूड अद्याप घटनास्थळी पडून असल्याचे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, संबंधित ठेकेदाराने सहाय्यक वनसंरक्षक (ACF) आणि मोबाईल स्क्वॉडसमोर बेलोरा क्षेत्र सहाय्यकांच्या संमतीनेच वृक्षतोड सुरू केल्याचे सांगितल्याचा दावा केला जात आहे. हा दावा खरा असल्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या भूमिकेची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने ‘प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना?’ असा सवाल उपस्थित होत आहे. घटनास्थळी पाहणी, पंचनामा, लाकडाचे मोजमाप व जप्ती याबाबतही तत्काळ कार्यवाही झाल्याचे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची स्थानिक यंत्रणेपासून स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. तोडलेल्या लाकडाचा पंचनामा करून ते सुरक्षित ताब्यात घ्यावे, वृक्षतोडीशी संबंधित परवाने व अभिलेख तपासावेत तसेच दोषी आढळणाऱ्यांवर वन कायदे व महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता वन विभाग या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## शायरीच्या दुनियेत यवतमाळचा ‘बेताब’ ठरला महाराष्ट्र रत्न!

### अमरावतीत कर्तृत्व गौरव संमेलनात मानाचा पुरस्कार.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** आपल्या दमदार शायरीतून नेते, अभिनेते, सेलिब्रिटी आणि रसिकांना मंत्रमुग्ध करणारे यवतमाळचे सुप्रसिद्ध शायर बेताब यांना अमरावती येथे ‘महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

त्यामुळे यवतमाळच्या साहित्य व कलाक्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अंबानगरी अमरावती येथील संत गाडगेबाबा समाधी मंदिर सभागृह, गाडगेनगर येथे २३ ऑगस्ट रोजी युवा कर्तृत्व फाऊंडेशन, महाराष्ट्र मानव चेतना जनविकास बहुउद्देशीय सेवा संस्था, नागपूर व शुभम क्लासेस, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘लक्षवेध कर्तृत्व गौरव संमेलन-२०२६’ आयोजित करण्यात आले होते. पद्मश्री डॉ.रविंद्र कोल्हे यांच्या उद्घाटनाने झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात आला. यावेळी शायर बेताब यांना मान्यवरांच्या हस्ते ‘महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्काराची घोषणा होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. शायरीला आधुनिक डिजिटल प्रयोगांची जोड देत आगळ्या शैलीत सादरीकरण करणारे बेताब हे उर्दू मुशायरा आणि कवी संमेलनापुरते मर्यादित न राहता विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांत आपल्या काव्यप्रतिभेची छाप पाडत आहेत.

## मला बाप नाही, मी कोणाला मिठी मारू? वेदिकेच्या हाकेला समाजाचा आधार!

### शिक्षणाची जबाबदारी युवा टा. फोर्सचा घेण्याचा निर्धार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २९ :** “मला बाप नाही, मी कोणाला मिठी मारू?” या दहावीतील विद्यार्थिनी वेदिका प्रेमानंद सोयाम हिच्या आर्त हाकेने ‘न समजलेले आई-बाप’ कार्यक्रमात उपस्थितांचे डोळे पाणावले.

मात्र तिची वेदना केवळ व्यासपीठावरच्या टाळ्यांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष मदतीत उतरली. कार्यक्रमानंतर युवा टायगर फोर्सच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी (ता. २७) वेदिकेच्या घरी पोहोचत तिच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि तिच्या पुढील शिक्षणात कोणताही अडथळा येऊ न देण्याचा निर्धार व्यक्त केला. वेदिका शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कारेगाव बंडल येथे इयत्ता दहावीत शिक्षण घेत आहे. वडिलांचे छत्र हरपलेल्या वेदिकेने कार्यक्रमात व्यक्त केलेल्या भावनांची दखल घेत युवा टायगर फोर्सने तिच्याशी संपर्क साधला. तिच्या मूळ गावी जाऊन आई, भाऊ, मोठी आई, मोठे बाबा तसेच ग्रामस्थांशी संवाद साधत तिच्या कौटुंबिक व शैक्षणिक परिस्थितीची माहिती घेण्यात आली. यावेळी वेदिकेला धीर देत “तू एकटी नाहीस, समाज तुझ्या पाठीशी आहे,” असा विश्वास देण्यात आला. युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी तिच्याशी संवाद साधून शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रा. वसंत हंकारे यांनी कार्यक्रमात मांडलेल्या सामाजिक बांधिलकीच्या विचाराला कृतीची जोड देत हा उपक्रम राबविण्यात आला. वेदिकेच्या भविष्यासाठी युवा टायगर फोर्स कुटुंबाप्रमाणे तिच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे जिद्देवार यांनी स्पष्ट केले. यावेळी शंकर कुमरे, दिलीप मेश्राम, व्यंकटे रेड्डी, महादेव रेड्डी सामावार, रितेश परचाके, राहुल भानेगावकर यांच्यासह विविध मान्यवर तसेच युवा टायगर फोर्सचे अंकित नैताम, संजय झोटिंग, गणेश बोरकुटे, सुनील कोपुलवार, राम जिद्देवार, संतोष सिंह सेंगर, प्रदीप अग्रवाल आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारल्या सुंदर राख्या

### संस्कृतीच्या धाग्याने जोडली गेली नाती! राखी निर्मिती कार्यशाळा संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. २९ :** दारव्हा तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, दुधगाव येथे रोजी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या कला-कौशल्यांना वाव देण्यासाठी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, दुधगाव येथे राखी निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यासोबतच राखी बनावट स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले.

या स्पर्धेत शाळेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ’ या संकल्पनेचा अवलंब करत विविध टाकाऊ व उपलब्ध साहित्यापासून आकर्षक आणि कल्पक राख्या तयार केल्या. कार्यशाळेसाठी दिलीप गवई सर, शैलेश राऊत सर तसेच स्वयंसेवक महल्ले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची वृत्ती, प्रेम, सद्भावना, देण्याची भावना तसेच भारतीय संस्कृतीचे जतन* यांसारख्या मूल्यांना चालना मिळाली. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कल्पनाशक्तीला या उपक्रमामुळे सुंदर व्यासपीठ मिळाले. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी केल

# वाघाच्या हल्ल्यातील मृताच्या कुटुंबास आर्थिक मदत व शासकीय नोकरी द्या..

## सागर भवते यांची मागणी; वंचित बहुजन आघाडीचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन

**तिवसा/ वार्ताहर**

मोर्शी तालुक्यातील भांबोरा या गावातील शेतशिवारात शेतकरी चरणदास इखे यांचेवर वाघाने प्राणघातक हल्ला केला असून त्यात त्यांचा मृत्यू झाला. सदर घटना दुर्दैवी असून मृत्यू झालेल्या कुटुंबास वनविभाग चे वतीने मदत म्हणून ५० लक्ष रुपयांची आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी मोर्शी यांचे कडे केली आहे.

भांबोरा येथील शेतकऱ्यावर वाघाने हल्ला केल्याने हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू झाला यामुळे शेतकऱ्यांचे कुटुंब उघड्यावर आले असून अस्मानी सुलतानी संकटाने पिचलेल्या शेतकऱ्यावर आता वाघाच्या वास्तव्याने नवे संकट उभे राहले आहे.

भांबोरा परिसरातील गावासह तिवसा तालुका मधील करजगाव, वरूडा, दापोरी, जावरा, फत्तेपूर या गावासह इतर ठिकाणी जंगलाचे मोठे प्रमाण आहे त्यामुळे सदरील गावात



### अफवेवर विश्वास ठेऊ नका - सागर भवते

भांबोरा येथे झालेल्या वाघाच्या हल्ल्यातील मृताच्या कुटुंबियांना ५० लक्ष रुपयांची आर्थिक मदत व एक शासकीय नोकरी देण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेशी चर्चा करण्यात आली. वाघाच्या हल्ल्यामुळे परिसरातील गावांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. मोर्शी तालुका व तिवसा तालुक्यातील परिसरातील नागरिकांनी वनविभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या सूचनेचे पालन करावे, कुठल्याही अफवेवर विश्वास ठेऊ नये.

सुद्धा भीतीचे वातावरण निर्माण झले आहे.

त्यामुळे वनकर्मचारी यांचे मार्फत सदर गावांना भेटी देऊन गावकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्या अशीही मागणी वंचित बहुजन आघाडीचे वतीने निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन सादर करतेवेळी जिल्हा महासचिव सागर भवते यांच्यासह तिवसा तालुका अध्यक्ष मनीष खरे, मोर्शी तालुका अध्यक्ष अमोल सरवटकर, प्रवीण निकाळजे, भुजंग वावरे सह पदाधिकारी उपस्थित होते.

# जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांना बांधल्या राख्या

### रक्षाबंधनानिमित्त डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात स्नेहपूर्ण उपक्रम

**अमरावती/ का.प्र.**

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्षाबंधनानिमित्त डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळेला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांच्या मनगटावर राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण स्नेहपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा केला.



जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या मनगटावर राख्या बांधल्या. यावेळी अंध विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या तसेच त्यांच्यासाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामुळे अंध विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्रेम, बंधुभाव, आपुलकी, समानता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत रक्षाबंधनाचे सामाजिक आणि मानवी मूल्य अधोरेखित केले. अंध विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे करण्याचा उपक्रम हा केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, समाजातील प्रत्येक घटकाशी आपुलकीचे आणि समतेचे नाते निर्माण करणारा उपक्रम असल्याचे मान्यवरांनी आपल्या भाषणातून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. कुमार बोबडे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. रुपेश फसाटे यांनी केले. यावेळी विचारमंचावर माजी शिक्षक केशवराव फसाटे, प्रा. गजानन गडेकर, प्रा. प्रतीक करंडे, प्रा. मनिष भंकाळे, प्रा. मनिषा देशमुख आणि प्रा. शिवकुमार साबळे उपस्थित होते. यावेळी जनसंवाद व पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अंध विद्यार्थ्यांच्या मनगटावर राख्या बांधून, भेटवस्तू देत तसेच नाश्ता देऊन रक्षाबंधनाचा आनंद त्यांच्यासोबत साजरा केला. या उपक्रमातून शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी सामाजिक संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण केला. अंध विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे करण्याचा हा उपक्रम उपस्थितांसाठीही भावनिक, प्रेरणादायी आणि सामाजिक संदेश देणारा ठरला.

# वूमेन्स २४ न्यूज चॅनल तर्फे साधना पाटणकर यांची नियुक्ती

**अमरावती/ का.प्र.**

महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्या समस्या, हक्क व प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने वूमेन्स २४ न्यूज चॅनलच्या वतीने आयोजित 'सहेली मंच' च्या अमरावती तालुका संयोजिका पदी साधना पाटणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती वूमेन्स २४ न्यूज चॅनलच्या संपादिका तथा सहेली मंचच्या मुख्य संयोजिका प्रीतीताई साहू आणि उपसंपादिका जयश्री चांडक, राज्य संयोजीका निशा महाजन यांच्या हस्ते करण्यात आली.

सहेली मंचच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळवून देणारे एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. महिलांमधील सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देणे, विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना एकत्र आणणे तसेच त्यांच्या



कर्तृत्वाला समाजासमोर आणण्याचे कार्य या मंचाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

यासोबतच महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक व इतर समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन मिळवून देण्यासाठीही सहेली मंच कार्यरत राहणार आहे.

महिलांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती मिळावी आणि त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या नियुक्तीबद्दल साधना पाटणकर यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या माध्यमातून अमरावती तालुक्यात सहेली मंचचे कार्य अधिक व्यापक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन सण साजरा

**अंजनगाव बारी -** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव, प्रेम, परस्पर आदर आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मुख्य कार्यक्रमात विद्यार्थिनीनी आपल्या वर्गमित्रांसह शालेय परिसरातील कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

# संक्षिप्त

## जनता विद्यालयात दामिनी पथकाकडून विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे

**अंजनगाव बारी -** जनता विद्यालय अंजनगाव बारी येथे बडनेरा दामिनी पथकाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. दामिनी पथकातील अरुणा तांडेकर व पूजा वनवे यांनी विद्यार्थिनींना सोशल मीडिया, मोबाईलचा गैरवापर तसेच स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. फेसबुक, इन्स्टाग्रामच्या माध्यमातून होणाऱ्या गैरवापरापासून विद्यार्थिनींनी सावध राहावे, तसेच कोणत्याही प्रसंगाला घाबरून न जाता खंबीरपणे सामोरे जावे, असे आवाहन अरुणा तांडेकर यांनी केले. पूजा वनवे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देत सुरक्षिततेच्या उपायांची माहिती दिली. अडचणीच्या प्रसंगी दामिनी पथकाशी संपर्क साधण्यासाठी हेल्पलाइन क्रमांकही विद्यार्थिनींना देण्यात आला. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. संचालन व प्रदर्शन अर्चना पोकळे यांनी केले.




## कस्तुरबा इंग्लिश स्कूलचे रक्षाबंधन निवासी मतिमंद विद्यालयात

**अमरावती -** स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये रक्षाबंधन या सणाचे औचित्य साधून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी हस्त निर्मित 'राखी मेकिंग स्पर्धा' ठेवण्यात आली. विद्यार्थ्यांनी सुंदर देखण्या, राष्ट्रीय ध्वज तिरंगा, अशा प्रतिकृतींच्या देखण्या स्वरूपाच्या आकर्षित राख्या तयार करून गाईडच्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात त्या राख्यांचे भव्य प्रदर्शन लावले. परिसरातील नागरीक, पालक यांनी या प्रदर्शनीला भेट देऊन राख्यांची खरेदी करून विद्यार्थ्यांचे, त्यांच्या कल्पनेतून सुंदर अशा राख्यांच्या प्रतिकृती तयार केल्याबाबत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांचा उत्साह वाढविला व स्वावलंबन या गुणाचा विकास कसा होतो याबाबत त्यांना प्रोत्साहन दिले. सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी आलेली राख्यांची मिळकत ही 'निवासी मतिमंद विद्यालयात' समर्पित करण्यात आली. या विद्यालयाचे अधीक्षक निखिल बुद्धे सर, मुकुंद बडगे सर यांच्या सहकार्याने या विद्यालयात गाईडच्या विद्यार्थिनींनी या मतिमंद बालकांना राख्या बांधून त्यांचा आनंद द्विगुणित केला. या भावनिक क्षणी अशा विद्यार्थ्यांचे आपल्या भावाप्रती असलेले अतूट नाते त्यांच्या अश्रूंनी प्रतिबिंबित झाले . निखिल बारबुद्धे सर यांनी आपल्या मनोगतत्तून अशा बालकांप्रती शाळेनी घेतलेला उपक्रम व केलेली मदत याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी कौतुक करून आभार व्यक्त केले. महापौर श्रीचंद तेजवानी यांचे निवासस्थानी स्काऊट गाईड विद्यार्थी व शिक्षक यांनी प्रत्यक्ष भेट दिली. महापूर यांनी विद्यार्थ्यांची प्रशंसा करून रक्षाबंधन हा सण बहिण भावाचे प्रेमाचे प्रतीक नसून प्रेम, सन्मान, सेवा आणि सामाजिक जबाबदारी ची भावना मजबूत बनवण्याचा सण आहे. विद्यार्थ्यांनी आपली मेहनत व संवेदनशीलता यावरूनही ही शिकवण दिली की समाजसेवा करण्यासाठी वयाचे बंधन नाही, अशा शब्दात आपले मनोगत व्यक्त केले. साधना चंदेल विद्यार्थ्यांना शिक्षणा व्यतिरिक्त सेवाभाव, सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे संस्कार रुजवितात, अशा शब्दात कौतुक करून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. अशा प्रकारे एक आगळावेगळा उपक्रम साधना चंदन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



## कला व विज्ञान महाविद्यालयात जलसंधारण दिनानिमित्त विविध उपक्रम

**कुऱ्हा -** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या 'जलसंधारण दिन' तसेच 'जलसंधारण सप्ताहा' निमित्त कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा येथे विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय अभ्यंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे संवर्धन व भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जनजागृती व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जलसंधारण, जलव्यवस्थापन, पाणी बचत आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर विविध निबंध व आकर्षक पोस्टर्स सादर केले. यावेळी प्राचार्य डॉ. अजय अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'पाणी ही अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून त्याचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. निशा नायगावकर जोशी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# चाकूचा धाक दाखवून चालकाकडून मोबाईलसह दुचाकी लंपास

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

जुना बायपास रोडवरील बगीया टी-पॉइंटजवळ तीन अनोळखी इसमांनी दुचाकीस्वाराला अडवून चाकूचा धाक दाखवत त्याच्याकडील दोन महागडे मोबाईल व दुचाकी असा सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने लंपास केल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात तीन अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस सुभाषराव पुनसे (वय २३, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. अंजनगाव बारी, बारीपुरा) हे पल्सर दुचाकीने अंजनगाव बारीकडे जात होते. बगीया टी-पॉइंटजवळ त्यांच्या दुचाकीला झटके येत असल्याने ते हळू जात असताना चेतक मोपेडवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांना अडविले. यावेळी आरोपींपैकी एकाने त्यांच्याकडे खर्रा व गुटखा आहे का, अशी विचारणा केली. त्यानंतर आरोपींनी त्यांच्या खिशातील मोबाईल हिसकावून घेतला. दरम्यान, एका आरोपीने पुनसे यांच्या गालावर थप्पड मारून चाकूचा धाक दाखवला आणि पैसे व मोबाईल देण्याची धमकी दिली. घाबरलेल्या पुनसे यांच्याकडून आरोपींनी विवो ई-२९ मोबाईल (किंमत अंदाजे ३० हजार रुपये), आयफोन (किंमत अंदाजे ६९ हजार रुपये) आणि पल्सर दुचाकी क्रमांक एमएच २७-डीएन ५०७० (किंमत अंदाजे १ लाख रुपये) असा एकूण सुमारे १ लाख ९९ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने घेतला. त्यानंतर आरोपी एमआयडीसी अमरावती-जुना बायपासच्या दिशेने पसार झाले. घटनेनंतर तेजस पुनसे यांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणाचा तपास संथगतीने सुरू असल्याचा आरोप करत, घटनेतील आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करावी आणि आपल्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी फिर्यादी तेजस पुनसे यांनी केली आहे. आरोपींवर लवकर कारवाई न झाल्यास अमरावती पोलीस आयुक्त तसेच केंद्रीय गृहमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे..

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त जनजागृती अभियान

**अमरावती/ का.प्र.**

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त व्याघ्र संवर्धन आणि जैवविविधता संरक्षणाबाबत जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. जगभरात व्याघ्र संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि व्याघ्रांच्या संरक्षणासाठी प्रयत्नांना प्रोत्साहन देणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाद्वारे विद्यार्थ्यांना व्याघ्रांचे पर्यावरणीय महत्त्व, जैवविविधता जतन करण्याची आवश्यकता आणि वन्यजीव संरक्षणाची गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्याघ्र संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली असून वन्यजीव संरक्षणासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याची प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांमधील निवडक विद्यार्थी निवडून त्यांचे टायगर ॲम्बेसिडर म्हणून निवड करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत व्याघ्र संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी माहितीपर पुस्तिका आणि पोस्टर्स तयार केले. पुस्तिकेचे आणि



पोस्टर्सचे प्रकाशन प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. जे. डी. धोटे, प्रा.डॉ. जी.ए.वाघ, प्रा. स्वाती वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. 'चला वाघाला समजून घेऊया' या संकल्पने अंतर्गत विविध पोस्टर ची निर्मिती करण्यात आली व त्या पोस्टरची प्रदर्शनी श्री गणेशदास राठी विद्यालय, शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, आयडियल इंग्लिश स्कूल, श्रद्धानंद हायस्कूल तसेच कस्तूरबा कन्या विद्यालय अमरावती इत्यादी ठिकाणी आयोजन करण्यात आले व तेथील विद्यार्थ्यांसाठी हा विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांना वाघांचे संरक्षण व संवर्धन करण्याची गरज कशी आहे हे समजावून सांगण्यात आले.

या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे तसेच समन्वयक डॉ. एस. पी. इंगोले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणूनडॉ. जी. डी. हांडे यांनी जबाबदारी पार पाडली. तसेच या कार्यक्रमाला डॉ. एस.व्ही.गावंडे, डॉ.पी.एम. रामटेके, डॉ.एस.जे.कवाडे, पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राणिशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयात विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे

# 'कॅम्पस सोलरायझेशन' आणि 'ग्रीन स्किल्स' विषयावर व्याख्यान

**अमरावती/ का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती मधील विद्युत अभियांत्रिकी विभाग यांनी 'शाश्वत ऊर्जा आणि हरित कौशल्य विकासासाठी कॅम्पस सोलरायझेशन' (Campus Solarization for Sustainable Energy and Green Skill Development) या विषयावर एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी ईसीई इंडिया एनर्जीज प्रायव्हेट लिमिटेड (ECE India Energies Pvt. Ltd.), अमरावती येथील एचआर (HR)



आणि प्रशासन, ऑपरेशन्स व पुरवठा साखळी व्यवस्थापन विभागाचे महाव्यवस्थापक प्रवीणकुमार वानखेडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या सत्रात सौर ऊर्जेचे वाढते महत्त्व, कॅम्पस-स्तरावरील सौर ऊर्जा प्रणालीची अंमलबजावणी (सोलरायझेशन) आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमधील 'ग्रीन स्किल्स' (हरित कौशल्ये) विकसित करण्यावर भर देण्यात आला.

शाश्वत ऊर्जा पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करणे आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रातील करिअरच्या संधींचा शोध घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, हा या व्याख्यानाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमादरम्यान, सौर तंत्रज्ञानाचे व्यावहारिक महत्त्व आणि स्वच्छ व शाश्वत ऊर्जा प्रणालींकडे होणाऱ्या वाटचालीत कुशल व्यावसायिकांची भूमिका समजून घेण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

शैक्षणिक शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील कौशल्ये व उदयोन्मुख तंत्रज्ञान यांचा मेळ घालण्यावर संस्थेचा असलेला भर या उपक्रमातून दिसून येतो. अशा संवादांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील सध्याच्या कार्यपद्धतींची माहिती मिळते, तसेच शाश्वतता आणि पर्यावरणपूरक विकासाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होते. शाश्वत भविष्यासाठी तरुण पिढीला आवश्यक ज्ञान आणि कौशल्यांनी सज्ज करण्याचे महत्त्व यातून अधोरेखित करण्यात आले. अमरावतीमधील एक स्वायत्त संस्था (ऑटोनॉमस इन्स्टिट्यूट) म्हणून पी आर पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग हे महाविद्यालय उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांच्यातील परस्पर संवाद तसेच विद्यार्थ्यांची तांत्रिक व व्यावसायिक क्षमता वाढवणाऱ्या उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देत आहे. सदर आयोजनासाठी संस्थेचे संचालक डॉ.पी.एम. खोडके, प्राचार्य डॉ.पी एम जावंधिया, विभागप्रमुख डॉ.हेमंत सा.कुलट, डीन डॉ.संजय बी. वरकड, असो. विभागप्रमुख डॉ प्रीती. आर. राणे यांचे अमूल्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले, आयोजक म्हणून प्रा.सारंग वी.भोंडे, प्रा. स्मिता वी. काळमेघ यांनी काम पाहिले. संचालन धनश्री पोहोकर, अनुष्का पातूरकर, तर प्रदर्शन चि. प्रथमेश आडे यांनी केले.

# माणसांच्या जंगलातून प्राण्यांच्या जंगलात गोरेवाड्याचा एक सुंदर अनुभव!




**मा**णसांचे भलेमोठे जंगल असलेल्या नागपुरात प्राण्यांचे जंगल पाहणे हा आजचा अतिशय सुंदर अनुभव होता.नागपूरला गेल्यावर शहराच्या गर्दीपासून थोडे दूर, काटोल रोडवर असलेल्या बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयाला आज भेट दिली. नावात 'प्राणिसंग्रहालय' असले तरी गोरेवाड्याचा अनुभव पारंपरिक पिंजऱ्यांमधील प्राणिसंग्रहालयापेक्षा बराच वेगळा आहे. तब्बल १,९१४ हेक्टरच्या परिसरात पसरलेला हा प्रकल्प कोरड्या पानगळीच्या जंगलाच्या पार्श्वभूमीवर उभा आहे.

Gorewada Zoo इथल्या Indian Safari मध्ये चार झोन आहेत—Tiger, Leopard, Sloth Bear आणि HeRivore Safari. या सफारीची संकल्पनाच अशी आहे की, प्राणी तुलनेने मोकळ्या परिसरात आणि आपण बंद वाहनाच्या सुरक्षिततेत!

**बिबट्या आणि अस्वलाने थोडी निराशा केली**

सफारीला सुरुवात झाली ती Leopard Zone पासून. बिबट्याच्या दर्शनाची उत्सुकता होती; पण आज त्याने काहीशी निराशा केली. Sloth Bear Zone नेही फारसे समाधान दिले नाही. जंगलात प्राणी शोधण्याचा रोमांच वेगळा असतो आणि प्राणिसंग्रहालयात ते दिसतीलच याची खात्री नसते हे पुन्हा एकदा जाणवले.पण पुढचा HeRivore Zone मात्र अगदी भरून पावणारा होता. चितळांचे कळप, सांबर, काळवीट, नीलगाय, Barking Deer, Sangai, Swamp Deer आणि इतर शाकाहारी प्राणी दिसत होते. मध्येच मोरही आपले अस्तित्व जाणवून देत होते. गोरेवाड्याच्या अधिकृत यादीत चितळ, सांबर, काळवीट, अल्बिनो काळवीट, बार्किंग डिअर, संगाई, नीलगाय, हॉग डिअर आणि Swamp Deer यांसारख्या प्राण्यांचा समावेश आहे. आजचा 'स्टार' होता—पांढरा काळवीट! सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते एका पांढऱ्या काळविटाने (Albino Blackbuck).




काळवीट याआधी अनेकदा पाहिले होते; पण पांढरा काळवीट पहिल्यांदाच पाहत होतो. काळविटाच्या नेहमीच्या गडद तपकिरी-काळसर रंगाऐवजी संपूर्ण शरीरावर पांढऱ्या रंगाचे आवरण आणि त्यावर उठून दिसणारी लांब, पीळदार, स्क्रूसारखी वळणदार शिंग हे दृश्य खरोखरच लक्षात राहण्यासारखे होते.

गोरेवाड्याच्या अधिकृत माहितीनुसार हा Albino Blackbuck अत्यंत दुर्मिळ असून त्याचा पांढरा रंग आनुवंशिक बदलामुळे येतो. काळवीट स्वतःही भारतातील अतिशय वेगवान हरिणवंशीय प्राण्यांपैकी एक आहे.

सामान्य हरणांच्या तुलनेत काळविटाचे सर्वात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सर्पिलाकार, पीळदार शिंगे. नर काळविटाच्या या शिंगांकडे पाहताना निसर्गाने प्राण्यांना दिलेल्या विविध रूपांची गंमत पुन्हा जाणवते.


*आणि मग आला 'राजकुमार'!*
*शेवटी Tiger Zone.*
*बंदिस्त अवस्थेतील का असेना, पण 'राजकुमार' नावाच्या देखण्या वाघाने दर्शन दिले.*
*वाघ... वाघच असतो!*

तो समोर असताना काही क्षणांसाठी कॅमेऱ्याचा विचारही मनातून जातो. नजर त्याच्यावर खिळून राहते. त्याच्या चालण्यातला रुबाब, डोळ्यांमधली ती विलक्षण स्थिरता आणि अंगावरच्या काळ्या-पिवळ्या पट्ट्यांची रचना सगळंच भारावून टाकणारे.

वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी का म्हटले जाते, याचा प्रत्यय अशा क्षणी येतो. आता गोरेवाड्यात आफ्रिकाही येणार!

गोरेवाड्याची आणखी एक मोठी गोष्ट म्हणजे त्याचा African Safari प्रकल्प. सध्या हा प्रकल्प कार्यान्वित झालेला नसला तरी त्याचे काम पुढे नेण्यात आले आहे. २०२५ मध्ये FDCM आणि NBCC यांच्यात आफ्रिकन सफारी व प्रवेशद्वाराच्या विकासासाठी MoU झाले. सुमारे ६३ हेक्टरवर हा आफ्रिकन सफारी प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

आफ्रिकेतील जिराफ, झेब्रा, पाणघोडा, पांढरा गेंडा, सिंह, चित्ता, हिप्पोपोटॅमस, ऑस्ट्रिच, इम्पाला, जेम्सबॉक, ब्लू विल्डबीस्ट,



कुडू, कॉमन इलँड, स्पॉटेड हायना, चिंपांझी, बॅबून अशा अनेक प्राण्यांचा या प्रकल्पात समावेश असणार आहे.

विशेष म्हणजे या प्रकल्पात 'Kopje Walk' सारखा चालत



अनुभव घेण्याचा भागही प्रस्तावित आहे. म्हणजे भविष्यात नागपुरातच आफ्रिकन सफारी अनुभवता येणार आहे.

गोरेवाड्यात आणखी एक गोष्ट आवडली ती म्हणजे व्यवस्थापन.

उत्तम अवस्थेतील बसेस, ठिकठिकाणी माहिती देणारे फलक, स्वच्छ वॉशरूम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, Souvenir Shop, Waiting Area, खाद्यपदार्थांची व्यवस्था, स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांचा नम्रपणा सगळेच नेटके वाटले.

थोडक्याय गोरेवाडा हे केवळ प्राणी पाहण्याचे ठिकाण नाही; निसर्ग, वन्यजीव आणि आधुनिक पर्यटन यांचा एकत्रित अनुभव देणारे ठिकाण आहे.

नागपूर म्हणजे माणसांचे गजबजलेले, धावपळीचे महानगर. पण त्याच नागपुराच्या कुशीत एवढे मोठे जंगल, गोरेवाडा तलाव आणि त्यात वावरणारे असंख्य जीव आहेत, ही जाणीव सुखावून जाते.

नागपुरला गेलात तर बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या गोरेवाडा प्राणिसंग्रहालयाला भेट द्यायला विसरू नका.

**-अविनाश दुधे**

# मुले कशी 'बि'घडतात...?

**मुलांवर योग्य संस्कार करताना, त्यांना घडवताना योग्य वेळी संवादाचा मार्ग अवलंबला पाहिजे आणि त्यांना शिस्त लावण्यासाठी काही गोष्टींना नकारही दिला पाहिजे. पालक-पाल्य नात्यात मोकळेपणा आला, तरच मुलांना चुकीच्या मार्गांनी जाण्यापासून रोखता येते.**

**क**रोना काळापासून 'शाळेतील मुलांची शिस्त निघून गेली,' 'मुले बिघडत असून संस्कार शून्य बनत आहेत,' असा सूर अनेकांकडून ऐकू येतो. बालगुन्हेगारीच्या अनेक घटना समोर येत आहेत. अल्पवयीन गुन्हेगारांच्या संख्येत होत असलेली वाढ हा चिंतेचा विषय बनला आहे. पंचवीस वर्षांपूर्वी पालकत्वाची जबाबदारी पार पाडत असताना पालकांचा दृष्टिकोन वेगळा होता. आता आधुनिक जीवनशैलीच्या नावाखाली पब संस्कृती, प्रायव्हसीसारख्या भलत्याच कल्पनांचे पेव वाढले आहे. विशेष म्हणजे या प्रकाराला प्रतिष्ठा मिळत आहे. परिणामी कुटुंबसंस्थेची अवस्था बिघडत असून 'पैशाने काहीही मिळवता येते,' हा समज दृढ होत आहे. आपल्या व्यावसायिक जबाबदारीत अडकलेल्या पालकांचे कुटुंबाकडे होत असलेल्या दुर्लक्षाचा परिणाम मुलांवर होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे पालकांनी सुजाणतेने पालकत्व निभावणे आवश्यक बनले आहे.

मुलांसाठी सुखसोयी उपलब्ध करून देताना त्यांची बाहेरच्या जगाशीही ओळख झाली पाहिजे, हे विसरून चालणार नाही. जगातील सुख-दुःखांची त्यांना जाणीव होऊन वास्तवाचे भान आले पाहिजे. मुले करीत असलेल्या नको त्या गोष्टीचे कौतुक करणे चुकीचे आहे. जीव घेणारे 'थ्रिल' करणाऱ्या मुला-मुलींबद्दल पालक अभिमानाने बोलतात, साहजिकच मुले बेपर्वा बनण्याचा धोका वाढतो. मुलांच्या आहारी जाणे योग्य नाही आणि आपल्या दबावाने मुले भित्रेही बनता कामा नयेत किंवा अतिप्रेमाने अपंगही बनता कामा नयेत, हा तोल सांभाळता येणे आवश्यक आहे.

पालकांनी मुलांच्या शिक्षकांच्या संपर्कात राहिले, तर अभ्यासाची व शालेय वर्तनाची माहिती पालकांना मिळत राहते. मुले वयानुसार मोठी होत असताना त्यांच्यात भावनिक प्रश्न निर्माण होतात. त्यांची योग्य उकल करणे पालकांची जबाबदारी आहे. एखादी चुकीची घटना घडत असल्यास त्यास ठामपणे विरोध का व कसा करावा; व्यसन हानिकारक असल्याने व्यसनाधीनतेस नकार कसा द्यावा, याविषयी मार्गदर्शन करणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या कामातून मुलांसाठी वेळ काढलाच पाहिजे. त्यांच्या योग्य जडणघडणीत आपण तडजोड करू शकत नाही. मुलांच्या चुकीच्या वागण्याबद्दल त्यांनाच जबाबदार धरायला हवे; परंतु चुकांबद्दल सांगत असताना अपमान होईल, असे बोलणे टाळावे. पाल्य आणि पालक यांच्या नात्यात मोकळेपणा असावा; जेणेकरून मुलांना पालकांशी कोणताही विषय



बोलायला संकोच वाटु नये. मुलांना सुरक्षित वातावरणात वाढवताना समानता, विवेक व नैतिकतेची शिकवण देणे आवश्यक आहे. कुटुंबात व समाजात जबाबदारीने वागावे. प्रसंगी सहनशील राहावे आणि संयम ठेवावा. आपल्या हातून एखादी चूक झाल्यास त्याचा परिणाम भोगाव लागतो, ही समज मुलांमध्ये आली पाहिजे. ही शाळांसह पालकांची महत्वाची जबाबदारी आहे.

मुलांना आई-वडिलांशिवाय इतर कोणीही व्यवस्थित ओळखू शकत नाही. त्यांच्याकडून घडणाऱ्या छोट्या चुकाच्या लक्षात आणून देणे आपले कर्तव्य आहे. कारण छोट्या चुकांचे रूपांतर मोठ्या चुकांत होण्यास वेळ लागत नाही. मुलांमध्ये एकमेकांबद्दल आदरभाव जाणवत नाही. त्यासाठी पालकांनी स्वतः मुलांसमोर त्यांच्याशी व इतरांशी आदरयुक्त बोलणे आणि वागणे खूप महत्वाचे आहे. मुले अनुकरणप्रिय असल्यामुळे पालकांच्या घरातील वर्तनाचा त्यांच्यावर थेट परिणाम होतो. मुलांच्या विकासासाठी प्रसंगी कठोर निर्णय घेणे गरजेचे असते. त्याबाबतची कल्पना मुलांना करुन दिल्यास मानसिक दृष्टीने ते तयार राहतील. पुण्यासारख्या मेट्रो शहरांत गुन्हेगारीकडे वळणाऱ्या मुलांचे वय १५ ते २० वर्षांचे असल्याचे आढळून येते. 'सोशल'सोशल मीडियावर आपल्या मुलाला'दादा' किंवा 'भाई' म्हणून ओळखतात,' किंवा 'आपल्या परिसरात त्याचा खूप दरारा आहे,' अशा गोष्टींचे कौतुक घरातूनच होते, ही बाब अतिशय गंभीर आहे. आपल्या मुलांकडे योग्य वेळी लक्ष न देणे, त्याच्या चुकीच्या कृत्यांवर पांघरून घालणे हे अत्यंत चुकीचे आहे. आपल्या मुलाचे मित्र कोण आहेत ? शाळेतील त्याचे वर्तन कसे आहे? त्याच्याकडून मोबाइलवर काय पाहिले जाते? अलीकडच्या काळात त्याच्या वागण्यात कोणते बदल घडत आहेत, यांवर बारकाईने लक्ष ठेवणे काळाची गरज बनली आहे. आपल्या मुलांच्या गरजा पूर्ण करत असताना ती हट्टी बनू नयेत, याची काळजी घ्यावी. आपल्या कुवतीप्रमाणेच त्या गरजा पूर्ण कराव्यात. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, कुटुंबातील अडचणी, समस्या याबाबत मुलांबरोबर मोकळेपणाने संवाद करावा. 'आपण याच कुटुंबाचा एक भाग आहोत,' हे भान त्यांच्यामध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. आयुष्यातील संकटे, सुख-दुःखे मुलांनाही कळली पाहिजेत. त्यामुळे त्यांची प्रगल्भता वाढायला मदत होते. जवळपास प्रत्येक घात एक किंवा दोनच मुले असतात, त्यामुळे आंधळेपणाने त्यांचे लाड पुरवले जातात. मुलांना हव्या असलेल्या गोष्टी पटकन उपलब्ध झाल्या की त्या गोष्टींचे मोल, जाणीव त्यांना होत नाही. त्यांना नकाराची सवय लागून विरुद्ध विचार सहन करण्याची क्षमताही झाली पाहिजे. त्यांच्यामध्ये विकसित झाली कोणतेही मूल नैसर्गिकपणे त्याच्या परिस्थिती आणि साधनांनुसार प्रगती करत असते. त्यामुळे 'माझे मूल महणजे कोणी तरी विशेष' अभिमान सोडून दिला पाहिजे. नैतिक मूल्ये आणि संस्कारांची रुजवण करत असताना प्रसंगी सक्तीही करावी. एकंदरीत मुलांचे शिक्षण घरातून सुरू होते. शाळेपेक्षा पालकांच्याच डोक्यावर फोडले जाते. मुलाचे चारित्र्य, सवयी, व्यक्तिमत्त्व घडवण्यात पालकांची भूमिका मुख्य असते, त्यासाठी त्यांनी सतर्क असले पाहिजे, यात दुमत असण्याचे कारण नाही. (साभार म.टा.)

**पांडुरंग प्रताप म्हेत्रे**

# श्रीकृष्णाचा बटर बॉल

**भा**रत एक असा देश आहे, जिथे नेहमीच काहींना काही आश्चर्य घडत असते. कृष्णाचे नाव आले की, आपोआपच त्याच्या लीलाही समोर येतात. आता हेच पाहा श्रीकृष्णाचा हा 'बटर बॉल' आजही लोकांसाठी औत्सुक्याचा विषय आहे. त्याच्या नावाप्रमाणेच ही जागाही तितकीच आश्चर्यकारक आहे. असे म्हणतात की इथल्या या दगडाला ना चक्रीवादळ हलवू शकतं... ना भुकंप ! अशा आश्चर्यकारक गोष्टींची गुत्थी आजही शास्त्रज्ञ सोडवु शकलेले नाही. हा दगड किती काळ उभा आहे हे कुणाला नेमके माहीत नसले तरी 'क्याक्टिओ पॅगोडा' ५८१ बीसी मध्ये बांधला गेला असे मानले जाते. तथापि, काही लोकांना असाही विश्वास आहे की ११ व्या शतकात एका बौद्ध भिक्षुने भगवान बुध्दांचा केसाच्या मदतीने हा दगड असा उतारावर ठेवला होता. असाच एक सोन्याचा दगड म्यानमारमध्ये देखील आहे ज्यांची उंची सुमारे २५ फुट आहे. या सोन्याच्या दगडाची खास गोष्ट म्हणजे तो चमत्कारिकरीत्या दुसऱ्या दगडाच्या आधाराने शतकानुशतके विसावला आहे,तेही मोठी वादळे, पावसाने जागेवरुन किंचीतही न हलता!



चेन्नईपासुन ६० कि.मी. अंतरावर महाबलीपुरम येथे हा भव्य दगड आहे.एका उंच जागेवर ४५ अंशाच्या कोनात हा दगड स्थिर आहे. कृष्णाच्या आवडत्या लोण्याचे हा प्रतीक समजला जातो. हा दगड २० मीटर उंच आणि ५ मीटर रुंद आहे. याचे वजन आहे २५० टन. भौतीकशास्त्राचा नियम झुगारुन हा दगड एका निमुळत्या जागेवर वर्षानुवर्षापासुन उभा आहे. या दगडाकडे पाहील्यावर असे वाटते की, कोणत्याही क्षणी तो खाली कोसळेल. या दगडाचे अस्तीत्व एक रहस्य बनुन राहीले आहे. त्या खडकाचे मुळ नाव 'वान इटाई कल' आहे, ज्याचा अर्थ 'आकाश देवाचा दगड' असा होतो.स्थानीक लोकं या गुढ विशाल दगडाला 'कृष्णाचा लोण्याचा गोळा' म्हणुन ओळखतात.महाबलीपुरमच्या मध्यभागी वसलेले,बटर बॉल युनेस्को स्थळ हे एक असे आश्चर्य आहे, जे भेट देणाऱ्या प्रत्येकाच्या कल्पनाशक्तीला भुरळ पाडते.उतारावर धोकादायकपणे विसावलेला हा प्रचंड ग्रॅनाईटचा खडक गुरुत्वाकर्षण आणि तर्काला आव्हान देतो. कृष्णाच्या बटर बॉलची कथा या नैसर्गिक आश्चर्याला आणखी गुढतेची जोड देते. आख्यायिकेनुसार, आपल्या खोडकरपणासाठी ओळखल्या जाणाऱ्या भगवान कृष्णाने एकदा आकाशातुन लोण्याचा एक गोळा खाली टाकला, ज्याचे दैवीशक्तीने या प्रचंड खडकात रुपांतर झाले. ही कथा केवळ महाबलीपुरमच्या सांस्कृतिक वैभवालाच समृध्द करत नाही, तर जगभरातील पर्यटकांना त्याचे गुढ आकर्षण अनुभवण्यासाठी आकर्षित करते. बटर बॉल युनेस्को स्थळ हे केवळ एक भुवैज्ञानीक कुतुहल नाही; तर ते या प्रदेशात भिनलेल्या समृध्द इतिहासाचा आणि पौराणिक कथांचा एक पुरावा आहे. जेव्हा तुम्ही त्याच्यासमोर उभे राहता, तेव्हा तुम्हाला भुतकाळाशी एक नाते जोडल्यासारखे वाटल्याशिवाय राहत नाही. जिथे देव आणि नायकांच्या कथा जीवनाच्या प्रत्येक धाग्यात विणलेल्या होत्या. कृष्णाच्या बटर बॉलची कथा ही अशा अनेक कथांपैकी एक आहे, ज्या पिढ्यांपिढ्या चालत आल्या आहेत आणि त्यातील प्रत्येक कथा या खडकाभोवतीच्या गुढतेत आपापली वेगळी छटा जोडते.

स्थानिक दंतकथेनुसार असे म्हटले जाते की, राजांनी सुध्दा हा रहस्यमय दगड हलवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे त्याला 'राजांनाही हलवता न येणारा'अशी ख्याती मिळाली. १९०८ साली ब्रिटीशांनी या कामासाठी सात हत्ती लावुन सुध्दा बटर बॉल जागचा हलला नाही.बटरबॉलला खऱ्या अर्थाने आकर्षक बनवणारी गोष्ट केवळ त्याच्या ऐतिहासिक संदर्भ नाही, तर ज्या नैसर्गिक भुवैज्ञानिक प्रक्रियेने तो तयार झाला आहे ती प्रक्रियासुध्दा आहे.असे मानले जाते की, ही प्रचंड खडक रचना लाखो वर्षापासुन नैसर्गिक शक्तींनी घडवली गेली आहे, त्यामुळे तिचे हे अद्वितीय आणि अशक्य वाटणारे स्थान निर्माण झाले आहे. निसर्ग आणि काळ यांच्यातील परस्परक्रियेमुळे हे विस्मयकारक दृश्य निर्माण झाले आहे, जे भुवैज्ञानिक आणि पर्यटक या दोघांनाही आजही गोंधळात टाकत आहे.

**डॉ. विजय बाबर, वर्धा**
मो. ९४२३११८८०६

# विषमुक्त मातीचा ऋषी: पद्मश्री सुभाष शर्मा

**ज**मिनीची धूप थांबवून तिला पुनरुज्जीवित करणारा आणि विषमुक्त अन्नाचा ध्यास घेणारा अवलिया म्हणजेच पद्मश्री सुभाष शर्मा. यवतमाळच्या दारव्हा रस्त्यावरील तिवसा या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा नैसर्गिक शेतीचा प्रवास आज संपूर्ण देशासाठी एक दिशादर्शक दीपस्तंभ ठरला आहे.वयाची पचाहत्तरी ओलांडल्यानंतरही त्यांची ऊर्जा,उत्साह आणि मातीविषयीची निष्ठा वाखाणण्याजोगी आहे.


सुमारे तीन दशकांपूर्वी, १९९५ पर्यंत सुभाषजींनी पारंपरिक रासायनिक शेती केली. मात्र, रासायनिक खतांमुळे जमिनीची खालावणारी सुपीकता आणि वाढणारा उत्पादन खर्च लक्षात आल्यावर १९९६ मध्ये त्यांनी पूर्णपणे'केमिकल फ्री' नैसर्गिक शेतीकडे वळण्याचा निर्णय घेतला. यवतमाळहून दारव्हा रस्त्यावरील तिवसा येथील त्यांच्या १७ एकर क्षेत्रात त्यांनी 'मिश्र पिकांचे मॉडेल' (Mixed Farming Model) आणि फळबागा विकसित केल्या आहेत. हे मॉडेल आज कृषी क्षेत्रातील एक अभ्यासपूर्ण प्रयोग मानले जाते. सुभाष शर्मा हे केवळ शेतीतील प्रयोगशील तज्ञ नाहीत, तर अत्यंत सूक्ष्म व्यावसायिक दृष्टिकोन जपणारे शेतकरी आहेत. २०२० मध्ये मला त्यांच्या शेताला प्रत्यक्ष भेट देण्याचा आणि 'विषमुक्त शेती करणारे प्रयोगशील शेतकरी' म्हणून त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्याचा दुर्मिळ योग आला. त्या भेटीदरम्यान त्यांच्या शेतीतील समृद्ध अनुभवांची आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनाची मला जवळून ओळख झाली.

इतर शेतकरी जेव्हा केवळ पारंपरिक पिके घेतात, तिथे सुभाष शर्मा हेसुद्धा पारंपरिक पिकांसह तूर, हळद, सोयाबीन आणि भाजीपाला पिके घेतात. ते बाजारपेठेचा आणि निसर्गचक्राचा सखोल अभ्यास करून पिकांचे उत्तम नियोजन करतात. बाजारात कोणत्या वेळी कोणत्या मालाला सर्वाधिक मागणी आणि भाव असतो, यावर त्यांचा अचूक डोळा असतो.'ऑगस्टच्या मध्यात सांबार (कोथिंबीर) पेरला तर त्याला बाजारात सर्वोत्तम भाव मिळतो,' हे त्यांचे गणित अगदी पक्के असते. कांद्याच्या बाबतीतही त्यांचा असाच अनोखा दृष्टिकोन आहे.कांदा पूर्ण वाढवून विकण्यापेक्षा ते तो हिरवा असतानाच विकतात. 'हिरव्या कांद्यालाच जेव्हा २०-२५ रुपये किलोचा भाव मिळतो, तर मग तो पूर्ण वाढेपर्यंत वाट कशाला पाहायची?' हा त्यांचा व्यावसायिक तर्क थक्क करणारा आहे.



भाजीपाल्याच्या बाबतीतही त्यांचे निसर्गशास्त्र अगदी स्पष्ट आहे. पावसाळ्यात वांगी पिकावर कीड प्रचंड प्रमाणात लागते, म्हणूनच ते पावसाळ्यात वांगी घेतच नाहीत; तर किडीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी योग्य वेळ साधून ऑक्टोबरच्या सुमारास वांग्याची लागवड करतात. त्यांच्या शेतात भोपळा, वांगी, टमाटे यांसारख्या भाजीपाल्याचे विपुल उत्पादन तर होतेच; पण त्यासोबतच नैसर्गिक पद्धतीने प्रति एकरी १२ ते १५ क्विंटल तुरीचे उत्पादन ते घेतात. रासायनिक खतांचा बेसुमार वापर करूनही साधारण शेतकऱ्याला १५ क्विंटल तूर पिकवणे कठीण जाते, तिथे ही किमया ते सेंद्रिय पद्धतीने साधतात. विशेष म्हणजे, त्यांच्या गव्हाला पेरणीआधीच बुकिंग मिळून जाते! मी स्वतः त्यांच्या शेतातून हळद पावडर, धणे पावडर आणि तूरडाळ आणली होती; त्याचा स्वाद व दर्जा इतका अप्रतिम होता की ती आम्हाला दोन वर्षे पुरली!

एकीकडे बाजारपेठेत अनेकदा विषमुक्त आणि रासायनिक भाजीपाल्याला एकच भाव मिळतो, म्हणून ते बाजारात 'केमिकल फ्री' असा कोणताही डांगोरा न पिटता सामान्य भावातही उत्तम नफा कमावून दाखवतात. अशा वेळी 'त्यांच्या शेतातील विषमुक्त भाजीपाला व धान्य अमरावती शहरात आणता येईल का?' अशी संकल्पना मी नंदकिशोर गांधी यांच्याकडे मांडली होती. आज प्रत्यक्ष सुभाषजी शर्मा यांच्या अमरावतीतील कार्यक्रमाच्या आयोजनात किशोर देशमुख, नंदकिशोर गांधी आणि गोकुळम गो-शाळेचे अभिषेक मुरके यांची नावे पाहून मला मनस्वी आनंद झाला. विषमुक्त शेतीची ऊर्मी बाळगणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचे ते खऱ्या अर्थाने 'मेंटॉर' आहेत. ते केवळ स्वतः शेती करत नाहीत, तर इतरांनाही सक्षम मार्गदर्शन करतात. त्यांचे शेतीचे हे मॉडेल पाहून प्रेरणा घेतलेल्या खामगाव येथील खालिद भाई, तारिक भाई या मुस्लिम बांधवाची ५० एकर शेती आज सुभाषजींच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली समृद्ध होत आहे.



पद्मश्री सुभाष शर्मा हे केवळ शेतकरी नसून एक उत्तम, प्रभावी आणि अभ्यासू व्याख्यातेही आहेत. क्लिष्ट वैज्ञानिक संकल्पना अतिशय साध्या, सोप्या आणि वऱ्हाडी बोलीतील अनुभवांच्या भाषेत मांडण्याची त्यांची हातोटी अप्रतिम आहे.



**-प्रा. डॉ. प्रदीप दंदे,**
माजी नगरसेवक अमरावती

# चिंचखेड येथे आदिवासी महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

## गावठी दारूमुळे कुटुंबे उद्ध्वस्त ; पातूर पोलीस ठाण्यावर धडक

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर पोलीस ठाण्यापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर जंगलाच्या कुशीत वसलेल्या चिंचखेड गावात गावठी दारू विक्री व जुगाराचे अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप करीत आदिवासी महिलांनी दारूबंदीच्या मागणीसाठी आज पातूर पोलीस ठाण्यावर धडक दिली. यावेळी महिलांनी पोलिसांना निवेदन देत गावातील अवैध दारूविक्रीवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

### कारवाई न झाल्यास एसपी कार्यालयावर मोर्चाचा इशारा



चिंचखेड गावात मोठ्या प्रमाणात गावठी दारूची विक्री होत असल्याने अनेक कुटुंबांवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. दारूच्या व्यसनामुळे संसार उद्ध्वस्त होत असून, महिला व मुलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे महिलांनी निवेदनातून सांगितले. यासोबतच गावात जुगाराचे प्रकारही सुरू असल्याने सामाजिक वातावरण बिघडत असल्याचा आरोप करण्यात आला.

गावातील अवैध दारूविक्री तत्काळ बंद करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आदिवासी महिलांनी केली. पोलिसांनी या अवैध व्यवसायाला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर आगामी काळात मोठ्या संख्येने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा महिलांनी दिला. या आंदोलनामुळे चिंचखेड परिसरातील अवैध दारूविक्री व जुगाराच्या प्रश्नाकडे पोलिसांचे लक्ष वेधले गेले असून, आता पोलीस प्रशासन या तक्रारींवर कोणती कारवाई करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. यावेळी निवेदन देताना बळीराम लोखंडे, सरपंच विकास वानखडे, उपसरपंच रवींद्र डाखोरे ,ग्रामपंचायत सदस्य विकास अत्तरकार, आदिवासी नेते रामचंद्र लोखंडे, सुखदेव लोखंडे, राजू खुळे, लक्ष्मी ठाकरे, मैना करवते, पार्वती ठाकरे, गंगा ठाकरे, सुखभाई पवार, शिवानी जामकर, रत्नमाला झळके, ढोके, मीरा खुळे, गंगा झाल्टे, कविता झळके, अशा शिंदे, लता गोरे, निर्मला आगरावे, शीला गवळी, कविता खुळे यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी महिलांचा सहभाग होता.

# अकोला जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## २१ दिवसांच्या पावसाच्या खंडाने खरीप पिके संकटात; शिवसंग्रामचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

अकोला जिल्ह्यात गेल्या २१ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला असून अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली आहे. त्यामुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी २५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी सोयाबीन, कपाशी, उडीद, मूग यासह विविध खरीप पिकांची पेरणी केली आहे. पिके उगवून वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात असतानाच पावसाचा खंड पडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून पिकांची वाढ खुंटली आहे. काही भागांत पिके सुकण्याच्या अवस्थेत पोहोचली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पावसाअभावी पिकांची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत असल्याने यंदाच्या खरीप उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर पुन्हा संकट उभे राहिले आहे. मागील तीन वर्षांपासून अतिवृष्टी, अनियमित पाऊस आणि पावसातील खंड यामुळे शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत असल्याकडेही परनाटे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.



### तातडीने पीक नुकसानीचे सर्वेक्षण करा

प्रशासनाने विलंब न करता जिल्ह्यातील पिकांची प्रत्यक्ष पाहणी करावी, पंचनामे करून वस्तुनिष्ठ पीक नुकसानीचे सर्वेक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या निकषानुसार अकोला जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना पीकविमा, आपत्ती मदत तसेच आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसंग्रामने केली आहे.

# पर्यावरणपूरक 'गोरक्षण रोड का राजा'चे भक्तिभावात आगमन



■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीसेवा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित गोरक्षण रोड वरील पर्यावरणपूरक 'गोरक्षण रोड का राजा'चे मोठ्या भक्तिभावात आगमन झाले. मंडळाने गेल्या दोन वर्षांपासून आर्चसहित २६ फूट उंचीची विशाल मूर्ती बनविली आहे. पर्यावरणाचा विचार करता या भव्य मूर्तीचे विसर्जन न करता प्रतीकात्मक शाडू मूर्तीचे विसर्जन करण्यात येत आहे.यावेळी मंडळाच्या वतीने हनुमंताची झाकी साकार करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर या मूर्तीचे झाकी सहित मंडपात आगमन करण्यात आले. स्थानिक तुकाराम चौक येथून या आगमनाची शोभायात्रा प्रारंभ झाली.यावेळी आ रणधीर सावरकर यांच्या हस्ते पूजा-आरती करण्यात आली. नंतर श्रीमूर्तीला विशाल रथावर विराजमान करून शेकडो भक्तांसह शोभायात्रा काढण्यात आली.ही शोभायात्रा जयभोले समोर आल्यावर तीथे माजी आ गोपीकिशन बाजोरिया यांच्या हस्ते व समर्थ शर्मा यांच्या उपस्थितीत स्वागत करून पूजन करण्यात आले आणि भव्य आतिशबाजी झाली. शोभायात्रा सहकार नगरात पोहोचल्यावर आनंद उर्फ पिंटू वानखडे व अक्षय गंगाखेडकर यांनी स्वागत केले.चार बंगला परिसरात नगरसेविका चंदा शर्मा, प्रियांश कोरडिया व बगेरे कुटुंबाने शोभायात्रेचे स्वागत केले. अनेक ठिकाणी क्रेन व जेसीबीच्या सहाय्याने विशाल श्रीमूर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात येऊन नाचत बागडत व आतिषबाजी करीत जल्लोष करण्यात आला. ही शोभायात्रा मंडपात येताच खदान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या हस्ते श्रीपूजन करण्यात आले. त्यानंतर भव्य आतिशबाजी व रंगीत विद्युत रोषणाई करून जल्लोषाचे वातावरण निर्माण करण्यात आले.मंडळाचे अध्यक्ष मधुर बिसेन यांनी स्वागत करून उपक्रमाची माहिती दिली. आभार मंडळाचे सचिव प्रथमेश शर्मा ने मानले.यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सेवाधारी उपस्थित होते.

# पक्ष संघटन वाढीसाठी संपूर्ण विदर्भात दौरे आखणार - प्रा. प्रकाश डवले

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विकासकार्याचा धडाका सुरू केला असून सर्व पक्षांतील लोकप्रतिनिधी शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत.या अनुषंगाने पक्षाचा भरीव जनाधार वाढविण्यासाठी आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात विदर्भात जनसंपर्क अभियान राबवून पक्षाची ध्येय धोरणे घराघरात पोहोचवणार असल्याची माहिती शिवसेनेचे विदर्भ प्रवक्ते प्रा प्रकाश डवले यांनी दिली. शासकीय विश्रामगृहात शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संतोष अनासाने यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पक्षाची विकासात्मक मोट बांधली.ते म्हणाले,राज्यातील सर्वात विश्वासपात्र आणि लोकप्रिय नेते म्हणून शिंदे पुढे आले असून, त्यांची हीच वाढती लोकप्रियता विरोधकांची



मुख्य अडचण ठरत आहे. शिवसेना ही टीकेला टीकेने नव्हे, तर विदर्भाच्या धडाकेबाज विकासकामांनी उत्तर देत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.विदर्भाच्या विकासाबाबत बोलताना प्रा. डवले म्हणाले की, राज्य शासनाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून विदर्भातील ११ जिल्ह्यांना १५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे (नागपूर ७६ कोटी, अमरावती ७४ कोटी). तसेच यवतमाळ जिल्ह्यासाठी ६९२ कोटींचा विकास आराखडा आणि विदर्भातील ६२ सिंचन प्रकल्पांसाठी ३,४७६ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत.

# राणी सती दादी यांच्या भादवा उत्सवाची तयारी सुरू

■ प्रतिनिधी | अकोला ■

लाखो भक्तांची तारणहार राणी सती दादी यांच्या भादवा उत्सवाची तयारी सुरू करण्यात आली आहे.स्थानिक राणी साती धाम येथे ४ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर पर्यंत भादवा बदी उत्सव आयोजित केला जाणार आहे. या उत्सवाच्या व्यवस्थापनासाठी गुरुवारी धाम येथे उत्साहात सभा पार पडली. धामचे अध्यक्ष जगदीशप्रसाद बाछुका यांच्या अध्यक्षतेत व सचिव नवीन झुनझुनवाला व मनीष बाछुका यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना विविध कामे सोपवण्यात आली.या भादवा उत्सवाची सुरुवात शुक्रवार दि ४ सप्टेंबरला कृष्ण जन्माष्टमीच्या रूपात होईल.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सवाच्या नियोजनासाठी संयुक्त सभा

■ प्रतिनिधी | अकोला ■



भारतीय बौद्ध महासभेच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही २१ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या नियोजनासाठी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर प्रणित विविध विंग्सच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त सभा सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता अशोक वाटिका सभागृह, अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी, वंचित युवक आघाडी, महिला आघाडी, विद्वत सभा, भारिप बहुजन महासंघ तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलन आदी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची या सभेला उपस्थिती राहणार आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सवाच्या अनुषंगाने नियोजन, आयोजन व व्यवस्थापनासह विविध विषयांवर सभेत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

सभेला सर्व विंग्सचे आजी-माजी पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका, बोधाचार्य, उपासक-उपासिका, हितचिंतक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष आयु. पी. जे. वानखडे, सरचिटणीस नंदकुमारजी डोंगरे, कोषाध्यक्ष विजयजी जाधव आणि महिला जिल्हाध्यक्ष आयु. इंदूताई मेश्राम यांनी केले आहे. ही माहिती जिल्हा प्रचार, प्रसार व पर्यटन सचिव संजय गवई यांनी पत्रकाद्वारे दिली.

**Change In Name**

Passport no AJ317297 I have change my Name From **BUSHRA PARVIN --TO-- BUSHRA BEGUM ARIFUR RAHMAN KHAN**
MY RESIDENTIAL ADDRESS IS - MOHAMMAD ALI ROAD KOTHADI BAZAR AKOLA444001

# लाडकी बहीण योजनेसाठी SC-ST निधी वळविल्याचा आरोप

### ४,६०१ कोटींचा निधी मूळ विभागांकडे परत करण्याची राजेंद्र पातोडेंची मागणी; अन्यथा मंत्र्यांच्या निवासस्थानी मोर्चाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी राखीव असलेला तब्बल ४,६०१.१३ कोटींचा निधी वळविण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी केला आहे. हा निधी तातडीने संबंधित विभागांकडे परत करावा, अन्यथा सामाजिक न्याय व आदिवासी विकास मंत्र्यांच्या निवासस्थानांवर अनुसूचित जाती-जमातींच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनावर कॅगच्या अहवालात गंभीर आक्षेप नोंदविण्यात आल्याचा दावा पातोडे यांनी केला. निर्धारित अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा ३,५४१.१६ कोटींचा अतिरिक्त खर्च झाल्याचे तसेच जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत काढण्यात आलेला १५,५८६ कोटींचा निधी थेट लाभार्थ्यांना वितरित न करता व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंट्समध्ये ठेवण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, योजनेतील प्रणालीगत त्रुटींमुळे १४,२९८ पुरुषांना दरमहा १,५०० प्रमाणे सुमारे २१.४४ कोटींचा लाभ मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. अपात्र लाभार्थी तसेच एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांना लाभ मिळाल्यानेही शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडल्याचा आरोप पातोडे यांनी केला. पातोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल-मे २०२५ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ४१०.३० कोटींच्या निधीचा, तर ९ सप्टेंबर २०२५ रोजी ३४४.३० कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी मंजूर करण्यात आला. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ मध्ये ?४१०.३० कोटी, जानेवारी-फेब्रुवारी २०२६ मध्ये ९८.४५ कोटी, तर मे-जून २०२६ मध्ये ३४४.७४ कोटींचा निधी वळविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

तसेच, १२ ऑगस्ट २०२६ रोजी जुलै महिन्याच्या आर्थिक लाभासाठी आणखी ३४४.७४ कोटींचा निधी वळविण्यात आल्याचा दावा पातोडे यांनी केला आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद केली जाते. त्यामुळे या समाजाच्या विकासासाठी मंजूर झालेला निधी अन्य योजनांकडे वळविणे हा त्यांच्या हक्कांवर अन्याय असल्याचे पातोडे यांनी म्हटले. लाडकी बहीण योजना राबविण्यासाठी मागासवर्गीय समाजाच्या विकासाचा निधी वापरणे योग्य नाही. अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी मंजूर झालेला प्रत्येक रुपया त्याच समाजाच्या विकासासाठी खर्च झाला पाहिजे,' अशी भूमिका त्यांनी मांडली. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेवर क्षमतेपेक्षा अधिक खर्च केला असून, त्याचवेळी एण-एऊ घटकांचा निधी वळविण्यात आला असल्याचा आरोपही त्यांनी केला. निधी वळविण्याच्या निर्णयाची सविस्तर माहिती सरकारने सार्वजनिक करावी, अशी मागणी त्यांनी केली. अनुसूचित जाती-जमातींच्या विकासाचा निधी वळविला जात असताना सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांची भूमिका काय, असा सवाल पातोडे यांनी उपस्थित केला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकरणात भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. निधी तातडीने मूळ विभागांकडे वर्ग न केल्यास पंधरा दिवसांत संबंधित मंत्र्यांच्या निवासस्थानांवर मोर्चे काढण्यात येतील, असा इशारा पातोडे यांनी दिला. तसेच अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी राखीव निधी अन्य कारणांसाठी वापरला जाऊ नये, यासाठी सरकारने स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी केली.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सुशीला वसंतराव डोळस, किशोर वसंतराव डोळस आणि भाग्यश्री किशोर डोळस, रा. हनुमान मंदीर जवळ, दुबे वाडी, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचेकडून रु. १८,००,०००/- (अठरा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन – वार्ड क्र. C - 11, मौजे उमरी, प्रगणे अकोला, ता. व जि. अकोला येथील अकोला महानगरपालिका मालमत्ता क्र. ३५९८, प्लॉट क्र. २८, सर्वे क्र. ७० सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १०२.५ चौ. मिटर व त्यावरील बांधकामासहीत ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस – रस्ता, पश्चिमेस - जंजाळ यांचा प्लॉट क्र. ४७; उत्तरेस चंदनशिवे यांचा प्लॉट क्र. २९ ; दक्षिणेस - घुमरे यांचा प्लॉट क्र. २७ या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २९/०८/२०२६.

**अॅड. सा. दा. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

## जाहीर सूचना

दिनांक : - २९/०८/२०२६

सर्व लोकांना या नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार मोहम्मद फय्याज शेख मोहम्मद रा. फिरदौस कॉलनी, अकोला ता. जि. अकोला यांनी दिलेल्या माहीती व अधिकारावरुन हसीना भिक्कन नौरंगाबादी यांचे मालकीची व ताब्यातील जि.पं.स.र.स.डी.र.डी. अकोला ग्रा. पं. टाकळी जलंब चे कक्षेतील गांव मौजे टाकळी जलंब, प्र. ता. जि. अकोला येथील शेत गट नं. १, वर्ग-१, २.४० हे. आर. आकार रु. १६.८८ पैसे, यातील हिस्सा माझे मालकीची व ताब्यातील व नोंद माझे नावे असलेली शेत जमीन ज्याचे क्षेत्रफळ ०.९१ आर यापैकी १ एक्कर १ गुंठा शेत जमीन, ज्यास चतु:सिमा पुर्वेस : श्री. पुरुषोत्तम अमृत मदनकर यांचे शेत, पश्चिमेस रोड, दक्षिणेस :- श्री. विश्वनाथ रामभाऊ घाटोळे यांचे शेत, उत्तरेस : रोड ही मालमत्ता (शेत जमीन) आमचे पक्षकाराने सदर वरील मालमत्ता रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे.

तरी कोणत्याही व्यक्ती व त्याच्या वारसांचा, पतसंस्था, बँक इत्यादींचा वरील नमुद मालमत्तेवर कोणताही व्यवहार अथवा ईसार, खरेदी, हक्क, बोजा, दान, गहाण, बक्षीस व इतर याबाबत कुठलीही तक्रार असल्यास वरील स्थावर मालमत्तेबाबत कोणालाही काही व्यवहार करावयाचा असल्यास व हरकत घ्यावयाची असल्यास ही नोटीस प्रसीध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी दस्ताऐवजासह खालील दिलेल्या पत्यावर संपर्क करावा, अन्यथा आमचे पक्षकार होणा-या व्यवहाराबद्दल कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, तसेच त्यानंतर कोणाचाही कोणताही उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

: संपर्क :
**अॅड. फरहान अहमद ताहेर**
हुदा कॉलनी, गोवर्धन मार्केटच्या समोर, वाशिम रोड,
अकोला ता. जि. अकोला. मो. ९४२३८५०७८६

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४४/२०२६ — प्रोसेस नं.१०७८४/२०२६
चौ.ता. ०७/१०/२०२६ — दिनांक : २१/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. देवका पांडुरंग असलमोल रा. प्लॉट नं. ३, जैन मंदिर जवळ, गोकर्णा पार्क, डाबकी रोड, जुने शहर, ता..जि. अकोला. २. सौ. ज्योती गजानन थोटांगे रा. जुने शहर, राठोड पंच बंगल्या जवळ, अकोला. ३. सौ. शामला देवानंद शेंडे रा. रेणुका नगर, बोरगाव मंजू, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. मंगला प्रदिप राठोड रा. पंचायत समितीच्या मागे, नागलकर नगर, नांदूरा, ता. जि. बुलढाणा. ५. सौ. वैष्णवी राजेश चोपडे रा. शिवाजी नगर, शिवचरण पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ६. प्रमोद पांडुरंग असलमोल रा. सोपीनाथ नगर, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला. ७. सुरेश पांडुरंग असलमोल रा. प्लॉट नं. ३, जैन मंदिर जवळ, गोकर्णा पार्क, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पांडुरंग नामदेव असलमोल
**पत्ता :-** रा. प्लॉट नं. ३, जैन मंदिर जवळ, गोकर्णा पार्क, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पांडुरंग नामदेव असलमोल यांचे दि.०५/०२/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३५१/२०२६ — प्रोसेस नं.१०३९४/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. विनय दत्तात्रय शिदोरे रा. फ्लॅट नं.२०६, वसंत कमल विहार सोसायटी, महालक्ष्मी बिल्डिंग, जुना वारजे नाका, कर्वे नगर, पुणे. २. समीर दत्तात्रय शिदोरे रा. ई–७, साई सहवास अपार्टमेंट, शालिनी रेसिडेन्सी मागे, जुना स्पेन्सर चौक, कर्वे नगर, पुणे. ३. अंजली आनंद भागवत रा. बी, साई समृद्धी अपार्टमेंट, अकोली रोड, जय भवानी किराणा दुकानाजवळ, साई नगर, अमरावती. ता. जि. अमरावती. ४. प्रज्ञा चंद्रशेखर दांडेकर रा. एन–४२-जेई– १ / ९ / ४, ४था स्केम, रायगड चौक, पवन नगर, सिडको कॉलनी, नाशिक.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीमती. प्रतिभा दत्तात्रय शिदोरे
**पत्ता :-** रा. शिदोरे वाडा, शिव ज्वेलर्स च्या मागे, राउतवाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयांत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती प्रतिभा दत्तात्रय शिदोरे यांचे दि. २१/०२ / २०२६ रोजी पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३८०/२०२६ — प्रोसेस नं.१०५३६/२०२६
चौ.ता. ०१/१०/२०२६ — दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. कमल रमेश बोधकर २. श्याम रमेशराव बोधकर मो क. ९९६०४०२०४४ ३. ओमकुमार रमेशराव बोधकर अर्जदार क्र. १ ते ३ रा. आसरा फ्लोअर मिल जवळ, अमनखॉ प्लॉट, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. नंदा रमेशराव बोधकर (लग्नापूर्वीचे नाव) येगडे नंदा (लग्नानंतरचे नाव) लग्नानंतरचे पूर्ण नाव - नंदा मदन येगडे रा. व्दारा मदन, ५–११९, मन्नुर गुडीहातनुर, मन्नुर, पो. गुर्जामन्नुर, जि. आदिलाबाद तेलंगाना.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमेश महादेवराव बोधकर
**पत्ता :-** रा. आसरा फ्लोअर मिल जवळ, अमनखॉ प्लॉट, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश महादेवराव बोधकर यांचे दि. १७/०९/२०१३ रोजी कोरडे हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४७/२०२६ — प्रोसेस नं.१०९५८/२०२६
चौ.ता. १७/१०/२०२६ — दिनांक : २७/०८/२०२६

**अर्जदार :** १. अतुल दामोदर नाकट २. गिरीष दामोदर नाकट दोघेही रा. घर क्र. ३७, चतुर्भुज कॉलनी, सुधिर कॉलनी जवळ, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९४२३४२८६५२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : केसर दामोदर नाकट
**पत्ता :-** रा. घर क्र. ३७, चतुर्भुज कॉलनी, सुधिर कॉलनी जवळ, अकोला, ता. जि. अकोला. मो. क्र. ९४२३४२८६५२

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केसर दामोदर नाकट यांचे दि. १६/०७/२०२६ रोजी राहते घरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी, आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### घरासमोरील दुचाकी चोरी

**समुद्रपूर -** घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना रेणकापूर येथे घडली. या प्रकरणी अनिल धुर्वे यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. धुर्वे यांनी त्यांची एमएच ३१ सीवाय ६३६० क्रमांकाची दुचाकी नेहमीप्रमाणे घराच्या आवारात उभी केली होती. सकाळी घराबाहेर आल्यानंतर त्यांना दुचाकी दिसून आली नाही. सुरुवातीला परिसरात तसेच आजूबाजूच्या ठिकाणी दुचाकीचा शोध घेण्यात आला. मात्र, बराच शोध घेऊनही दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने दुचाकी चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

° ° ° °

### संकुलातील दोन घरांमधून ऐवज चोरी

**वर्धा-** संकुलातील दोन घरांना लक्ष्य करीत अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह सोन्याचे दागिने व रिस्टवॉच असा तब्बल ५४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. म्हसाळा परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. चेतन भालकर हे पत्नीसह मुलाला शाळेतून आणण्यासाठी बाहेर गेले होते. घरी परतल्यानंतर त्यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे दिसले. घराची पाहणी केली असता आलमारीतील ३८ हजार रुपये गायब असल्याचे आढळले. यानंतर दुसऱ्या माळ्यावर राहणारे गौरव बडवाईक यांच्या घरातही चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या आलमारीतून ४ हजार ५०० रुपयांचे मंगळसूत्र, ८ हजार ५०० रुपयांचे दोन नेकलेस आणि ३ हजार रुपयांची रिस्टवॉच असा १६ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला.

° ° ° °

### घरावरून पडल्याने युवकाचा मृत्यू

**वर्धा-** घरावरून पडून गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. शुभम जाजुर्ले (२९) असे मृत युवकाचे नाव आहे. बोरगाव मेघे परिसरातील हनुमाननगर येथे ही घटना घडली. शुभम हा घरावर असताना अचानक खाली पडला. या घटनेत त्याला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी तातडीने त्याला उपचारासाठी सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांकडून त्याच्यावर उपचार सुरू करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याची प्रकृती खालावली आणि त्याचा मृत्यू झाला.

# स्मशानभूमीतही 'नरकयातना'; मृतदेहांनाही सन्मान नाही

## एकाच ओट्यावर ३-४ मृतदेह जाळण्याची वेळ, २०-२५ लाखांच्या वर्गणीचा हिशोब द्या आर्वीकरांची मागणी

**आर्वी/जनमाध्यम**

आयुष्यभर सुख-दुःखाचा संघर्ष केल्यानंतर अखेरच्या प्रवासात तरी आपल्या माणसाला सन्मान मिळावा, एवढीच प्रत्येकाची अपेक्षा असते. मात्र आर्वी शहरातील स्मशानभूमीची विदारक अवस्था पाहता मृत्यूनंतरही सुटका नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे. एकाच ओट्यावर तीन ते चार मृतदेह जाळण्याची वेळ येत असल्याने स्मशानभूमीच्या व्यवस्थेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एकेकाळी सुस्थितीत असलेली ही स्मशानभूमी आता देखभालीअभावी दुरवस्थेत गेल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. नगर परिषदेने रोटरी क्लबच्या विनंतीवरून स्मशानभूमीच्या व्यवस्थेची जबाबदारी रोटरी क्लबकडे सोपविली होती. सुरुवातीला काही प्रमाणात सौंदर्यीकरण करण्यात आले. मात्र कालांतराने देखभालीकडे दुर्लक्ष झाल्याने परिस्थिती बिकट झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्मशानभूमीच्या सौंदर्यीकरणासाठी रोटरी क्लबकडून नागरिकांना वर्गणी देण्याचे आवाहन करण्यात आले होते. 'सगळ्यांनाच एक ना एक दिवस इथे यावे लागेल' या भावनेतून नागरिकांनी आपल्या ऐपतीनुसार मदत केली. सूत्रांच्या माहितीनुसार रोटरी क्लब ३०३० कडे सुमारे २० ते २५ लाख रुपयांचा निधी जमा झाला असावा, असा दावा केला जात आहे. मात्र या निधीतून नेमकी कोणती कामे झाली, किती रक्कम खर्च झाली आणि सध्या किती निधी शिल्लक आहे, याचा पारदर्शक लेखाजोखा नागरिकांसमोर यावा, अशी मागणी होत आहे. अंत्ययात्रेसाठी स्मशानभूमीत येणाऱ्या नागरिकांना



तेथील परिस्थिती पाहून संताप व्यक्त होत आहे. मृतदेहांनाही रडू येईल अशी बोचरी प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत असून, अखेरच्या निरोपासाठी आलेल्या कुटुंबीयांच्या भावनांचीही ही अवहेलना असल्याचे बोलले जात आहे. दोन कोटींचा निधी; आता तरी कायापालट होणार का स्मशानभूमीच्या दुरवस्थेबाबत नागरिकांनी आमदार सुमित वानखडे यांच्याकडे तक्रारी केल्या. त्याची दखल घेत वानखडे यांनी वैशिष्ट्यपूर्ण निधीतून स्मशानभूमीच्या संपूर्ण सौंदर्यीकरणासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे स्मशानभूमीचा कायापालट होण्याची अपेक्षा नागरिकांना आहे.मात्र नवीन निधीतून काम सुरू करण्यापूर्वी पूर्वी नागरिकांकडून जमा झालेल्या वर्गणीचा हिशोब सार्वजनिक करावा, अशी मागणी जोर धरत आहे. जुन्या पैशांचा हिशोब नाही, तर नव्या दोन कोटींचे काय असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. स्थानिक नागरिक राजेश खंडारे म्हणाले, 'आपण आयुष्यभर कर भरतो, वर्गणी देतो. मरणानंतर तरी आपल्या माणसाला सन्मानाने निरोप मिळावा, ही अपेक्षा असते. मात्र येथे चार-चार मृतदेह एकत्र जाळण्याची वेळ येत आहे. ही नागरिकांच्या भावनांची अवहेलना आहे. रोटरीने जमा केलेल्या निधीचा हिशोब प्रथम जनतेसमोर द्यावा. काँग्रेस नेते प्रा. संजय वानखेडे यांनीही स्मशानभूमीची अवस्था अत्यंत वेदनादायी असल्याचे सांगत पूर्वी जमा झालेल्या निधीची चौकशी करून लेखाजोखा सार्वजनिक करण्याची मागणी केली. सामाजिक कार्यकर्ते पंकज गोडबोले म्हणाले, स्मशानभूमी हा राजकारणाचा विषय नसून माणसाच्या अंतिम सन्मानाचा विषय आहे. आमदारांनी दोन कोटींचा निधी दिल्याचे स्वागत आहे. मात्र पूर्वीच्या वर्गणीचा पारदर्शक हिशोब देणे हे संबंधितांचे नैतिक कर्तव्य आहे. स्मशानभूमीचे काम तातडीने सुरू करावे, जुन्या निधीचा लेखाजोखा जाहीर करावा आणि नव्या दोन कोटींचा प्रत्येक रुपया पारदर्शकपणे खर्च करावा, अशी मागणी आता आर्वीकरांनी लावून धरली आहे.

# वादाचा वचपा काढण्यासाठी स्प्रिंकलरचे पाईप जाळले

**देवळी -** जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी शेतात ठेवलेले स्प्रिंकलरचे पाईप पेटवून दिल्याची घटना सोनेगाव बाई येथे घडली. या घटनेत शेतकरी राजेश खापर्डे यांचे सुमारे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले. खापर्डे यांचा काही दिवसांपूर्वी गावातीलच सुभाष व्यवहारे यांच्याशी वाद झाला होता. हा वाद मनात ठेवून व्यवहारे यांनी शेतात ठेवलेले स्प्रिंकलरचे पाईप पेटवून दिल्याचा आरोप खापर्डे यांनी पोलिसांत दाखल केलेल्या तक्रारीत केला आहे. शेतातील साहित्य जळाल्याचे निदर्शनास आल्यानंतर खापर्डे यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तक्रारीची नोंद घेत संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शेतीसाठी आवश्यक असलेले स्प्रिंकलर पाईप जळाल्याने खापर्डे यांचे आर्थिक नुकसान झाले. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक नितीन मदनकर करीत आहेत.



# जाळ्यात अडकला बिबट्या; वन विभागाने दाखवली तत्परता

## सीएडी कॅम्पमध्ये थरार; नियोजनबद्ध रेस्क्यू ऑपरेशनमधून वन्यजीवाला जीवदान

**विरुळ-आकाजी/जनमाध्यम**

सीएडी कॅम्प, पुलगाव परिसरातील संरक्षक जाळीत बिबट्या अडकल्याची माहिती मिळताच वन विभागाने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. सावधगिरी आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आलेल्या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये बिबट्याची सुखरूप सुटका करण्यात आली. वन विभागाच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला असून वन्यजीवाला जीवदान मिळाले.

उपवनसंरक्षक हरविर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव मोहीम राबविण्यात आली. बिबट्याला नियंत्रित करताना वन विभागाच्या पथकाने आवश्यक ती खबरदारी घेतली. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमित झा यांनी बिबट्याची वैद्यकीय तपासणी केली. तपासणीनंतर त्याची प्रकृती समाधानकारक असल्याचे स्पष्ट झाले.

या मोहिमेत सीएडी कॅम्पचे आयएसओ कॅप्टन चिराग, करुणाश्रमचे सचिव आशिष गोस्वामी, मानद वन्यजीव रक्षक कौस्तुभ गावंडे, पीएफएचे डॉ. अक्षय गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, क्षेत्र सहाय्यक व्ही. एम. नरांजे यांच्यासह वनरक्षक के. डी. राठोड, माधव माने, अरुण गीते, पारस बडदे, वैशाली कोंडे आणि पूजा पूयेड यांनी सक्रिय सहभाग घेतला.

समन्वयातून वन्यजीवाला जीवदान सीएडी कॅम्प प्रशासन, पशुवैद्यकीय विभाग, स्वयंसेवी संस्था आणि वन विभाग यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे बचाव मोहीम यशस्वी झाली. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी अशा घटनांमध्ये तातडीने प्रतिसाद देणे महत्त्वाचे



ठरते. या मोहिमेतील वन विभागाच्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# रक्षाबंधनाच्या ओवाळणीला ५३ हजार बहिणी मुकल्या

## ई-केवायसी अन् पात्रता पडताळणीचा फटका

**वर्धा/जनमाध्यम**

रक्षाबंधनाच्या दिवशी भावाकडून बहिणीच्या हातावर प्रेमाने ठेवली जाणारी ओवाळणी जशी जिव्हाळ्याची असते, तशीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची ओवाळणी सरकारकडून बहिणींच्या खात्यात जमा होत आहे. मात्र, यंदा वर्ध्यासह राज्यातील तब्बल ५३ हजार ६३७ लाडक्या बहिणींची ही ओवाळणी हुकली आहे. लाभार्थी यादीची पडताळणी आणि ई-केवायसी प्रक्रियेत अपात्र ठरलेल्या महिलांना जुलै महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः ६५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या महिलांची संख्या यात मोठी आहे.

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर २५ ऑगस्टपासून जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण सुरू झाले. १ कोटी ४१ लाख ८५ हजार महिलांच्या खात्यांमध्ये सुमारे २ हजार ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले. उर्वरित सुमारे २३ लाख पात्र महिलांच्या खात्यांतही रक्षाबंधनाच्या दिवशी अनुदान जमा होण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने जून २०२४ मध्ये ही योजना सुरू केली. सुरुवातीला लाभार्थी महिलांची संख्या मोठी होती. मात्र, आधार संलग्नता, ई-केवायसी, उत्पन्नाची मर्यादा, कुटुंबातील शासकीय कर्मचारी, अन्य शासकीय योजनांचा लाभ आणि वयोमर्यादा यांसह विविध निकषांची पडताळणी करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणावर नावे अपात्र ठरली.अर्ज केलेल्या सुमारे २ कोटी ४८ लाख महिलांपैकी एप्रिलअखेर सुमारे ९२ लाख नोंदी अपात्र ठरवण्यात आल्या. त्यामुळे लाभार्थी संख्या सुमारे १ कोटी ६५ लाखांवर आली आहे. आता नव्या पडताळणीनंतर आणखी ५३ हजार ६३७ महिलांना जुलैचा हप्ता मिळणार नसल्याचे समोर आले आहे.

या योजनेत २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिला हा प्रमुख पात्रता निकष आहे. त्यामुळे ६५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या महिलांचा योजनेतील लाभ थांबला आहे. परिणामी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला अनेक बहिणींच्या खात्यात सरकारची १,५०० रुपयांची 'ओवाळणी' पोहोचली नाही.दोन वर्षांपूर्वी योजनेच्या प्रारंभी रक्षाबंधनाच्या काळात एकाच वेळी तीन महिन्यांचे ४,५०० रुपये खात्यात जमा करण्यात आले होते. त्यावेळी सरकारने त्याचा 'बहिणींना दिलेली ओवाळणी' असा भावनिक प्रचार केला होता. यंदा मात्र हजारो बहिणींच्या वाट्याला ओवाळणीऐवजी अपात्रतेची बातमी आली आहे.

# माझं गाव आरोग्य संपन्न गाव साठी ग्रामस्थांची आरोग्य वाटचाल

## कुष्ठरोग संशयितांचा शोध घेण्यासह नेत्ररोग शिबिराचा निर्णय



**मिर्झापूरनेरी(आर्वी)जनमाध्यम**

माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत आदर्श ग्राम संसद मिर्झापूर नेरी येथे ग्रामस्तरीय आरोग्य कृती दल समितीची बैठक उत्साहात पार पडली. गावातील नागरिकांना निरोगी आणि सक्षम आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी विविध उपाययोजनांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

समितीचे अध्यक्ष तथा सरपंच बाळा सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गावातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. कुष्ठरोग निर्मूलन मोहिमेला अधिक गती देत गावातील प्रत्येक संशयित रुग्णाचा शोध घेण्यावर भर देण्यात आला. गावात एकही कुष्ठरोगाचा संशयित रुग्ण तपासणीपासून वंचित राहू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.दरम्यान, २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान नेत्ररोगाबाबत व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांनी डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष करू नये, यासाठी गावपातळीवर जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य विभागाच्या माध्यमातून भव्य नेत्ररोग तपासणी शिबिर आयोजित करण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.

गावातील आरोग्यविषयक समस्या वेळेत ओळखून त्यावर सामूहिकपणे उपाययोजना करण्यासाठी ग्रामस्तरीय आरोग्य कृती दलाची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, जनजागृती आणि वेळेवर तपासणी यामुळे गाव अधिक आरोग्यसंपन्न करण्यास मदत होणार आहे. बैठकीचे प्रास्ताविक डॉ. श्रीकांत टाले यांनी केले. संचालन व आभार ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले यांनी मानले. बैठकीत ग्रामस्तरीय आरोग्यविषयक विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.

# विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

**गिरड-** शेतात कामासाठी गेलेल्या महिलेचा विहिरीत पडून बुडाल्याने मृत्यू झाला. निर्मला कुंभरे (६५), रा. तळोदी असे मृत महिलेचे नाव आहे. निर्मला कुंभरे या स्वतःच्या शेतात कामासाठी गेल्या होत्या. शेतातील विहिरीतून पाणी काढत असताना अचानक त्यांचा तोल गेला. त्यामुळे त्या विहिरीत पडल्या.

विहिरीत पडताच पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. ही घटना लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत निर्मला यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर गिरड पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला. याप्रकरणी गिरड पोलिस ठाण्यात अकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# रात्र सभेतून शेतकऱ्यांना खरीप व्यवस्थापनाचे धडे

## कापूस, सोयाबीन, तुरीवरील कीड-रोग नियंत्रणावर भर



**सेलू/जनमाध्यम**

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत टाकळी किटे येथे आयोजित रात्र सभेत शेतकऱ्यांना खरीप पीक व्यवस्थापनाबाबत शास्त्रीय मार्गदर्शन करण्यात आले. कापूस, सोयाबीन आणि तूर या प्रमुख पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी पेरणीपासून काढणीपर्यंत नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले. आकाश लेवाडे यांनी शेतकऱ्यांना योग्य वाणाची निवड, वेळेवर पेरणी, योग्य अंतर व रोपसंख्या, बीजप्रक्रिया, संतुलित खत व्यवस्थापन तसेच आवश्यकतेनुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर याबाबत मार्गदर्शन केले. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण व आंतरमशागत केल्यास पिकांना अन्नद्रव्ये, पाणी आणि सूर्यप्रकाशाची योग्य उपलब्धता होते, असे त्यांनी स्पष्ट केले.पावसाचे प्रमाण आणि जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन पाणी व्यवस्थापन करावे. कापूस, सोयाबीन आणि तुरीमध्ये कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून सुरुवातीच्या अवस्थेतच नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात, असा सल्लाही देण्यात आला. एकात्मिक पीक व्यवस्थापनातून उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला. हवामानातील बदल, अतिवृष्टी किंवा पावसातील खंड यानुसार पीक व्यवस्थापनात आवश्यक बदल करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमात सुमित शेंडे, आशीष ठाकरे, प्रणय वाघमारे, कौस्तुभ आंबटकर, देवांश चौधरी, सार्थक तेलरांधे आणि सरपंच मनोज तामगाडगे सहभागी झाले. प्राचार्या डॉ. स्नेहल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. कार्यक्रम समन्वयक राजेंद्र खर्चे, कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता चोपडे व आकाश लेवाडे यांनी सहकार्य केले.

# शेतकरी उद्ध्वस्त करून एमआयडीसी नको, शेतीच गेली तर शेतकरी काय करणार?

## परसोडीच्या जमीन संपादनापूर्वी मागण्या सोडवा, खा.अमर काळेंचा उद्योगमंत्री उदय सामंतांना इशारा

**सेलू/जनमाध्यम**

विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनीवर घाला घालून त्यांच्या भवितव्याचा सौदा करता कामा नये, अशी ठाम भूमिका खासदार अमर काळे यांनी घेतली आहे. सेलू तालुक्यातील मौजा परसोडी येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू झाली असताना, शेतकऱ्यांच्या मागण्या आणि अडचणी आधी सोडवा; योग्य आणि न्याय्य मोबदला दिल्याशिवाय जमीन संपादन करू नका, अशी मागणी खासदार काळे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

परसोडी परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्या आणि अडचणींचे निवेदन खासदार काळे यांच्याकडे दिले. औद्योगिक विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या हक्कांवर बुलडोझर फिरविणे मान्य करता येणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली. प्रशासनाने थेट शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या समजून घ्याव्यात आणि चर्चेतून मार्ग काढावा, अशी मागणीही करण्यात आली.

**महामार्गांनी शेती कमी केली; आता एमआयडीसीचा घाव**

वर्धा जिल्ह्यात विविध महामार्गांच्या निर्मितीसाठी यापूर्वी मोठ्या प्रमाणात शेती संपादित करण्यात आली आहे. त्यातच पिकाऊ, विशेषतः कापूस लागवडीखालील क्षेत्र सातत्याने कमी होत आहे. आता औद्योगिक वसाहतीसाठी पुन्हा मोठ्या प्रमाणात शेती संपादनाच्या हालचाली सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.उद्योग येतील, रोजगार निर्माण होतील; पण शेतकऱ्याच्या हातातील जमीनच गेली तर त्याच्या पुढच्या पिढीने करायचे काय हा प्रश्न परसोडीतील शेतकऱ्यांना सतावत आहे. विकास हवा, पण तो शेतकऱ्याला उद्ध्वस्त करून नको, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे.

**जमीन घ्यायची असेल तर आधी न्याय द्या**

शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत खा.अमर काळे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्र



लिहिले आहे. जमीन संपादन करताना शेतकऱ्यांचे संपूर्ण हक्क अबाधित ठेवावेत, कायद्यानुसार योग्य व न्याय्य मोबदला द्यावा आणि जमीन संपादनासंदर्भातील सर्व कायदेशीर तरतुदींचे काटेकोर पालन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

जमीन संपादनाच्या प्रक्रियेत कोणत्याही शेतकऱ्यावर दबाव आणला जाऊ नये. प्रशासनाने शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांच्या मागण्या, अपेक्षा आणि अडचणी जाणून घ्याव्यात. पुनर्वसन, योग्य मोबदला आणि इतर कायदेशीर हक्क निश्चित केल्याशिवाय जमीन संपादनाची कार्यवाही पुढे नेऊ नये, अशी स्पष्ट भूमिका खा.काळे यांनी घेतली आहे.

**शेतकरी वाचला तरच विकासाला अर्थ**

औद्योगिक वसाहतींच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास व्हावा, रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, याला कोणाचाही विरोध नाही. मात्र विकासाची किंमत जर शेतकऱ्याच्या पिढीजात जमिनीने मोजायची असेल, तर त्या शेतकऱ्याच्या भवितव्याची हमी सरकारने आधी द्यावी, अशी मागणी पुढे आली आहे. शेतीच गेली तर शेतकरी काय करणार हा प्रश्न केवळ परसोडीपुरता मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्याच्या भवितव्याशी जोडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्या सोडवून, त्यांना न्याय्य मोबदला आणि सर्व कायदेशीर हक्क देऊनच परसोडी एमआयडीसीसाठी जमीन संपादनाची प्रक्रिया पुढे न्यावी, अशी ठाम मागणी खा.अमर काळे यांनी केली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कोचिंग क्लासेसचे नियम शिथिल करा

## शिखर संघटनेची पत्रकार परिषदेत मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य खाजगी कोचिंग क्लास संचालकांच्या शिखर संघटनेने राज्य सरकारच्या नवीन कोचिंग क्लास मसुद्यातील नियम शिथिल करण्याची मागणी आज शनिवार २९ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेमध्ये संघटनेचे राज्य प्रवक्ता बंडुपंत भुयार यांनी केली आहे.

त्यांनी सांगितले आहे की, १०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या क्लासचे नोंदणी, विद्यार्थ्या मागे अर्धा वर्ग फूट जागा, आणि महिन्यातून एकदा मानसोपचार तज्ज्ञांची भेट बंधनकारक करू नका. नोंदणीसाठी ३ वर्षे जुना क्लास असण्याची अट रद्द करावी. एकदाच सूट द्यावी. १३ वर्षांपेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांना कोचिंग बंदी ऐवजी त्यांच्यासाठी सूट द्यावी. अनुभवी शिक्षकांसाठी शिक्षक पदवीची अट रद्द करावी. फी परत करण्याची अट रद्द करावी. अधिकाऱ्यांनी येण्यापूर्वी सूचना देण्याचा नियम असावा. शालेय शिक्षकांप्रमाणे कोचिंग शिक्षकांसाठीही पुरस्कार योजना असावी. रॅम्प सक्तीची अट रद्द करावी. कोचिंग क्लासच्या शिक्षकांना अनुभवाच्या आधारावर शिक्षक मतदारसंघासाठी मतदानाचा अधिकार द्यावा. राज्य सरकारने कोचिंग क्लासेससाठी नवीन नियमावलीचा मसुदा जारी केला आहे. त्यावर सूचना आणि आक्षेप ४ सप्टेंबर संध्याकाळी ६ वाजेपर्यंत नोंदवता येणार आहेत,जर सरकारने त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले तर उच्च न्यायालयात जाण्याची संघटनेची तयारी आहे. पत्रकार परिषदेमध्ये राज्य प्रवक्ते बंडोपंत भुयार, अमरावती अध्यक्ष संतोष वासकर, सचिव दिलीप मेंहदले, कोषाध्यक्ष सतीश देशमुख, सुधीर यावलकर, सुनील मानकर, विशाल बारबुद्धे, सुरेंद्र पाथरे, आदित्य वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला राष्ट्रीय क्रीडादिवस

## आयआयएमसीच्या विद्यार्थ्यांची जिल्हा क्रीडा संकुलाला भेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जन संचार संस्थानच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्य जिल्हा क्रीडा संकुलाला भेट देवून विविध क्रीडा प्रकारांची माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर तंदुरुस्त भारत (फिट इंडिया) ची शपथ घेत मैदानी आणि आंतरगृही खेळ खेळून राष्ट्रीय क्रीडादिवस उत्साहात साजरा केला.



भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी), अमरावतीच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त्य विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून मोठ्या उत्साहात हा दिवस साजरा केला. यात विद्यार्थ्यांनी शिक्षकांसमवेत गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी तपोवन येथील जिल्हा क्रीडा संकुलाला भेट दिली. त्याचबरोबर शुक्रवारी,(दि.२८ रोजी) तंदुरुस्त भारत (फिट इंडिया) ची सामुहिक शपथ घेतली, तद्नंतर मैदानी आणि आंतरगृही खेळ खेळून शारिरिक तंदुरुस्तीचे महत्व समजून घेतले. यावेळी धावणे, बॅडमिंटन, कॅरम, बुद्धीबळ इत्यादी खेळ प्रकारात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

जिल्हा क्रीडा संकुल भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आर्चरी, स्क्वॅश, मुष्टियुद्ध, व्हॉलीबॉल, जिम यांसह विविध क्रीडा प्रकारांची माहिती घेतली. तसेच खेळाडू आणि प्रशिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या प्रशिक्षण पद्धती, दैनंदिन दिनचर्या, आहार, व्यायाम, योग-प्राणायाम आणि शारीरिक तसेच मानसिक तंदुरुस्ती राखण्यासाठी केले जाणारे उपाय जाणून घेतले. सातत्यपूर्ण सरावासोबतच खेळाडूंना सकारात्मक वातावरण आणि कौतुकाची थाप मिळणेही त्यांच्या आत्मविश्वासासाठी महत्त्वाचे आहे, अशी भावना यावेळी अनेक खेळाडूंनी व्यक्त केली. यावेळी संकुलातील प्रशिक्षक सुमित थोरात (स्क्वॅश कोर्ट), संकेत सोळंके (जिम ट्रेनर), प्रफुल्ल डांगे (तिरंदाजी) आणि वेदांत वानखड़े (तिरंदाजी) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्रीडा प्रशिक्षणाची माहिती आणि खेळाडूंशी संवादाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी जिल्हा क्रीडा विभागाचे आभार मानले.

या आयोजनात क्षेत्रीय संचालक प्रा. डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांच्या सह डॉ. विनोद निताळे, जयंत सोनोने आणि रोहन तायडे सहभागी होते. यावेळी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी राजेश कुमार, राजेश झोलेकर, नूरुज्जमा शेख, भूषण मोहोकार, अनंत नांदुरकर, नंदा तुप्पट, राहुल पाटमासे आदींनी योगदान दिले.

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२३९/२०२६** **ने.ता.०१.१०.२०२६**

**१. सतिश ज्ञानेश्वर कणसे**
**२. कल्पना रविंद्र चेंडकापुरे**
रा.वार्ड नं.२, राणी अमरावती, ता.बाभुळगाव, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत ज्ञानेश्वर नामदेवराव कणसे** यांचा **मृत्यू दि. २०.०८.२०२४** मध्ये येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयताचे पत्नी नामे **प्रमिला ज्ञानेश्वर कणसे** यांचा मृत्यू **दि.१९.०७.२०२६** येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ हा मुलगा, अर्जदार क्र.२ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २९ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

# सावर्डी येथील विश्वशांती बुद्ध विहारात थायलंडच्या भिक्षुसंघाचे आगमन

## भव्य शोभायात्रेनंतर भिक्षुसंघाकडून परित्त पाठ

**अमरावती/प्रतिनिधीः-** सावर्डी येथील विश्वशांती बुद्ध विहाराला थायलंड येथील भिक्षुसंघाने भेट देत परित्त पाठाचे पठण केले. या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमानिमित्त गावात उत्साहाचे आणि धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.

थायलंड येथून आलेल्या भिक्षुसंघाचे सावर्डी ग्रामस्थ व बुद्ध विहाराच्या अनुयायांच्या वतीने भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. भिक्षुसंघाच्या आगमनापूर्वी गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत मोठ्या संख्येने महिला, पुरुष, युवक तसेच बालकांनी सहभाग घेतला. बुद्धवंदना, धम्मवंदना आणि शांततेचा संदेश देत ही शोभायात्रा गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करून विश्वशांती बुद्ध विहार येथे पोहोचली.



यानंतर विश्वशांती बुद्ध विहारात थायलंडच्या भिक्षुसंघाच्या उपस्थितीत परित्त पाठाचे आयोजन करण्यात आले. भिक्षूंनी बौद्ध परंपरेनुसार मंगलमय वातावरणात पवित्र गाथांचे पठण केले. यावेळी उपस्थित उपासक-उपासिकांनी शांतचित्ताने परित्त पाठ ग्रहण केला.

या कार्यक्रमातून भगवान गौतम बुद्धांनी दिलेला शांती, करुणा, मैत्री, अहिंसा आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. थायलंडमधील भिक्षुसंघाची सावर्डी येथील भेट ही बौद्ध धम्माच्या जागतिक बंधुभावाचे प्रतीक ठरली.

कार्यक्रमादरम्यान भिक्षुसंघासोबत ग्रामस्थांनी संवाद साधला तसेच त्यांचे आशीर्वाद घेतले. महिला व बालकांसह मोठ्या संख्येने नागरिक या धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाले होते. संपूर्ण परिसरात बुद्धवंदना, धम्मवंदना आणि परित्त पठणामुळे अत्यंत प्रसन्न व शांत वातावरण निर्माण झाले होते.

थायलंडच्या भिक्षुसंघाची विश्वशांती बुद्ध विहाराला झालेली ही भेट सावर्डीच्या धार्मिक व सामाजिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण आणि संस्मरणीय घटना ठरली.

# विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये रक्षाबंधन उत्साहात

**लेहेगाव/प्रतिनिधीः-** येथील श्री विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंट , लेहेगाव,या शाळेत रक्षाबंधनाचा सण मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि सुंदर राख्या तयार करून आणल्या. विद्यार्थ्यांनी मुलींनी मुलांना राखी बांधल्या. उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे व आपुलकीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पवित्र सणामागील प्रेम, बंधुभाव, आपुलकी आणि नात्यांचे महत्त्व नितु जितेंद्र तट्टे (मुख्याध्यापिका ) यांनी सांगितले . विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील शिक्षकवृंद मनीषा मनोहरे मॅडम व निशा यादव मॅडम व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रक्षाबंधनाचा कार्यक्रम आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

---

Sipna Shikshan Prasarak Mandal, Amravati's
**ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, CHIKHALDARA, DISTT. AMRAVATI-444807**
Contact No. - 07220-230309, 9423126066
NAAC Reaccredited 4th Cycle with CGPA 3.22 at grade "A"(2023-2028)
Permanent Affiliated to Sant Gadge Baba Amravati University,
Email:ascc 163@sgbau.ac.in

**WANTED**

Application are invited for appointment of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :-

Vacancies for grant in aid courses / programmes on Contributory (CHB) basis as

| Sr. No. | Subject/course | Total No. of vacant contributory Post |
|---|---|---|
| 1 | Mathematics | 02 |

**Eligibility :** Academic qualification shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No.08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकिर्ण-2018 (185/18)/मशि -3, dt. 14/11/2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.
**Note :-** Application on plain paper along with bio-data and attested copies of certificates, testimonials, should reach to Principal's Office **on or before 05/09/2026**

(Shri. Jagdish M. Gupta)
(President)

(Dr. Rajesh S. Jaipurkar)
(Principal)

# १२ सप्टेंबर ला 'राष्ट्रीय लोकअदालत'

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार, शनिवार १२ सप्टेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये 'राष्ट्रीय लोकअदालती' चे आयोजन करण्यात आले आहे.

न्यायालयात दाखल असलेली आणि दाखलपूर्व (प्री- लिटीगेशन) प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत. या लोकअदालतीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पक्षकारांना यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. तसेच, यामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांचा अंतिम निकाल त्याच दिवशी लावण्यात येणार आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होणार आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

# बीडीएस हायस्कुल येथे रक्षाबंधन निमित्त कार्यशाळा संपन्न

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित बीडीएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,चांदूर रेल्वे येथे रक्षाबंधन निमित्त विद्यार्थ्यांकडून राखी तयार करणेकरीता स्काउट गाईड पथकातर्फे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच इको क्लब द्वारा आयोजीत वृक्षरक्षाबंधन या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी परीसरातील वृक्षांना बांधल्या व त्याद्वारे वृक्षांचे महत्व विद्यार्थ्यांना सांगून वृक्षांचे संरक्षण करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. तसेच खरी कमाई अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या राख्यांची विक्री केली व उत्तम व्यवसाय करण्याचा आनंद घेतला. या उपक्रमात शाळेतील १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी या कार्यशाळेत स्वतः विविध प्रकारच्या लहान मोठ्या राख्या तयार केल्या. त्याची प्रदर्शनी मांडण्यात आली होती. यातून वर्ग ५ ते ७ मधून ३ व वर्ग ८ ते १० मधून ३ उत्कृष्ट राख्या निवडण्यात आल्या. परीक्षणाचे काम मुख्याध्यापक डॉ.अतुल ठाकरे व पर्यवेक्षक एन.व्ही.धोपटे यांनी पार पाडले. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या सीमेवरील सैनिकांना पाठवून देशाचे संरक्षण करत असल्याबद्दल त्यांचे 'ऋण' व्यक्त केले.या उपक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन स्काउट गाईडच्या प्रभारी एस.बी.देशमुख व टी.आर.घोरपडे तसेच इको क्लब च्या प्रभारी आर.पी.बनसोड यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६७७/२०२६**
**मो.तन्वीर + ४ वि निरंक**
**पुढील ता.१६.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 
1. **Mohammad Tanweer Sohel Shah Mohammad Haroon**
Aged 52 years. Occu.: Service
R/o. 103, Sai Villa Apartment, SRPF Camp road, Near Wadali Garden Gaglani Nagar, Amravati
2. **Naheed Rehana Mahammad Tahzeeb**
Aged 54 years, Occu.: Household
R/o. Furkaniya Masjid Dastgir Nagar, Darwha, Tq.Darwha, Dist. Yavatmal
3. **Nasreen Rizwana Afaque Ahmad**
Aged 50 years, Occu.: Household
R/o. Bazar Line, Ward No.3, Kurha, Tq. Tiosa, Dist. Amravati
4. **Farheen Shabnam Mansoor Husain Shah**
Aged 47 years, Occu.: Household
R/o. Flat No. 107, Ist floor, Classic Park View Apartment, Vyankatesh Colony, Wadali Garden, Amravati
5. **Naziya Shaheen Mohammad Hanif Shah**
R/o. Flat No. 107, Ist floor, Classic Park View Apartment, Vyankatesh Colony, Wadali Garden, Amravati

विरुध्द

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Mohd. Haroon Shah Gulzar Shah** हया दिनांक ३१.०१.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Mohammad Tanweer Sohel Shah Mohammad Haroon + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Mohammad Tanweer Sohel Shah Mohammad Haroon + 4** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

**जाहीर नोटीस**

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **रवी मोहनसिंग गजबे** यांच्या वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन - मौजे - वरुड भाग 2, शेत सर्वे क्र.9/2 मधील लेआउट प्लॉट क्र.27-A याचे एकूण क्षेत्रफळ 92.95 चौ.मीटर आहे, ता. आणि जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **रवी मोहनसिंग गजबे** यांच्या मालकीची आहे. तद्नंतर त्यांनी ***Vastu Housing Finance Corporation Ltd.*** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि.15/03/2021 रोजीचे दस्त क्र.1163** हे मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बॅंक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **3 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर दोन्ही मालमत्ता हया ***Vastu Housing Finance Corporation Ltd.*** येथे गहाण करण्यात येईल करीता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण-तालुका-आणि जिल्हा अमरावती**
**दि.२९/०८/२०२६**

आपला,
***ADVOCATE***
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**
शिक्का

---

*No.3*
**FAMILY COURT AMRAVATI**
**IN THE COURT OF Shri V.P. Patkar**
**Principal Judge Family Court Amravati,Amravati,Amravati.**

**SUMMONS TO APPEAR IN PERSON**
**(O, 5, R,3)**

**Petition No. A/334/2021**
**Sunita @ Suchita Ghanashyam Yadav Vs Ghanashyam Ramlalji Yadav**
**NEXT DATE : 07-09-2026**

**To,**

**1) Ghanashyam Ramlalji Yadav**
**R/o. House No.7, Remand Home Galli, Saptagiri Appt.**
**Amravati, Tq. Dist. Amravati, Amravati,AMRAVATI, MAHARASHTRA**
**2) Vaishali Ghanashyam Yadav**
**R/o. Palas Line, Behind Gajanan Maharaj Temple, Gadge Nagar,**
**Amravati, Tq. Dist. Amravati, Amravati, AMRAVATI, MAHARASHTRA**

Whereas **Sunita @ Suchita Ghanshyam Yadav** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person on the **07-09-2026 at 11.00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and you are directed to produce on that day all the doucments upon which you intend to rely in support of your defence.

Take notice, that, in default of your appearance of the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **12.08.2026**

शिक्का
**sd/-**
**Principal Judge Family Court, Amravati**

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app **"eCourts Services"** from Android or IOS.

The process is system generated and transmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

---

**जाहीर नोटीस**

प्रो.नं.२१४८/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.२९.०८.२०२६

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील**
**एम.ए.शिलार, दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.३४२/२०२६** **ने.ता.२९.०९.२०२६**

**अर्जदार -**
१. **मिरा हरिश्चंद्र टाले,** वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
२. **महेंद्र हरिश्चंद्र टाले,** वय ५२ वर्षे, धंदा - शेती
नं.१ व २ रा.नरदोडा, पो.कान्होली, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **रंजना विनोद हिंगणकर,** वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कालवाडी, ता.जि.अकोला

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार-** **निरंक**

या नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **हरिश्चंद्र श्रीराम टाले** हे दिनांक ०४.०२.२०२५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत हरिश्चंद्र श्रीराम टाले** यांचे नांवे मौजा नरदोडा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.२७२,० हे ८१ आर, आ.रु.४.५२ रु. व गट क्र.१०६,० आर, आ.रु.४.७४ येणेप्रमाणे मिळकत आहे.सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ५०,०००/- इतकी आहे.

आज दि.२९.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२४३/२०२६** **ने.ता.३०.०९.२०२६**

**१. बेबीताई मानदेवराव काकडे**
**२. अमोल मानदेवराव काकडे**
**३. साहेबराव मानदेवराव काकडे**
सर्व रा.रोहणा, पो.वेणी गणेशपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. संगिता विलासराव ठाकरे, रा.यावर्डी, ता.कारंजा लाड, जि.वाशिम

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत मानदेव ज्ञानोबाजी काकडे** यांचा **मृत्यू दि. १०.०६.२०२४** मध्ये रोहणा,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ही मुले व अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २९ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२४५/२०२६** **ने.ता.०१.१०.२०२६**

**१. रिजवना साबीर शेख**
रा.रोहणा, पो.वेणी गणेशपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत मोहम्मद साबीर अब्दुल सत्तार** यांचा **मृत्यू दि. २३.१२.२०३०** मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला.**मयताचे अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २९ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७२१/२०२६**
**Najma + 2-Vs- Nil**
**पुढील ता.२१.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 
1. **Najma Bee Sayyad Kadir**
Aged about 55 years. Occu.: Household
2. **Sayed Anees Sayed Quadeer**
Aged about 45 years, Occu.: Labour
Both R/o. Muzaffar Pura, Haidar Pura, Amravati
3. **Sayyed Anwar Sayed Qadeer**
Aged about 40 years, Occu.: Labour
R/o. Behind Anjuman School, Noor Nagar, Amravati

विरुध्द

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Saiyad Kadir Saiyad Hamid** हया दिनांक ३१.०१.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Najma Bee Sayyad Kadir +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Najma Bee Sayyad Kadir +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५२**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**अमरावती-** दिवसेंदिवस पत्रकारांवर हल्ले, त्यांना मिळत असलेल्या धमक्या आणि पत्रकाराबद्दल शासनाचे उदासीन धोरण याबद्दल स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे अमरावती जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांनी नाराजी व्यक्त केली असून यानंतर पत्रकारावरील अन्याय सहन करून घेतल्या जाणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. आज स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे नांदगाव खंडेश्वर तालुका अध्यक्ष कासम शहा इमाम शहा यांच्यावर जनुना येथे मनोहर नारायण नरखेडकर यांनी हल्ला केला असता त्यांचा निषेध पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला. त्यानंतर स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) निकेतन कदम यांना निवेदन देऊन हल्ला करणाऱ्यावर लवकर कारवाई करण्यात यावी अशी मागणीही करण्यात आली. यावेळी निवेदन देतांना स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) अमरावती उपाध्यक्ष प्रेमदास मानकर, जिल्हा कार्याध्यक्ष वि. दा. पवार, पदाधिकारी सुरेश दहिकर, नरेश बोरकर, गजानन सावंत, आदेश पाठक, अमोल खंडारे, श्रीकुष्ण नाईक, जयंत गडलिंग, अरुण इंगोले, अमित तिवारी, सुनील वानखडे, अलीम भाई, अमीर शहा, मधुकर सिरसाट, सुरेशराव दाभाडे, अंगत दाभाडे, साबीर हुसेन उपस्थित होते.



### सेंटर डे क्लब ऑए ग्वोबल ट्रस्टची सभा

**अमरावती-** सेंटर डे क्लब ऑए ग्वोबल ट्रस्टची नियमित सभा होटल मानसरोवर पॉईट येथे घेण्यात आली. नागपुर येथून सेटरडे कळवचे सेक्रेटरी प्रविण झाडगावकर यांच्या प्रमूख मार्गदर्शना खाली ही सभा झाली. त्यांनी सर्व सभासदांना व्यवसाय कसा वाढवावा, तसेच वन टू वन कसे करावे तसेच अन्य बाबिंवर मार्गदर्शन केले. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजेश लोखंडे, सचिव कांति चौधरी, अनुपम चव्हाट, कोअरकमेटी सदस्य राजेंद्र पेलागडे, स्वप्नीठ वैद्य, डॉ. ऋषिकेश नागलकर, हर्षल वानखडे, अमोड चवणे, रवि हुरडे, प्रफूल्ल मुंदाने राहूल देशमूख, प्रशांत साबळे, सुनिद चितळे, राजा लूंगे, दिपक तळवळकर, संजय जाधव, ऐश्वर्या जाधव रागीनी लोखंडे, शिशिर लोखंडे, कौशक श्रावस्ती इत्यादी उपस्थित होते. ही माहिती राजेश पेलागडे यांनी दिली.



### निःशुल्क आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती -** जनकल्याण सेवा संस्थाद्वारा संचालित डॉ.हेडगेवार हॉस्पीटल आणि संवेदना आरोग्य सेवा प्रसार उपक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधनाच्या निमित्ताने सफाई कामगाराचा पेशा स्वीकारून शहराचे आरोग्य उत्तम राखण्यामध्ये सिंहाचा वाटा उचलणाऱ्या सफाई कामगारांसाठी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले .यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या साई नगर शाखेने पुढाकार घेतला होता.सफाईचे काम आटोपल्यावर सर्वजण त्यांच्या दररोजच्या ठिकाणी दुपारी १:३० वाजता एकत्रित जमले आणि त्याच मैदानावर ही तपासणी झाली. यावेळी एकूण ५४ कामगारांनी या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.हॉस्पिटल मधून डॉ.वसुंधरा घोडेस्वार, डॉ.सुमित धीमान, डॉ.प्रियंका अर्मळ यांनी सेवा दिली. रुग्णांची नोंदणी करून प्रत्येकाची बीपी, शुगर तपासल्या गेली. डॉक्टरांनी सर्वांसोबत संवाद साधत त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याची चौकशी केली. तसेच आवश्यक ते औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.संघाच्या शाखेने यावेळी डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संवेदना चमूमधून रूपाली चक्रे, काजल राऊत, ऋषिकेश पांडे, अनिकेत कराळे तसेच परिचारिका मयुरी चौधरी, मोनिका कंगाले, शुभम शेटे उपस्थित होते.

# मेलघाटातील अनुदानित खासगी आश्रमशाळांमध्येही शिक्षक भरती करा

## शिक्षक पदांच्या भरतीच्या धर्तीवर शासनाकडे केली मागणी

**मेलघाट/वार्ताहर**

मेलघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा महत्त्वाचा आधार असलेल्या शासकीय तसेच अनुदानित खासगी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची कमतरता ही गंभीर समस्या बनली आहे. दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी मिळावी, यासाठी शासनाने शासकीय आश्रमशाळांप्रमाणेच अनुदानित खासगी आश्रमशाळांमधील रिक्त शिक्षक पदेही तातडीने भरण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची एकूण २,४२१ पदे भरण्यात येणार आहेत. विभागनिहाय पाहता नाशिक विभागात ८२६, ठाणे ६१३, नागपूर ५१४ आणि अमरावती विभागात ४६८ पदांचा समावेश आहे.

शासकीय आश्रमशाळांमधील रिक्त पदे भरण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र, मेलघाटातील मोठ्या संख्येने असलेल्या अनुदानित खासगी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांकडेही शासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. मेलघाटातील अनेक अनुदानित खासगी आश्रमशाळांमध्येही आदिवासी समाजातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शासकीय आश्रमशाळा असो किंवा अनुदानित खासगी आश्रमशाळा, या दोन्ही ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती मोठ्या प्रमाणात समान आहे. मात्र शिक्षकांची संख्या अपुरी असल्यामुळे विद्यार्थ्यांना विषयानुसार



नियमित व गुणवत्तापूर्ण अध्यापन मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः ङ्कगणित, विज्ञान, इंग्रजी, इतिहास, भूगोल यांसारख्या विषयांसाठी आवश्यक शिक्षक उपलब्ध नसल्यास त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होऊ शकतो.

**स्वतंत्र आदेशाची गरज**

शासकीय आश्रमशाळांमधील २,४२१ शिक्षक पदे भरण्याची प्रक्रिया ज्या पद्धतीने राबविण्यात येत आहे, त्याच धर्तीवर अनुदानित खासगी आश्रमशाळांमधील मंजूर मात्र रिक्त असलेली शिक्षक पदे भरण्यासाठी शासनाने स्वतंत्र आदेश काढावा , अशी मागणी होत आहे. विद्यार्थीसंख्या, मंजूर तुकड्या आणि शासनाच्या नियमानुसार आवश्यक शिक्षकसंख्या निश्चित करून त्यानुसार शिक्षक भरती करण्यात यावी. यामुळे मेलघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यास मदत होईल मेलघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी संबंधित हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्याने ङ्कमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांनी आदिवासी विकास विभागासोबत तातडीने चर्चा करून अनुदानित खासगी आश्रमशाळांमधील शिक्षक भरतीबाबत सकारात्मक निर्णय घ्यावाङ्क, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक पदांची भरती होत असताना अनुदानित खासगी आश्रमशाळांमध्येही शिक्षकांची कमतरता दूर करणे आवश्यक आहे. शेवटी शासकीय असो अथवा अनुदानित खासगी आश्रमशाळा दोन्ही ठिकाणी शिक्षण घेणारी मुले मेलघाटातील आदिवासी समाजाचीच आहेत. शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ नये. न्यायाच्या तराजूत दोन्ही बाजूंना समान अधिकार मिळायला हवा. त्यामुळे शासनाने अनुदानित खासगी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांवर तातडीने भरती करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी मेलघाटातून होत आहे.

# गॅस कनेक्शन नावावर करण्यास टाळाटाळ

## श्री दत्त इंडियन गॅस एजन्सीविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**चांदूर रेल्वे-**आईच्या नावावर असलेले उज्ज्वला गॅस कनेक्शन स्वतःच्या नावावर करून देण्यास श्री दत्त इंडियन गॅस एजन्सीकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप करीत शंकर ला. ढोबळे, रा. भगवंत चौक, महादेव घाट, चांदूर रेल्वे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज सादर केला आहे.

ढोबळे यांच्या आई सुमित्रा लहानुजी ढोबळे यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले आहे. तसेच त्यांच्या पत्नीचेही निधन झाले असून, सध्या ते आपल्या लहान मुलीसह राहत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. घरातील चुलीचा वापर बंद करून शासनाच्या उज्ज्वला गॅस योजनेअंतर्गत मिळालेल्या गॅस कनेक्शनचा वापर करण्यात येत आहे. आईच्या निधनानंतर सदर गॅस कनेक्शन व गॅस कार्ड आपल्या नावावर करून



घेण्यासाठी त्यांनी संबंधित गॅस एजन्सीशी संपर्क साधला.

मात्र, गॅस कनेक्शन नावावर करून देण्यासाठी एजन्सीकडून टाळाटाळ करण्यात येत असून वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत, असा आरोप ढोबळे यांनी केला आहे. योग्य माहिती व सहकार्य मिळत नसल्यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

घरात स्वयंपाकासाठी गॅसची अत्यंत आवश्यकता असून आपण व आपली लहान मुलगी अशा दोघांचाच संसार असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. संबंधित एजन्सीच्या कामकाजाची चौकशी करून गॅस कनेक्शन तातडीने त्यांच्या नावावर करून देण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, मागणीची दखल घेऊन योग्य तो तोडगा न निघाल्यास श्री दत्त इंडियन गॅस एजन्सीसमोर शांततामय उपोषण करण्याचा इशारा शंकर ढोबळे यांनी दिला आहे. त्यामुळे प्रशासन या तक्रारीवर काय भूमिका घेते, याकडे चांदूर रेल्वेकरांचे लक्ष लागले आहे.

## जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्वरित संपर्क साधावा

**अमरावती/का.प्र.**

जात वैधता प्रमाणपत्रातील अद्याप त्रुटींची पूर्तता केली नसेल अशा विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन करत प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती कार्यालय शनिवार २९ते ३० ऑगस्ट या सुट्टीच्या दिवशीही पूर्णवेळ सुरू ठेवण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी, वैद्यकीय, आयुष आणि कला शिक्षण) प्रवेश प्रक्रियेसाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप त्रुटींची पूर्तता केलेली नाही. या विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी कार्यालय सुट्टीच्या दिवशीही पूर्णवेळ सुरू ठेवण्यात आले आहे.

अनेक विद्यार्थ्यांनी उशिराने अर्ज सादर केले आहेत. पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जामधील त्रुटींबाबत समितीने वेळोवेळी एसएमएस, ई-मेल आणि पत्राद्वारे कळवले असूनही अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही.अर्जदारांची जबाबदारी प्रवेशाच्या तारखा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) जाहीर करण्यात आल्या आहेत. वेळेत प्रमाणपत्र न मिळाल्यास होणाऱ्या नुकसानीला अर्जदार स्वतः जबाबदार राहतील. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि समितीला वेळेत निर्णय घेता यावा, यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी त्वरित अमरावती समिती कार्यालयाशी संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन समितीच्या श्रीमती बोबडे यांनी केले आहे.

# नागपूरच्या रूग्णावर डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी किडनी प्रत्यारोपण

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे वडिलांनी आपल्या अठरा वर्षीय मुलीला किडनी दान करून दिला पुनर्जन्म. खामला, नागपूर रहिवासी, एका मध्यमवर्गीय कुटुंबातील श्रेया विनोद कानोडे ही गेल्या एक वर्षापासून किडनी आजाराने त्रस्त होती.नागपूर व नंतर सावंगी मेघे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेतल्या नंतर तिने, अमरावती शहरातील डॉ अविनाश चौधरी नेप्रोलॉजिस्ट यांच्याकडे उपचार घेत असताना, तिला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात श्रेयाचे वडील विनोद रामभाऊ कानोडे आपल्या मुलीला किडनी दान देण्यास तयार झाले. तर सर्व तपासणीअंती आपल्या मुलीच्या भविष्याचा विचार करता खंबीर मनाने स्वतः खाजगी नोकरीत असलेले पंचेचाळीस वर्षीय विनोद रामभाऊ कानोडे यांनी स्वतःची किडनी दान करून समाजासमोर अवयवदानाचा आदर्श ठेवला. यात त्यांच्या सर्व नातेवाईकांनी देखील संमती दिली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे,डॉ विक्रम देशमुख, डॉ विशाल बाहेकर ,डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ अक्षय बोराडे , नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी, बधीरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ विद्या इसळ, डॉ रोहन चव्हाण, डॉ ऐश्वर्या नायर,डॉ सलोनी देशमुख यांचा मोलाचा वाटा



**वडिलांनी दिले मुलीला जिवनदान**

होता. चार-पाच तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली. डॉ पंजाबराव वैद्यकीय महाविद्यालयात झालेली हि अकरावी यशस्वी शस्त्रक्रिया ठरली. शस्त्रक्रिया पूर्व तयारीमध्ये रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मेट्रन चित्रा देशमुख, सुषमा गढवाले , एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहाय्यक आरती मोरांडे यांचे सहकार्य लाभले.

प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ मंगेश मेंढे, उपसंचालक, आरोग्यसेवा, अकोला प्रतिनिधी, सेवानिवृत्त उपसंचालक डॉ अविनाश लव्हाळे, एनजीओ सदस्य आयएमए अध्यक्ष डॉ दिनेश वाघाडे, सदस्य डॉ शुभांगी वर्मा, डॉ पवन टेकाडे, डॉ रामाअवतार सोनी,डॉ किशोर बनसोड यांनी रुग्ण व नातेवाईक यांच्यासोबत प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रिया करिता मान्यता दिली.

ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. शस्त्रक्रिया दरम्यान व पश्चात परिचारिका संध्या वाघमारे, शितल अंबरते, प्रियंका मैंद, सुमित्रा गाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, राणी खेकडे, आशिष बोकडे, वैभव नासरे, स्नेहल खरात,रोषण मेश्राम, दिप खांडेकर, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, रूद्रायणी खंडारे, वंशिका परिमल,अनिता गोमकाळे,प्रतिक्षा दामोधर,सेजल बनसोड यांनी जबाबदारी पार पाडली. गोपाल सावरकर, मधुर भुयार, उमेश चव्हाण, उमेश सोनवणे, मंगेश गुडदे, वर्षा गाढवे, जया पवार,आकाश हंबर्डे,तेजस हरणे यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले. किडनी प्रत्यारोपण सारखी अत्यंत अवघड व जटिल शस्त्रक्रिया डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व डॉक्टरांचे, नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# प्रवाशी व वृक्षांना राखी बांधून स्काऊटस् गाईडस्ंनी विद्यार्थ्यांनी दिला वृक्षसंवर्धनाचा संदेश

## श्री साईबाबा विद्यालय, साईनगरचा अनोखा उपक्रम



**अमरावती-** स्काऊट गाईड एकमेकांचे बंधु-भगिणी असतात आणि निसर्गावर प्रेम करणारे असतात याला अनुसरुन दरवर्षी प्रमाणे या वर्षी श्री. साईबाबा विद्यालयातील स्काऊटस् आणि गाईडस् यांचा सामुहिक रक्षाबंधनाचा कार्यक्रम न्यू अमरावती रेलवे स्टेशन, आकोली, येथे घेण्यात आला. संत ज्ञानेश्वर स्काऊट युनिटचे सर्वेसर्वा ज्ञानेश्वर टाले आणि सावित्रीबाई फुले गाईड युनिटच्या गाईड कॅप्टन दिष्या एकलारे यांच्या नेतृत्वात वरील कार्यक्रमाचे घेण्यात आला. यावेळी स्कार्फ प्रदाण करुन स्काऊट गाईड प्रतिज्ञेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्काऊट गाईडचे जीवनातील महत्व प्रास्तविकतून ज्ञानेश्वर टाले यांनी विषद केले. सर्व गाईडस् स्वतः बनविलेल्या राख्या सर्व अतिवी आणि स्काऊट बंधूना बांधल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक राजेश टावरी यांनी मार्गदर्शन केले. यानंतर सर्ष गाईडस्नी सर्व उपस्थित प्रषाश्यांना, ऑटोचालक, पोलिस शिपाई, स्टेशन मास्टर आणि कर्मचारी तसेच रेल्वे लोकोपायलट, गार्ड आणि मजुर वर्गाला राख्या बांधून त्यांनी महिला सरंक्षणाची साद घातली. यामध्ये नेहा कुशवाहा, कृतिका लवंगे, मनश्री येवतीकर ह्यांनी विशेष राखी बनवून वृक्षांना बांधल्या आणि आपले निसर्गाप्रती प्रेम व्यक्त केले. यावेळी जिल्हा घटक स्काउट सुभाष आठवले, कैलाश रंगारी, वैशाली शेंडे, डॉ.स्वप्नील सोनोने, संजय पिटाले, हरिना फाउंडेशनचे उपाध्यक्ष रामप्रसादजी गिल्डा, प्रिती गोल्हर, सरपंच वंदना हरणे, अशोक हांडे, संतोष अरोरा, डॉ.नितीन चावले, राजेंद्र वर्मा,पर्यवेक्षक आशिष पसारकर, कार्यक्रमाचे संचलन स्काऊटमास्टर ज्ञानेश्वर ढाले यांनी केले तर आभार प्रदर्शन दिव्या एकलारे यांनी केले.

# चुनखडीयुक्त जमिनीवर सेंद्रिय शेवग्याची शेती फुलविली

## कृषी अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनातून तरुण शेतकऱ्याचा अभिनव प्रयोग

**आसेगाव पूर्णा /वार्ताहर**

चुनखडीयुक्त जमीन, पारंपरिक पिकांवर असलेले अवलंबित्व आणि शेतीतील वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोर नवनवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. मात्र, या आव्हानांवर मात करीत अचलपूर तालुक्यातील खैरी-दोनोडा येथील तरुण शेतकरी श्रीकृष्ण गव्हाळे यांनी कृषी अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनातून सेंद्रिय पद्धतीने शेवगा शेतीचा अभिनव प्रयोग यशस्वी केला आहे. त्यांच्या या प्रयोगातून परिसरातील शेतकऱ्यांसमोर आधुनिक व पर्यायी शेतीचा आदर्श निर्माण झाला आहे.

अचलपूर तालुक्यातील बहुतांश जमीन चुनखडीयुक्त असल्याने या भागात वर्षानुवर्षे सोयाबीन, कापूस, तूर यांसारखी पारंपरिक पिके घेतली जातात. मात्र, वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता आणि



बाजारभावातील चढ-उतारामुळे पारंपरिक शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे शेतीत काहीतरी नावीन्य आणून आधुनिक पिकांकडे वळण्याचा निर्णय श्रीकृष्ण गव्हाळे यांनी घेतला.

याचदरम्यान त्यांचा संपर्क कृषी अधिकारी अतुल हुड यांच्याशी आला. हुड यांनी शेवगा पिकाचे महत्त्व, त्यातील पौष्टिक गुणधर्म तसेच आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व गव्हाळे यांना समजावून सांगितले. विशेषतः सेंद्रिय पद्धतीने शेवगा लागवड करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनाने प्रेरित होऊन गव्हाळे यांनी सेंद्रिय शेवगा शेती करण्याचा निर्णय घेतला.

**बांधावरच मार्गदर्शन**

सुरुवातीला आधुनिक पिकासाठी आवश्यक साधनसामग्री, तांत्रिक माहिती आणि परिसरातील पारंपरिक मानसिकता यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. मात्र, कृषी अधिकारी अतुल हुड यांनी या अडचणींवर मात करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले. एवढेच नव्हे तर त्यांनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली आणि आवश्यक त्या सूचना देत श्रीकृष्ण गव्हाळे यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे सेंद्रिय पद्धतीने शेवगा बाग फुलविण्यास मोठी मदत झाली.

**१०० ते १५० रुपये किलोपर्यंत दर**

मागील वर्षी शेवग्याला बाजारात चांगला भाव मिळाला. शेवग्याला १०० ते १५० रुपये किलोपर्यंत दर मिळाल्याने उत्पादनातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळाले. सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेतल्यामुळे शेवग्याची गुणवत्ता चांगली राहिली असून बाजारात त्याला मागणीही मिळत असल्याचे शेतकरी श्रीकृष्ण गव्हाळे यांनी सांगितले.

**ग्रामोन्नती फाऊंडेशनचीही मदत**

सेंद्रिय शेवगा शेतीसाठी आवश्यक असलेल्या सेंद्रिय कृषी निविष्ठा ग्रामोन्नती फाऊंडेशनचे अध्यक्ष नाना डवंगे यांनी उपलब्ध करून दिल्या.

कृषी विभागाचे मार्गदर्शन आणि ग्रामोन्नती फाऊंडेशनची मदत यामुळे शेवगा शेतीचा प्रयोग अधिक प्रभावीपणे राबविता आल्याचे गव्हाळे यांनी सांगितले.

'माझ्या या संपूर्ण प्रवासात कृषी अधिकारी अतुल हुड यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनामुळेच सेंद्रिय शेवग्याची बाग उभी राहिली. पारंपरिक पिकांच्या मागे न लागता वेगळ्या पिकाचे उत्पादन घेण्याचा हा प्रयोग यशस्वी झाला असून इतर शेतकऱ्यांनीही आधुनिक व सेंद्रिय शेतीकडे वळावे,' असे शेतकरी श्रीकृष्ण गव्हाळे यांनी सांगितले. चुनखडीयुक्त जमिनीतही योग्य पीक निवड, तांत्रिक मार्गदर्शन आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्यास चांगले उत्पादन व उत्पन्न मिळू शकते, हे श्रीकृष्ण गव्हाळे यांच्या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे.

# पाच कोटींच्या भूखंड फसवणूकप्रकरणी युवासेना पदाधिकाऱ्यासह तिघे अटकेत

## बनावट कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत तयार केल्याचा आरोप, -एलसीबीची कारवाई



**अकोला/प्रतिनिधीः-** तब्बल पाच कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या भूखंडाच्या कथित फसवणूकप्रकरणी युवासेनेचे अकोला पूर्व उपजिल्हाप्रमुख आस्तिक श्रीकृष्ण चव्हाण यांच्यासह तिघांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. बनावट कुलमुखत्यारपत्र व खरेदीखत तयार करून मूळ जमीनमालकाच्या नावाचा गैरवापर करीत भूखंडाची विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या कारवाईने अकोल्यातील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

मलकापूर येथील सर्व्हे क्रमांक ८ मधील प्लॉट क्रमांक २९ हा या प्रकरणाचा केंद्रबिंदू आहे. ५ हजार ७५ चौरस फूट क्षेत्रफळाच्या या भूखंडाची बाजारमूल्य सुमारे पाच कोटी रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. तक्रारदार शांता प्रकाश बाहेकर यांच्या मालकीच्या या भूखंडाबाबत संशयितांनी संगनमत करून बनावट कागदपत्रांचा आधार घेतल्याचा आरोप आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, संशयितांनी एका महिलेला मूळ जमीनमालक असल्याचे भासविले. तिला खोटे नाव धारण ☞(पान २ वर)

### ■ महिला पोलिस अधिकाऱ्याच्या कथित भूमिकेचीही चर्चा-

दरम्यान, मुंबईस्थित एका महिला पोलिस अधिकाऱ्याचा या प्रकरणाशी काही संबंध किंवा हस्तक्षेप होता का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या बाबत अधिकृत दुजोरा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे तपासात या दिशेने काही तथ्य समोर येते का, याकडे लक्ष लागले आहे.

# डफरीनमध्येच घोळ, सरकार नाहक बदनाम

## -पत्रकार परिषदेत भाजप नेत्या चित्रा वाघ यांचा संताप
## अग्निकांड प्रकरणात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा महिला रुग्णालयात झालेल्या भीषण अग्निकांड प्रकरणी राज्य सरकार नाहक बदनाम होत असल्याचा आरोप भाजपा महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी आज शनिवार २९ ऑगस्ट रोजी ☞(पान २ वर)

### ■ शिवसेनेच्या भूमिकेवर प्रश्न

डफरीन अग्निकांडावरून शिवसेना उबाठा गट राजकारण करत असल्याची टीकाही वाघ यांनी केली. 'ज्या वेळी राज्यात त्यांचेच सरकार होते तेव्हा अशा घटना घडल्या. तेव्हा कोणी राजीनामा दिला होता का? आता फक्त राजकारणासाठी आरोप केले जात आहेत' असे त्या म्हणाल्या.पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# 'विमुक्त दिना'निमित्त सोमवारी मुंबईत न्याय, हक्क आणि विकास परिषद

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रमुख मार्गदर्शन
## मंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली भटके-विमुक्त समाजाच्या सर्वांगीण विकासाचा 'रोडमॅप' ठरणार

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** '१८ पगड जातींना' समाजकारण आणि राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मान-सन्मान मिळवून दिला. हीच दूरदृष्टी जपत शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देशभरातील भटके-विमुक्त (डीएनटी) समाजाला संघटित करून त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाहात भक्कमपणे उभे करण्याचा निश्चय केला. ही जबाबदारी त्यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यावर सोपवली.



यातूनच भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प दृढ करत, मुंबईत सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी 'विमुक्त दिना'च्या निमित्ताने भटके – विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ब्रिटिश काळात १८७१ च्या 'क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट' नावाच्या जुलमी कायद्यामुळे अनेक भटके-विमुक्त जमातींवर गुन्हेगारीचा कलंक लादला गेला होता. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हा कायदा रद्द होऊन ३१ ऑगस्ट रोजी हा समाज खऱ्या अर्थाने विमुक्त झाला. या ऐतिहासिक 'विमुक्त दिना'चे औचित्य साधून, अखिल ☞(पान २ वर)

# चांदूर बाजारात बबलू देशमुख यांचा वाढदिवस उत्साहात

## सामाजिक उपक्रमांसह अभिष्टचिंतन; कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** कोणतीही सत्ता नसतानाही काँग्रेसचा कार्यकर्ता डगमगत नाही, तो आजही प्रामाणिकपणे माझ्यासोबत उभा आहे. मला सत्तेच्या अनेक ऑफर होत्या; मात्र विचारधारा बदलणे मला मान्य नव्हते. निवडणुकीतील पराभवाने मी खचलेलो नसून, देशातील परिस्थिती बदलत आहे. भाजपच्या भूलथापांना आता जनता बळी पडणार नाही, असा विश्वास अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)चे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख यांनी व्यक्त केला.



बबलू देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (२९ ऑगस्ट) चांदूर बाजार शहर व ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित अभिष्टचिंतन व नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे होते.

वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भव्य रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे व बिस्कीटांचे ☞(पान २ वर)

# अखेर दुसरा नर बिबटही जेरबंद

## -राजुरा जलशुद्धीकरण केंद्र परिसरात रेस्क्यू
## - १० वर्षे वयाच्या बिबट्याला वाहनातून डार्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मार्डी रोडलगत असलेल्या राजुरा जलशुद्धीकरण केंद्र परिसरात गेल्या काही दिवसांपासून दहशत निर्माण करणाऱ्या दुसऱ्या नर बिबट्यालाही अखेर वन विभागाच्या पथकाने शनिवारी पहाटे सुरक्षितरीत्या रेस्क्यू केले. सकाळी सुमारे ५.४५ वाजता बिबट्याला डार्ट करून बेशुद्ध करण्यात आले, संपूर्ण रेस्क्यू मोहीम सुमारे ६ वाजता पूर्ण झाली. बिबट्या जेरबंद झाल्यानंतर परिसरातील नागरिकांसह जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.राजुरा जलशुद्धीकरण केंद्र व मार्डी रोड परिसरात बिबट्याचा वावर असल्याची ☞(पान २ वर)

### ■ 'यूथ फॉर नेचर'चे सहकार्य-

या रेस्क्यू मोहिमेत वनपाल अमोल गावनेर यांच्यासह यूथ फॉर नेचर कन्झर्वेशन ऑर्गनायझेशनच्या पथकानेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संस्थेच्या वतीने डॉ. स्वप्निल सोनोने, शतनू पाटील, वात्सल्य तोत्रे आणि राहुल धामेचा यांनी वन विभागाच्या पथकासोबत रेस्क्यू कारवाईत सहकार्य केले.

# एमआयडीसीत तेलाच्या 'भेसळी'वर एफडीएचा छापा!

## -१२ लाखांचे सोयाबीन तेल जप्त; दोन पेढ्यांचे परवाने निलंबित

**अकोला/प्रतिनिधीः-** एमआयडीसी परिसरातील तेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडवून देणारी कारवाई अन्न व औषध प्रशासनाने केली. दोन तेल पेढ्यांवर धाड टाकून तब्बल ११ लाख ८२ हजार ६५० रुपये किमतीचा ७ हजार २६ किलो ८०० ग्रॅम रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला. तपासणीत गंभीर त्रुटी आणि भेसळीचा संशय आढळून आल्याने संबंधित दोन्ही पेढ्यांचे परवाने पुढील आदेशापर्यंत तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने २६ ऑगस्ट रोजी एमआयडीसीतील मे. प्रभुदयाळ लक्ष्मीनारायण या पेढीवर तपासणी केली. यावेळी रिफाइंड सोयाबीन ऑइलचा नमुना घेण्यात





आला. तपासणीत सुठे तेलाची विक्री, प्रयोगशाळेची सुविधा नसणे, प्रयोगशाळेचे अहवाल उपलब्ध नसणे, पुनर्वापर तसेच भेसळीचा संशय अशा गंभीर त्रुटी निदर्शनास☞(पान २ वर)

# पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांची धारणीत दमदार एन्ट्री

## तक्रार निवारण दिनाला नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील धारणी पोलीस ठाण्याशी भावनिक नाते जपणारे आणि सध्या अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले IPS निकेतन कदम यांनी शनिवारी (२९ ऑगस्ट) तक्रार निवारण दिनानिमित्त धारणीत दमदार उपस्थिती लावली. त्यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला पोलीस पाटील, शांतता व दक्षता समितीचे सदस्य, व्यापारी, लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या



संख्येने उपस्थित राहून विविध समस्या मांडल्या.

विशेष म्हणजे, निकेतन कदम यांची पहिली प्रोबेशन पोस्टिंग धारणी पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून झाली होती. सन २०२०-२१ मध्ये अवघ्या तीन महिन्यांच्या प्रोबेशन



कालावधीत त्यांनी गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी विविध उपक्रम राबवून मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार कठोर कारवाई केली. त्याचबरोबर गुन्हेगारांचे पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत जनतेचा विश्वास संपादन केला होता. त्यामुळे पोलीस अधीक्षक म्हणून धारणीत पुनरागमन झाल्यानंतर नागरिकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

**समस्या ऐकल्या... निर्णयही तत्काळ-** धारणी पोलीस ठाण्यात आयोजित तक्रार निवारण दिनात☞(पान २ वर)

# गंभीर नवजात बालकांना तातडीने दाखल करून मोफत उपचार

## -जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश, आगीच्या घटनेनंतर उपाययोजना



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. या दुर्घटनेमुळे अतिदक्षता वार्डचे मोठे नुकसान झाले असून, पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नवजात बालकांच्या उपचारात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयांना निर्देश जारी केले आहेत.

जिल्हा स्त्री रुग्णालय व जिल्हा सामान्य रुग्णालयातून पाठवण्यात आलेल्या गंभीर नवजात बालक व बालरुग्णांना उपलब्ध अतिदक्षता विभागात बेडनुसार तातडीने दाखल करून जीवनावश्यक उपचार सुरू करावेत. केवळ पैशांअभावी किंवा आर्थिक कारणांमुळे कोणत्याही गंभीर रुग्णावर उपचार रोखू नयेत किंवा दाखल करण्यास नकार देऊ नये. प्रथम रुग्णाची स्थिती स्थिर करण्याला प्राधान्य द्यावे. तसेच पात्र रुग्णांना आयुष्मान भारत, मुख्यमंत्री सहायता निधी, धर्मादाय रुग्णालय योजना ☞(पान २ वर)

# आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

## अमरावतीहून निघाले होते यवतमाळच्या दिशेने

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** विविध प्रलंबित मागण्यांसाठी अमरावतीहून यवतमाळच्या दिशेने निघालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या 'लाँग मार्च' आंदोलनाने राज्य प्रशासनाची चांगलीच धावपळ उडवून दिली. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या यवतमाळातील निवास स्थानाला घेराव घालण्यासाठी निघालेला हा मोर्चा रोखण्यासाठी खुद्द मंत्र्यांना मध्यरात्री मैदानात उतरावे लागले. शनिवार, २९ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ च्या सुमारास



डॉ. अशोक उईके यांनी बाभुळगाव येथे आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यानंतर पहाटे ३ वाजेपर्यंत तब्बल ३ तास चाललेल्या जंबो बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर, हे आंदोलन तूर्त स्थगित करण्याचा निर्णय विद्यार्थी प्रतिनिधींनी घेतला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या महत्त्वपूर्ण मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी☞(पान २ वर)

# बसपा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आंदोलन

## फ्रेजरपुरा परिसरातील देशी दारू व गांजा विक्रीला विरोध


**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा भागात सुरू असलेल्या देशी दारू आणि गांजाच्या विक्रीला परिसरातील नागरिक आणि नगरसेवकांचा विरोध आहे. अवैध दारू आणि गांजा विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने सोमवार ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्याचा इशारा आज



शनिवार २९ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत नगरसेवक सचिन वैद्य यांनी दिला आहे. नगरसेवक वैद्य म्हणाले की, फ्रेजरपुरा परिसरात अवैधरित्या सुरू असलेल्या देशी दारू आणि गांजाच्या विक्रीमुळे महिला वर्ग सर्वाधिक त्रस्त आहे. अनेक युवक या व्यसनामुळे अवेळी काळाच्या तोंडी गेले आहेत. काही कुटुंबे उध्वस्त झाली आहेत.☞(पान २ वर)

# सारांश

रविवार, ३० ऑगस्ट २०२६ E-paper - www.janmadhyam.com जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय


## ‘ब्रह्मास्त्र २’मध्ये दीपिका पादुकोण नाही

रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांच्या ‘ब्रह्मास्त्र’च्या दुसऱ्या भागाची चाहत्यांना उत्सुकता लागली आहे. दरम्यान, या चित्रपटात दीपिका पदुकोण महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याच्या चर्चा गेल्या काही काळापासून सुरू होत्या. मात्र, आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. दीपिका पदुकोण ‘ब्रह्मास्त्र २’चा भाग नसल्याचे तिच्या अधिकृत प्रवक्तभ्याने स्पष्ट केले आहे. दीपिकाच्या प्रवक्तभ्याने दिलेल्या निवेदनानुसार, ‘ब्रह्मास्त्र २’मध्ये काम करणार असल्याच्या बातम्यांमध्ये काहीच तथ्य नसल्याचे सांगण्यात आले आहे.



‘ब्रह्मास्त्र पार्ट वन : शिवा’मध्ये रणबीर कपूरने शिवाची, तर आलिया भट्टने ईशाची भूमिका साकारली होती. शिवाला आपल्यात असलेल्या विशेष शक्तींची जाणीव झाल्यानंतर तो ईशासोबत या शक्तींच्या मूळाचा शोध घेण्याच्या प्रवासाला निघतो. ९ सप्टेंबर २०२२ ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात अमिताभ बच्चन, नागार्जुन, मौनी रॉय आणि शाहरुख खान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या. मोठ्या बजेटमध्ये तयार झालेल्या या फँटसी-ॲडव्हेंचर चित्रपटाने जगभरात ४०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केल्याचे सांगितले जाते.

हिंदुस्थान टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार याआधी २०२३ मध्ये रणबीर कपूरने ‘ब्रह्मास्त्र २’च्या लेखनाचे काम सुरू असल्याचे सांगितले होते. अयान मुखर्जीने त्याला सिक्वेलची कथा ऐकवली असून ती पहिल्या भागापेक्षा तब्बल दहापट मोठी संकल्पना असल्याचे रणबीरने सांगितले होते.

‘ब्रह्मास्त्र’च्या पहिल्या भागावर झालेल्या टीकेचाही टीमने गांभीर्याने विचार केल्याचे रणबीरने म्हटले होते.

संवाद, पात्रांची मांडणी तसेच शिवा आणि ईशाच्या केमिस्ट्रीबाबत प्रेक्षकांनी दिलेल्या प्रतिक्रियांमधून, पुढील भाग अधिक चांगला करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्याने स्पष्ट केले होते.

## क्रिती सेननच्या रक्षाबंधन जाहिरातीवरून वाद

बॉलिवूड अभिनेत्री क्रिती सेनन सध्या एका जाहिरातीमुळे चर्चेत आली आहे. एका दागिन्यांच्या ब्रँडच्या रक्षाबंधन विशेष जाहिरातीत क्रिती आपल्या पाळीव कुत्र्याला राखी बांधताना दिसत आहे. मात्र, या जाहिरातीतील काही दृश्यांवर सोशल मीडिया युजर्सनी आक्षेप घेतला असून, त्यावरून ऑनलाइन वाद सुरू झाला आहे. या जाहिरातीत रक्षाबंधनाचा सण आधुनिक पद्धतीने साजरा करताना दाखवण्यात आला आहे.



या जाहिरातीमध्ये क्रितीने घातलेल्या कपड्यांवरून ती सध्या सोशल मीडियावर ट्रोल होऊ लागली आहे. क्रिती सेननने ऑफ-व्हाइट रंगाचा ब्रॅलेट-स्टाइल ब्लाउज, केप आणि ड्रेप्ड स्कर्ट परिधान केला आहे. तिच्या या लूकवरही काही युजर्सनी प्रश्न उपस्थित केले आहेत. रक्षाबंधनासारख्या पारंपरिक सणासाठी हा पोशाख योग्य आहे का, असा सवाल काहींनी केला आहे.

वृत्तानुसार जाहिरातीतील आणखी एका दृश्यावरून सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. क्रितीआपल्या पाळीव कुत्र्याला राखी बांधताना दिसते. जाहिरातीत त्या कुत्र्याला कुटुंबाचा सदस्य म्हणून दाखवण्यात आले आहे. त्यामुळे काहींनी या संकल्पनेचे समर्थन केले आहे. पाळीव प्राणी कुटुंबाचा भाग असतात, त्यामुळे त्यांच्यासोबत सण साजरा करण्यात गैर काय, असा सवाल काही युजर्सनी केला. मात्र, दुसरीकडे काही सोशल मीडिया युजर्सनी या जाहिरातीवर जोरदार टीका केली. त्यांच्या मते, पारंपरिक सणाला अशा प्रकारे सादर करून त्याचे गांभीर्य कमी करण्यात आले आहे. काहींनी जाहिरातीच्या संकल्पनेला भारतीय सणांची खिल्ली उडवणारे असल्याचे म्हटले.

या जाहिरातीवरून सोशल मीडियावर दोन वेगवेगळे गट दिसून येत आहेत. काही युजर्सनी ब्रँडच्या आधुनिक आणि वेगळ्या क्रिएटिव्ह संकल्पनेचे कौतुक केले आहे, तर काहींनी सणाच्या पारंपरिक स्वरूपाशी छेडछाड केल्याचा आरोप केला आहे. एका युजरने क्रितीच्या कपड्यांवर प्रश्न उपस्थित करत, ‘रक्षाबंधनाऐवजी ईद किंवा ख्रिसमसच्या जाहिरातीतही असेच कपडे दाखवले असते का?’ असा सवाल केला. त्यामुळे क्रिती सेननच्या या जाहिरातीवरून सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली आहे.

## यशच्या ‘टॉक्सिक’चा पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

‘टॉक्सिक’ सिनेमा प्रदर्शित होण्याआधी पासूनच सिनेमाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू होती. दाक्षिणात्य सुपरस्टार यश व लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणी या सिनेमात प्रमुख भूमिकेत आहेत. २६ ऑगस्ट २०२६ ला हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. टॉक्सिकला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद पहायला मिळत आहे. सिनेमाने पहिल्या दिवशी किती कमाई केली आहे, हे जाणून घेऊयात.



सिनेमाने पहिल्याच दिवशी नवीन विक्रम केला आहे. यशची प्रमुख भूमिका असलेल्या सिनेमाने पहिल्या दिवशी १०० कोटींचा आकडा पार केला आहे. जगभरात सिनेमाने १४० कोटींहून अधिक कमाई केली आहे. यश चार वर्षांपूर्वी ‘केजीएफ २’ या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. चार वर्षांनंतर यश मोठ्या पडद्यावर परतला असून त्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करण्यास सुरुवात केली आहे. सिनेमाने पहिल्याच दिवशी ‘जवान’ व ‘धुरंधर’सारख्या गाजलेल्या सिनेमांना मागे टाकले आहे. देशात पहिल्याच दिवशी सर्वाधिक कमाई करणारा ‘टॉक्सिक’ हा सिनेमा ठरला आहे.

सॅल्कनिकनुसार, ‘टॉक्सिक’ सिनेमाचे देशभरात २४,५७९ शो होते. सिनेमाने पहिल्याच दिवशी देशभरात १०१.१० कोटींची निव्वळ कमाई केली आहे. याआधी हा विक्रम पाच भारतीय सिनेमांनी केला आहे. ‘आरआरआर’नंतर ‘टॉक्सिक’ हा दुसरा सिनेमा आहे, जो सिक्वेल नाही.


**१०० कोटींहून अधिक कमाई करणारे सिनेमे**

‘पुष्पा २’ सिनेमाने १६४ कोटींची कमाई केली आहे. ‘आरआरआर’ सिनेमाने १३३ कोटींची कमाई केली आहे. ‘बाहुबली २’ने १२१ कोटींची कमाई केली आहे. ‘केजीएफ २’ने ११६ कोटींची कमाई केली आहे. ‘धुरंधर २’ने १०३ कोटींची कमाई केली आहे. ‘टॉक्सिक’ सिनेमाने १०१.१० कोटींची कमाई केली आहे.

हा सिनेमा मूळ कन्नड भाषेत प्रदर्शित झाला आहे. मात्र, ‘टॉक्सिक’ सिनेमा हिंदी भाषेतही प्रदर्शित झाला आहे. हिंदी, कन्नड, तमिळ. तेलुगू, मल्याळम अशा विविध भाषांत हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे. सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वी निर्मात्यांनी सिनेमातील तबाही हे गाणे प्रदर्शित केले होते. या गाण्यातील बोल्ड सीन पाहून अनेकांनी त्यावर टीका केली होती. यशने सिनेमा प्रदर्शित होण्याआधी एक मुलाखत दिली होती. त्यावेळी या ट्रोलिंगवर उत्तर दिले होते. आता पहिल्याच दिवशी सिनेमाला उत्तम प्रतिसाद मिळाला असला तरीही आगामी काळात सिनेमा किती कमाई करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## ...‘म्हणून लग्नानंतर २७ वर्षांनीही आमचं प्रेम ताजच!’

बॉलिवूडची सुप्रसिद्ध ’धकधक गर्ल’ माधुरी दीक्षित आणि डॉक्टर श्रीराम नेने यांची जोडी म्हणजे चाहत्यांसाठी अगदी परफेक्ट कापलचं जणू... माधुरी आणि श्रीराम नेने यांची जोडी आजही चाहत्यांच्या आवडत्या जोड्यांपैकी एक लोकप्रिय जोडी आहेच...



लग्नाला २७ वर्षे उलटून गेल्यानंतरही या जोडीमधला रोमान्स आणि गोडवा तसूभरही कमी झालेला नाही. माधुरी दीक्षित आणि डॉ. श्रीराम नेने यांच्या संसाराला २७ वर्षे झाली तरी त्यांच्यातील प्रेम आजही तरुणाईला लाजवेल असेच आहे!लग्नानंतरही दोघांनी आपापल्या करिअरसोबत संसार आणि नात्याला तितकंच महत्त्व दिलं. काळ बदलला, जबाबदाऱ्या वाढल्या, आयुष्यात अनेक चढ-उतार आले, मात्र एकमेकांवरील प्रेम आणि नात्यातील मैत्री आजही कायम आहे. त्यामुळेच त्यांचं नातं आजच्या अनेक जोडप्यांसाठी प्रेरणादायी ठरतं. डॉ. श्रीराम नेने यांच्यासोब तच्या २७ वर्षांच्या यशस्वी संसारानंतरही त्यांच्यातील प्रेम अगदी नव्या जोडप्यासाखरच टवटवीत आहे.

यावर माधुरीचे म्हणणे असते की, कोणत्याही नात्यात प्रेम असणे जितके महत्त्वाचे आहे, तितक्याच काही साध्यासोप्या गोष्टी पाळणे देखील गरजेचे असते.

## महाकालीचा टीझर रिलीज

एकेकाळी चॉकलेट हिरो, त्यानंतर एक इंटेन्स विलन अशा एकाहून एक दमदार भूमिका केलेला अभिनेता अक्षय खन्ना त्याच्या आगामी चित्रपटातून शुक्राचार्यांच्या भूमिकेत दिसणार आहे. महाकालीच्या निर्मात्यांनी आज अक्षय खन्नाचा ऑफिशियली लूक रिव्हिल केला असून त्यासाठी तीन मिनिटांचा एक व्हिडीओ त्यांनी शेअर केला आहे. त्यातला अक्षय खन्नाचा अभिनय पाहून अंगावर काटा येतो.




महाकालीच्या निर्मात्यांनी २४ ऑगस्टला एक तीन मिनिटांचा व्हिडीओ रिलीज केला आहे. या व्हिडीओत त्यांनी अक्षय खन्नाचा शुक्रचार्यांच्या भूमिकेतील लूक समोर आणला. लांब पांढरे केस व दाढी, एक पांढरा पडलेला डोळा, कपाळाला भस्म असा लूक पाहून अक्षय खन्नाचे चाहते देखील आश्चर्यचकीत झाले आहेत. त्यात जेव्हा अक्षय खन्ना शेवटी एक डायलॉग म्हणतो तेव्हा अक्षरश: अंगावर काटा येतो.

व्हिडीओच्या शेवटी निर्मात्यांनी चित्रपटातील कालीमातेचा लूक देखील समोर आणला आहे. अभिनेत्री श्रीया रेड्डी देखील कालीमातेच्या भूमिकेत अगदी जबरदस्त दिसली आहे. ‘महाकाली’च्या या व्हिडीओवर नेटर्क ?यांनी यावर लाईक्स – कमेंट्सचा वर्षाव केला आहे. या चित्रपटात अक्षय खन्नासह रोहित सराफ, श्रिया रेड्डी, भूमी शेट्टी, राकेश बेदी, मुरली शर्मा, नासर हे दिग्गज कलाकार झळकणार आहेत.

## इमरान हाश्मीसोबत मुख्य भूमिकेत दिसणार अभिनेत्री

अभिनेता इमरान हाश्मीच्या ‘आवारापन २’ या चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाच्या यशानंतर ‘गनमास्टर जी९’ या चित्रपटात दिसणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला आहे. विशेष म्हणजे यात त्याच्यासोबत अभिनेत्री जिनिलीया देशमुख मुख्य भूमिकेत झळकणार आहे.



टीझरमध्ये इमरान आणि जिनिलीया दोघांचेही काही रोमँटिक सीन्स दिसत आहेत. अनेक वर्षांनंतर जिनिलीया पुन्हा एकदा मॉडर्न लुकमध्ये पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट ॲक्शन-ड्रामा थ्रिलर चित्रपट असणार आहे. यामध्ये इमरान हाश्मी एका दूधवाल्याच्या भूमिकेत दिसत असून तो महादेवाचा भक्त आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आदित्य दत्त यांनी केले आहे.

जवळपास दोन दशकांनंतर इमरान हाश्मी, हिमेश रेशमिया आणि आदित्य दत्त हे त्रिकुट ‘गनमास्टर जी९’च्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र आले आहे. याआधी या तिघांनी २००५ मध्ये एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाचे संगीत हिमेश रेशमियाने तयार केले आहे. हिमेश रेशमिया यांच्या गाण्यांची तरुणांमध्ये प्रचंड क्रेझ होती. ‘आशिक बनाया आपने’ आणि ‘अक्सर’सारख्या चित्रपटांसाठी दोघांनी एकत्र काम केलं. आता ही सुपरहिट जोडी ‘गन मास्टर जी ९’ च्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे. ‘गनमास्टर जी९’ हा चित्रपट २७ नोव्हेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यात इमरान हाश्मी, जिनिलीया डिसुझा यांच्यासह अपारशक्ती खुराना आणि नवोदित अभिनेता अभिषेक सिंह महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

## महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम शिवाली परबचा पैठणीतील मराठमोळा अंदाज

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ या लोकप्रिय विनोदी कार्यक्रमातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री शिवाली परब सध्या तिच्या नव्या फोटोशूटमुळे चर्चेत आली आहे. आपल्या विनोदी अभिनयाने प्रेक्षकांना हसवणारी शिवाली सोशल मीडियावरही चांगलीच सक्रिय असते. ती नेहमीच तिचे नवनवीन फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांसोबत शेअर करत असते. नुकतेच तिने पारंपरिक लूकमधील काही खास पफोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत.

या फोटोशूटमध्ये शिवालीने गुलाबी आणि सोनेरी रंगाची सुंदर पैठणी साडी नेसली आहे. रेशमी कापडाची ही साडी तिच्या लूकला पारंपरिक आणि आकर्षक अंदाज देताना दिसत आहे. साडीच्या पदरावर मोर आणि पारंपरिक नक्षीकाम करण्यात आले आहे. त्यामुळे पैठणीचा पारंपरिक बाज आणखी खुलून दिसत आहे.

शिवालीने या साडीला साजेशी पारंपरिक दागिन्यांची निवड केली आहे. गळ्यात मोती आणि खड्यांनी सजवलेला डिझायनर चोकर तिने घातला आहे. कानात मॅचिंग झुमके आणि नाकात नाजूक नथ घालून तिने आपला मराठमोळा लूक पूर्ण केला आहे. हातातील पारंपरिक पाटल्या आणि मोठी मोत्यांची अंगठीही लक्ष वेधून घेत आहे. साडी आणि दागिन्यांचा रंगसंगतीचा मेळ साधत शिवालीने हा लूक अतिशय खास पद्धतीने कॅरी केला आहे.तिच्या हेअरस्टाइलनेही चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. शिवालीने लांबसडक केसांची सुरेख वेणी बांधली आहे. या वेणीवर लाल रंगाचे गुलाब माळण्यात आले आहेत. त्यासोबत केसांमध्ये पारंपरिक सोन्याचे दागिनेही घातले आहेत. त्यामुळे तिच्या संपूर्ण लूकला खास मराठमोळा टच मिळाला आहे. फोटोशूटसाठी शिवालीने साधी आणि प्लेन बॅकग्राउंडची निवड केली आहे. या पार्श्वभूमीवर तिचा पारंपरिक लूक अधिक उठून दिसत आहे. वेगवेगळ्या पोझ देत तिने हे फोटो कॅमेऱ्यात कैद केले आहेत.शिवालीच्या या फोटोंना सोशल मीडियावर चाहत्यांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेकांनी कमेंट करत तिच्या लूकचे कौतुक केले आहे. काही चाहत्यांनी तिला ‘ॐीसब ुगेत’ आणि ‘माझी सुंदरी’ अशा कमेंट्स केल्या आहेत. तिच्या पैठणीतील या रूपाने चाहत्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे.

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’मधील तिच्या विनोदी भूमिकांमुळे शिवालीला मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या अभिनयासोबतच तिच्या सोशल मीडिया पोस्ट्सचीही चाहत्यांमध्ये चर्चा होत असते. यावेळी मात्र तिच्या पारंपरिक लूकने लक्ष वेधून घेतले आहे.गुलाबी पैठणी, नथ, पाटल्या, मोत्यांचे दागिने आणि केसांमधील लाल गुलाब असा शिवालीचा हा मराठमोळा अंदाज सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.



# ....सदन शिवाचे कोसळले!

**आर्थिक स्थितीस गती देण्याचा प्रयत्न म्हणून पर्यटन क्षेत्राकडे बोट दाखवले जाते. पण पर्यावरणाचे पोट फाडून बाहेर येणारे पर्यटन अंतिमत: विनाशकारीच ठरते.नेपाळमध्ये जे घडले ते महाभयानक आहे. हॉलीवूडच्या कोणा विज्ञानपटात जगबुडी दर्शवण्यासाठी जे काही दाखवले जाते ते प्रत्यक्षात आल्यावर काय होईल ते नेपाळमधील निसर्गप्रकोप पाहिल्यावर जाणवते.**

आर्थिक स्थितीस गती देण्याचा प्रयत्न म्हणून पर्यटन क्षेत्राकडे बोट दाखवले जाते. पण पर्यावरणाचे पोट फाडून बाहेर येणारे पर्यटन अंतिमत: विनाशकारीच ठरते.नेपाळमध्ये जे घडले ते महाभयानक आहे. हॉलीवूडच्या कोणा विज्ञानपटात जगबुडी दर्शवण्यासाठी जे काही दाखवले जाते ते प्रत्यक्षात आल्यावर काय होईल ते नेपाळमधील निसर्गप्रकोप पाहिल्यावर जाणवते. मजबूत, स्थिर, दणकट, आश्वासक इत्यादी कसे काही नसते याची सर्व मानवी अस्तित्वालाच क्षणभंगुर ठरवणारी जाणीव नेपाळमधील घटना करून देतात. सिमेंट काँक्रीटच्या इमारती, पिढ्यानपिढ्यांचा भार सहन केलेले पोलादी पूल, मोठमोठी अवजड वाहनेष्ठ काही म्हणून टिकले नाही. कागदाचा एखादा चिटोरा वर्ा?याच्या एखाद्या झुळुकीने हवेत उडवून द्यावा त्याप्रमाणे संपूर्ण मानवी अस्तित्वच या घटनेने अनिश्चिततेच्या गर्तेत भिरकावले गेले. अशी वेळ कोणावरही येऊ नये. ती आल्यावर आणि निसर्गाचा प्रकोप सहन करावा लागल्यामुळे जे गेले ते सुटले म्हणायचे. ज्यांना कोणास निसर्गाचा हा बेफाम नंगा विध्वंस स्वत:च्या डोळ्याने पहावा लागला त्या सर्वांस नंतर त्याचे स्मरणदेखील मरणयातना देणारे असेल. त्या विनाशाची जी काही दृश्ये समोर येत आहेत, ती दूरचित्रवाणीवरून पाहतानाही काहींची दातखीळ बसेल इतकी ती भयानक आहेत. त्या देशातील हा भौतिक विनाश आज ना उद्या भरून काढला जाईलही. पण मानव–निसर्ग या नात्यातील विश्वासार्हतेस यामुळे बसलेला धक्का भरून निघणे संबंधित व्यक्तींच्या हयातीत शक्य होणार नाही.



निसर्गाचा हा विध्वंसावतार सहन करण्याची वेळ आली, असा नेपाळ हा एकटा देश नाही. अलीकडे आपल्या उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आदी राज्यांनीही असेच काही अनुभवले. जोशीमठ परिसरात भूकंपाशिवाय जमिनींस तडे जाणे, इतर ठिकाणी भूकंप, ढगफुटी, भूस्खलन, डोंगराचे कडेच्या कडे सुटून खाली येणे, हिमनद्या आटणे आणि वितळणे या घटना घडल्या आहेत. हे केवळ हिमालयाच्या परिसरातच झाले असेही नाही. दक्षिणेस केरळसारख्या राज्यानेही निसर्गाचा हा प्रकोप सहन केला. या राज्यात जे काही झाले आणि तिकडे नेपाळ, उत्तराखंड, हिमाचल आदी देशांत/राज्यांत जे घडते आहे, त्यात विनाशाच्या जोडीने एक मुद्दा समान आहे. तो म्हणजे डोंगराचा, पर्वताचा प्रकोप. भारताच्या दक्षिण भागात तो सहन करावा लागतो कारण पश्चिम घाटाकडे होत असलेले/केले जात असलेले अक्षम्य दुर्लक्ष. किंबहुना हेळसांड. आदरणीय पर्यावरण अभ्यासक माधवराव गाडगीळ यांनी आपल्या अहवालातून याबाबतचे गांभीर्य आपल्या नजरेस आणून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. पण आपण त्याकडे दुर्लक्षच केले. हिमालयाबाबत असेच इशारे अनेकांनी आतापर्यंत दिले आहेत. आपण त्याकडेही दुर्लक्षच केले आहे.

देवभूमी म्हणत ज्यास कुरवाळले जाते, त्या उत्तराखंडादी राज्यात जवळपास ३०–३५ बोगदे पर्वतराजीच्या पोटात खणले जात आहेत. खरे तर हिमालयासंदर्भात १९७६ साली या संदर्भात पहिला व्यापक पाहणी–आधारित अहवाल दिला गेला होता आणि या परिसराची संवेदनशीलता जगासमोर आणली गेली होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिमालयात जे भूकंप झाले, जे भूस्खलन झाले ते स्थिर होऊन त्याचे पठारात रूपांतर झाले आणि पुढे ती वस्तीस्थाने बनली. त्यातील एक म्हणजे जोशीमठ. तेथे तीन वर्षांपूर्वी जे झाले ते भविष्यात काय होऊ शकते याची चुणूक ठरले. अशी चुणूक नेपाळास मिळाली होती किंवा काय ते ठाऊक नाही. पण नेपाळ काय वा आपण काय, पर्यावरण नुकसान सातत्याबाबत एकमेकांचे शेजारी शोभतो. अशा परिसरातील आर्थिक स्थितीस गती देण्याचा प्रयत्न म्हणून पर्यटन क्षेत्राकडे बोट दाखवले जाते. ते खरे. पण पर्यावरणाचे पोट फाडून बाहेर येणारे पर्यटन अंतिमत: विनाशकारीच ठरते. रोजगार मिळावा, टिकावा म्हणून वाटेल तशी, वाटेल त्या दर्जाची हॉटेले काढण्यास वाटेल तशा परवानग्या देणे, चार पैसे अधिक मिळवण्याच्या नादात स्थानिकांनी कसलाही मागचा–पुढचा विचार न करता या वाहत्या गंगेत हात धुऊन घेणे आणि अंतिमत: निसर्गाचा हा असा फटका खाणे हे आशिया खंडात सगळीकडे सारखेच. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड काय नि नेपाळ काय!

आताही ज्यामुळे ताजा विध्वंस घडून आला त्यामागील कारण पाहा. नेपाळमधील लांगटांग लिरुंग शिखराच्या परिसरातील हिमनदीचा सुमारे दोन हजार फूट लांब–रुंद असा अगडबंब बर्फाचा तुकडा नदीपासून वेगळा होत चार हजार फूट खाली कोसळला. बर्फ आणि खडक कोसळल्यामुळे निर्माण झालेली ऊर्जा इतकी प्रचंड होती की, त्यामुळे ५.२ तीव्रतेच्या भूकंपासारखे धक्के जाणवले. या अजस्राने जमिनीवर लोळण घेताना आसपास जे होते ते आपल्यासमवेत ओढून घेतले. त्यातून पाणी उचंबळले आणि अगदी २५० फुटाची महाप्रचंड, महाकाय लाट तयार झाली. ती त्या तलावात मावेना. परिणामी गुरुत्वाकर्षणास शरणागत होत ही प्रचंड जलभिंत बांध सोडून धावली आणि वाटेत जे उभे होते ते आडवे करत गेली.

# अंतराळातील संगणकाची नवी ताकद

अंतराळ मोहिमांमध्ये संगणकांची भूमिका दिवसेंदिवस महत्त्वाची होत आहे. यासाठी अमेरिकेची अंतराळ संस्था AEA अधिक शक्तिशाली आणि टिकाऊ संगणकीय यंत्रणा विकसित करत आहे. हाय परफॉर्मन्स स्पेसफ्लाइट कम्प्युटिंग या प्रकल्पातून विकसित होत असलेली नवी संगणक चिप याच दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.



अंतराळातील संगणकांसमोर पृथ्वीवरील संगणकांपेक्षा अनेक वेगळी आव्हाने असतात. त्यामुळे अंतराळात वापरल्या जाणा?या संगणकांमध्ये केवळ वेगाला नव्हे, तर विश्वासार्हता आणि टिकाऊपणालाही मोठे महत्त्व असते. चिप या दोन्ही गरजा लक्षात घेऊन तयार केली जात आहे. ‘?अएअ च्या जेट प्रॉपल्शन प्रयोगशाळेत या चिपच्या विविध चाचण्या सुरू आहेत. प्रकल्पाचे व्यवस्थापक जिम बटलर यांच्या नेतृत्वाखाली किरणोत्सर्ग, तापमान आणि धक्के यांचा सामना करण्याची तिची क्षमता तपासली जात आहे.

या चिपचा सर्वात मोठा फायदा म्हणजे, अंतराळयान अधिक स्वायत्त होण्याची शक्यता. पृथ्वीपासून लाखो किलोमीटर दूर असलेल्या यानाला प्रत्येक छोट्या निर्णयासाठी पृथ्वीवरील नियंत्रण केंद्राकडून आदेशाची वाट पाहणे शक्य नसते. यानाला स्वतभोवतीची परिस्थिती समजून घेऊन काही निर्णय तातडीने घ्यावे लागतात. नव्या चिपच्या मदतीने सेन्सरमधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण, प्रतिमांची प्रक्रिया, वस्तू ओळखणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कामे थेट अंतराळात करता येऊ शकतील.

प्रसाद ताम्हनकर

याचा फायदा चंद्र आणि मंगळावरील भविष्यातील मोहिमांना मोठय़ा प्रमाणात होऊ शकतो. उदाहरणार्थ, एखादा रोव्हर मंगळाच्या पृष्ठभागावर फिरत असताना त्याच्या मार्गात अचानक अडथळा आला तर त्याची माहिती पृथ्वीवर पाठवून उत्तराची प्रतीक्षा करण्याऐवजी रोव्हरला स्वत निर्णय घेता येणे अधिक उपयुक्त ठरेल. त्याचप्रमाणे एखाद्या ग्रहावरून मिळणाया प्रचंड प्रमाणातील छायाचित्रे आणि वैज्ञानिक माहितीपैकी महत्त्वाचा भाग यान स्वत निवडू शकेल.

विशेष म्हणजे, ही केवळ वेगवान चिप नाही. एका छोटय़ा चिपमध्ये संगणकासाठी आवश्यक असलेले अनेक घटक एकत्र आणण्यात आले आहेत. त्यामुळे कमी जागेत अधिक संगणकीय क्षमता मिळू शकते. अंतराळयानात जागा आणि ऊर्जा दोन्ही मौल्यवान असल्याने हा फायदा महत्त्वाचा आहे.

चंद्रावर कायमस्वरूपी मानवी तळ उभारण्यापासून मंगळाच्या अधिक स्वायत्त मोहिमांपर्यंत पुढील अंतराळ संशोधनात संगणकीय क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

त्यामुळे अंतराळातील पुढची मोठी झेप कदाचित एखाद्या प्रचंड रॉकेटमध्ये नव्हे, तर हाताच्या तळव्यावर मावणा–या या छोटय़ाशा चिपमध्ये दडलेली असू शकते.

या तंत्रज्ञानामुळे भविष्यातील अंतराळ मोहिमांमध्ये पृथ्वीवरील नियंत्रण केंद्रांवरील अवलंबित्व कमी होईल. अंतराळयान अधिक वेगाने परिस्थिती समजून घेऊन निर्णय घेऊ शकेल आणि वैज्ञानिक संशोधनाची गतीही वाढेल.

# मंगळागौरीचा खेळ

आपल्या संस्कृतीशी जोडलेल्या काही आठवणी ज्या दूरदेशी आल्या नंतरही पुन्हा जगाव्याशा वाटतात. सख्यांसोबत धरलेला फुगडीचा ताल, मैत्रिणींसोबत रंगलेला झिम्मा, मंगळागौरीच्या निमित्ताने भारलेले वातावरण, साजरा साजश्रृंगार, आरास हे सारं कॅलिफोनिर्याच्या प्रांगणात अनुभवता येणार आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीतला हा जिवंतपणा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अमेरिकेतील प्रिफ्मॉन्ट येथे ‘गौराई खेळा’ हा मराठमोळा सांस्कृतिक सोहळा आज साकार होत आहे.



महाराष्ट्रापासून दूर राहूनही आपली संस्कृती, लोकपरंपरा अधिक लोकाभिमुख, सर्वसमावेशक व्हावी या उद्देशाने सादर होत असलेली ‘गौराई खेळा’ ही संकल्पना म्हणजे सहभागाने संस्कृती अनुभवण्याचे एक नवीन उदाहरण आहे. अमेरिकेच्या भूमीत मराठमोळा ‘गौराई खेळा’ हा सांस्कृतिक उपक्रम स्मिता कन्होडे, शीमा खानोलकर, वृंदा घोसाळकर, सुप्रिया सुकी, वैशाली शाह, वृषाली जोशी आणि सोनल पात्रे यांच्या संकल्पनेतून आकारास येत असून ही स्त्री शक्तीच या कार्यक्रमाची संपूर्ण धुरा सांभाळत आहे. नोकरी, व्यवसाय, घर आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळत या महिला या उपक्रमासाठी आपला वेळ, कौशल्य आणि कल्पना देत आहेत.

‘गौराई खेळा’मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीला खेळता येईल, नाचता येईल, परंपरेमध्ये सहभागी होता येईल आणि त्या आनंदाचा एक भाग बनता येईल.

आपली समृद्ध लोकपरंपरा जगभरातील लोकांनी अनुभव्यात अशा आहेत. तरूण पिढीला आपली संस्कृती अनुभवता यावी, त्यांनी झिम्मा खेळावा, फुगडी घालावी, मराठी लोकसंगीत ऐकावे, महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीची चव घ्यावी आणि या परंपरांची भावना समजून घ्यावी, यासाठी हा सोहळा आहे.

आज अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीमध्ये ‘प्रफीमॉन्ट वेलकम्स गौराई खेळा’ या सांस्कृतिक उत्सवाचा शुभारंभ होणार आहे. या जागतिक शुभारंभाला आणखी एक विशेष महत्त्व लाभले आहे. प्रफीमाँट शहराचे महापौर जयशालवान यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन होणार असून अत्रस्र ण्दल्हूबब ण्दस्स्र्ेग्दही सोनिया सालवान यांचीही विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच आपली मराठमोळी अभिनेत्री अश्विनी भावे या उपस्थित राहून त्यांच्या आठवणी, संस्कार, परंपरा आणि आपल्या मातीशी असलेले नाते उलगडणार आहेत. ‘प्रफीमॉन्ट वेलकम्स गौराई खेळा’ या विशेष कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या मातीतील या सांस्कृतिक संकल्पनेचे सिलिकॉन व्हॅलीतील विविध समुदायांमध्ये स्वागत होणार आहे. जगाच्या विस्तारलेल्या पटलावर आपली संस्कृती अनुभवताना नव्या पिढीला आपल्या इतिहासाशी आणि सांस्कृतिक स्मृतींशी प्रत्यक्ष जोडण्याचा प्रयत्नही या सोहळ्याद्वारे केला जात आहे. पेशवेकालीन इतिहासाचा साक्षीदार ठरलेल्या व पुण्याच्या ऐतिहासिक ओळखीचा अविभाज्य भाग असलेल्या शनिवारवाडय़ाची बारा फूट उंच भव्य प्रतिकृती या सोहळ्यानिमित्त उभारली आहे. मंगळागौरीची पारंपरिक पूजा आणि कथा, झिम्मा–फुगडीसह पारंपरिक खेळ, लोकनृत्य, लोकसंगीत, साडी–पैठणीचा कार्यक्रम, महाराष्ट्रीय खाद्य संस्कृती अशा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे विविध पैलूंचा आनंद या सोहळ्यानिमित्त अनुभवता येईल.

# वादळी व्यक्तिमत्त्वाचा जीवन संघर्ष!

महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाचे धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्रात मे २०२६ पासून सुरू केलेल्या आरोग्यघातक पदार्थांवरील धाडसत्रामुळे घरोघरी ते चर्चेचा विषय ठरले. त्यांच्या ‘सेफ फूड, सेफ ड्रग्ज, सेफ महाराष्ट्र’ या विधायक मोहिमेमुळे सामान्य जनतेला त्यांच्या रूपाने देवदूतच भेटल्याची जाणीव झाली. त्यांच्या धाडसी धाडसत्रामुळे जनतेच्या आरोग्याशी खेळर्णा?या समाजविघातक शक्तींना जबरदस्त धक्का आणि दहशत बसली. अनेकांना तुरुंगाची वा खावी लागली तर कित्येकांवर खटले दाखल झाले. अनेक गैरव्यवहार बंद झाले. कुणाचीही पर्वा न करता किंवा कुणाच्याही दबावाखाली न येता त्यांची कामगिरी जोमात सुरू राहिली. त्यापूर्वी सतत बदल्यांना सामोरा जाणारी प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या प्रशासकीय कारकीर्दीचा मागोवा घेतला तर नोकरीत रुजू होण्यापूर्वीच त्यांची तीनदा बदली झाली हे देशाच्या सनदी सेवेतील एकमेव उदाहरण असावे. ती त्यांच्या भविष्याची जणू नांदीच होती.

तुकाराम मुंढे यांच्या नावावर २० वर्षांत २५ बदल्यांचा दुर्मिळ पाराक्रम नोंदवला गेला तो त्यांनी कर्तव्यनिष्ठेला प्राधान्य दिले म्हणून. त्यांच्या स्वभावाचाच तो भाग होता. सनदी अधिकारी झाल्यावर प्रशिक्षण काळात भर सभागृहात मंत्री आणि आमदारांना त्यांनी अडचणीत आणणारे विचारलेले प्रश्न, डान्सबारवर टाकलेली धाड, लाच खार्णा?या सरकारी कर्मचार्ा?यांची घेतलेली झाडाझडती यातूनच त्यांची पुढची वाटचाल कशी असेल याची झलक सर्वांनाच पाहायला मिळाली होती. अशा या वादळी व्यक्तिमहत्त्वाची जडणघडण कशी झाली याविषयी जनतेमध्ये औत्सुक्य असले तर नवल नाही. त्याचीच पूर्ती शफी पठाण या त्यांच्या निकटच्या सकाऱ्याने त्यांच्यावरील ‘तुकाराम’ हे चरित्रवजा पुस्तक लिहून केलाी आहे. ते वाचले की, तुकाराम मुंढे या कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याच्या वारंवार बदल्या का होतात, त्यामागे सरकारमधील काही मंत्र्यांचे, काही आमदारांचे, काही सरकारी आश्रयदात्यांचे हात कसे असतात याचाही उलगडा होईल. या चरित्रात्मक पुस्तकाचा खरे तर हा पहिला भाग असावा तोही त्यांच्या बालपणापासून प्रारंभीच्या प्रशासकीय कारकीर्दीचा. तिथून त्यांच्या जीवन संघर्षाला सुरुवात झाली आणि आज या जीवन संघर्षाचे पुढचे टप्पे आपण अनुभवत आहोत. त्यांच्या चरित्राचे आणखी कितीतरी खंड निघू शकतील, इतकी नाट्यमयता आणि घटनांचे वैविध्य त्यात आहे.

आतापर्यंत तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त दूध, तेल, मसाले, मिठाई, बनावट व कालबाह्य औषधे, नकली सौंदर्य प्रसाधने, फुटपाथवरील खाद्यपदार्थ पी, औषधांवरील चुकीचे लेबल, एक्सपायरी डेट बदलण्याचे गुन्हे, मुलांसाठी घातक असलेले जंक्फ्फूड याविरुद्ध धडक कारवाई केली, मुंबईतील नामांकित खासगी आणि सरकारी उपाहारगृहातील अस्वच्छताही उजेडात आणली. काहींना ही स्टंटबाजी वाटली, पण असे आरोप करणा–यांनी त्यांच्यावरील ‘तुकाराम’ हे चरित्रात्मक पुस्तक वाचले तर त्यांच्या कर्तव्यकठोर स्वभावाचाच अविभाज्य भाग असल्याचे लक्षात येईल.

मराठवाडय़ातील बीड तालुक्यात ताडसोन्ना या गावात तुकाराम मुंढे यांचा १९७५ या वर्षी नवरात्रात जन्म झाला. अगदी रांगत असतानाच्या वयात हा लहानगा तुकाराम अंगणातल्या प्रशस्त माडीच्या काठावरून दगडी चौकावर १२ फूट उंचीवरून पडला आणि बेशुद्ध झाला. दैवयोगाने तो वाचला. जणू नियतीलाच त्याच्या हातून भविष्यात काही कल्पनेपलीकडचे दिव्य आणि सकारात्मक घडवायचे होते. घरात अठराविश्वे दारिद्रय़. त्यामुळे ध्येयप्राप्तीच्या मार्गात येणारी संकटे, वेगवेगळय़ा कारणांनी समाजाकडून होणारी उपेक्षा आणि त्यामुळे मनात चाललेले वैचारिक द्वंद्व यावर तुकाराम मुंढे यांनी प्रदीर्घ परिश्रमाने कशी मात केली याचे वास्तववादी चित्रण या पुस्तकात पाहायला मिळेल.

महाराष्ट्रातील मराठी जनतेमध्ये आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण करर्णा?या या चरित्र नायकाच्या केवळ यशाचे गोडवे या पुस्तकात गायलेले नाहीत, तर त्या यशासाठी कराव्या लागलेल्या पराकोटीच्या कष्टाचे, त्यागाचे, एकाकी धडपडीचे आणि विवंचनेचे तटस्थ विवेचन या पुस्तकात लेखकाने केले आहे. आजच्या प्रचंड आत्मकेंद्री आणि मोहात पडून विकल्या जार्णा?या सामाजिक काळात सनदी अधिकारी असलेली एक व्यक्ती स्वार्थाच्या संधी झुगारून व्यापक समाजहिताच्या दृष्टीने समकालीन इतिहासाच्या पानावर आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटवते हे वाचून नव्या पिढीला आत्मपरीक्षणाची दृष्टी लाभावी हा या लिखाणामागचा लेखकाचा हेतू नक्कीच साध्य झाला आहे, असे म्हणता येईल.

त्यांचे मोठे भाऊ अशोक रीभाऊ मुंढे जे अप्पर जिल्हाधिकारी म्हणून निवृत्त झाले, तेच तुकाराम मुंढे यांचे आदर्श होते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर तो केवळ पदवी मिळवण्यासाठी शिकला नाही, तर त्याने शिक्षणाकडे स्वत:चे आणि समाजाचे नशीब बदलण्याचे शस्त्र म्हणून पाहिले. म्हणूनच तो आयएएस अधिकारी होऊ शकला.एक सच्चा सनदी अधिकारी फाईल्समधल्या पानांच्या पल्ल्याड जाऊन माणसांची वेदना वाचतो आणि ती नाहिशी करण्याच्या प्रयत्नात आपले नुकसान करून घेतो असे उदाहरहण दुर्मिळ असल्याचे त्याचे वडीलबंधू म्हणतात ते खरंच आहे.

# असेही रक्षाबंधन करू या!

आपल्या हिंदू धर्मातील वर्षभरात येणारे सण आपल्या पूर्वजांनी अतिशय विचार करून योजले असावेत. विशेष म्हणजे आपल्या संस्कृतीत वर्षभर सण, उत्सवांची रेल असते; त्यामुळे आपल्याला ते सण कोणाचे आहेत हे लक्षात राहावेत म्हणून की काय, आपल्या पूर्वजांनी त्यांची नावेच अशी दिली आहेत की, त्या नावातच कशाचा सण आहे, हे सहज लक्षात येते. उदाहरणच द्यायचं झालं तर गुढीपाडव्याला गुढी उभारायची, वटपौर्णिमेला वडाची पूजा, नागपंचमीला नागाची पूजा, तर रंगपंचमीला रंगांची उधळण. या प्रकारे सणांच्या नावांतच त्यांचे महत्त्व आहे.

‘रक्षाबंधन’ या नावातच बंधन आहे रक्षा करण्याचं, प्रेमाने सुरक्षित ठेवण्याचं बंधन. पूर्वी भाऊ बहिणीला हे वचन द्यायचा. आताही ती परंपरा सुरूच आहे. द्रौपदीने श्रीकृष्णाच्या बोटाला चिंधी बांधली आणि त्या बंधनाची परतफेड श्रीकृष्णाने द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळी तिला सुरक्षित ठेवून केली.

बहिणीने भावाला राखी बांधण्याचा हा संस्कार आईवडील करतात. यातून भावाने बहिणीची रक्षा करावी हेच जणू सांगितले जाते. नकळत आपल्या मुलीची सुरक्षा आपल्या मुलाकडे देण्याचा हा संस्पृतीचा ठेवा आहे आणि तो योग्यही आहे. पण काळ बदलला आहे. मला वाटतं पूर्वी महिला, मुली या शांत, संयमी आणि काहीशा घाबरट असल्यामुळे त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी भावांकडे दिली जात होती. अर्थात आताही ती आहेच, पण मला वाटतं, रक्षा करण्याचं बंधन हे केवळ पुरुषांकडे किंवा भावांकडेच नसावं. आजच्या काळात प्रत्येक महिलेला सुरक्षित ठेवण्याचे बंधन आपल्या सगळ्यांचेच आहे. कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणी प्रत्येक महिला सुरक्षित असावी. तिच्या रक्षेचे बंधन ही सर्वांची जबाबदारी आहे असं मला वाटतं. हे रक्षाबंधन केवळ महिलांसाठीच नसावे. समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीची रक्षा करणे आपल्या सगळ्यांवर बंधनकारक असावे.



आपल्या परिसरातील वृद्ध, अनाथ मुले यांचेदेखील आपण शारीरिक रक्षण त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन करू शकतो.

सीमा श्रीराम शास्त्री मोडक

वृद्धाश्रमातील, अनाथाश्रमातील मुलामुलींना किंवा वृद्धांना मानसिक, भावनिक आधार देऊन किंवा शक्य झाल्यास आर्थिक आधार आपण देऊ शकतो. त्यांना कोणी नाही या भावनेने दुखावलेले असतात. अशा वेळी आपण त्यांना भावनिक रक्षाबंधन करावे. त्यांच्यासाठी महिन्यात एक किंवा दोन तास आपण वेळ देऊ शकतो.

रक्षाबंधन हे केवळ एक दिवसाचे किंवा राखी बांधण्यापुरते नसावे, तर ते एक कायम स्वरूपाचे आश्वासन असावे.

आपल्या राष्ट्रातील सगळ्यांची रक्षा करण्याचे व्रत आपल्या सैनिक, पोलीस, डॉक्टर्स, बस/ रेल्वे/ विमान चालक अशा अनेकांनी घेतलेले आहे.

सर्व भविष्य घडवर्णा?या पिढ्यांना विधायक शिक्षण, संस्कार देणा–या सर्व गुरूंनी अनेक पिढ्यांचे ‘रक्षाबंधन’ व्रत घेतलेले आहे.

या सर्वांचा आदर्श आपणही घेऊ या. प्रत्येक गरजूंचे रक्षण करण्याचा प्रयत्न करू या. केवळ व्यक्तीच नाही, तर आपल्याला भरभरून देणा–या, पण त्या मोबदल्यात कशाचीही अपेक्षा न करणा–या वृक्ष, डोंगर, नद्या, पर्वत इत्यादी निसर्गाच्या घटकांचे रक्षाबंधन करू या. त्याचप्रमाणे आपल्या ऐतिहासिक भूमी, वास्तू, शिल्प इत्यादी सगळ्यांचेच रक्षाबंधन स्वतःवर घालू या. सर्वात महत्त्वाचं आपल्या संस्कृतीचं, सांस्कृतिक मूल्यांचं जतन करून तो वारसा, तो आदर्श आपण पुढच्या अनेक पिढ्यांपर्यंत संक्रमित करण्याचं रक्षाबंधन स्वतःवर घालू या. या वर्षापासून असेही रक्षाबंधन साजरे करू या.

# रोज रात्री दुधात भिजवा फक्त 'हा' एक पदार्थ



अंजीर हा ड्रायफ्रुट्सचा प्रकार आहे. अंजीर अनेकदा कोरडे किंवा फळाच्या स्वरूपात खातात. अंजीर हे एक फळ आहे जे वाळवले जाते आणि कोरडे फळ बनवले जाते. अंजीरमध्ये फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. या पोष घटकांमुळे त्याला पोषक तत्वांचे पॉवरहाऊस म्हटले जाते. आयुर्वेद आणि आधुनिक पोषण विज्ञान दोन्ही अंजीर आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे मानतात. नवी दिल्लीतील आहारतज्ज्ञ डॉ. मानसी यादव यांनी जनसत्ताशी बोलताना सांगितले की, अंजीरचे सेवन केल्याने शरीराचा कमकुवतपणा दूर होतो, शरीरातील पोषक तत्वांची कमतरता दूर होते आणि तग धरण्याची क्षमता वाढते. जेव्हा ते दुधासोबत खाल्ले जाते तेव्हा त्याचे फायदे दुप्पट होतात.

जेव्हा अंजीर दुधात उकळले जातात किंवा रात्रभर भिजवले जातात तेव्हा ते पाचक प्रणाली सुधारण्यास, हाडे मजबूत करण्यास, झोपेची गुणवत्ता सुधारण्यास आणि शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यास उपयुक्त ठरते. मात्र, दुधासोबत अंजीर खाणे प्रत्येकासाठी फायद्याचे ठरू शकते का असा प्रश्न निर्माण होतो. मग तज्ज्ञांकडूनच जाणून घेऊया की अंजीर दुधासोबत खाल्ल्याने आरोग्यावर काय परिणाम होतो, ते खाण्याचा योग्य मार्ग कोणता आणि कोणी त्याबाबत सावधगिरी बाळगावी.

**अंजीर आणि दूध**

अंजीरचे दूध म्हणजे अंजीर दुधाबरोबर उकळून पिणे. अंजीर आणि दुधाचे सेवन करणे ही पारंपरिक घरगुती पद्धत आहे. अंजीरमध्ये फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि इतर पोषक द्रव्ये समृद्ध असतात. तसंच दूध प्रोटीन आणि कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत आहे. जेव्हा दोन्ही गोष्टी आहारात एकत्रित येतात तेव्हा शरीराला दुहेरी फायदे मिळतात. दुधासोबत अंजीर घेणे प्रत्येकासाठी फायदेशीर आहे. दूध कॅल्शियम आणि प्रोटीन यांचा स्त्रोत आहे, तर अंजीरमध्ये फायबर आणि इतर पोषक घटक असतात. या दोन्हीचे मिश्रण केल्याने पौष्टिक स्नॅक तयार होऊ शकते.

डायबिटीज आणि अंजीरचे सेवन

डायबिटीज असलेले लोक अंजीर देखील खाऊ शकतात. सुक्या अंजीरमध्ये नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट असतात. म्हणून ते मध्यम प्रमाणात घ्यावे. ओट्स, ओट्सचे जाडे भरडे पीठ किंवा इतर शेंगदाण्यासह मिसळल्यास स्नॅक्सचे पोषण संतुलित होऊ शकते.

**हाडे आणि दात मजबूत होतात**

अंजीर आणि दूध दोन्हीमध्ये कॅल्शियम आढळते, जे हाडे आणि दातांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहे. दुधातील कॅल्शियम आणि अंजीरमध्ये असलेले खनिज संतुलित आहाराचा भाग बनू शकतात.

**बद्धकोष्ठता आणि पचन होण्यास मदत**

सुक्या अंजीरमध्ये आहारातील फायबरची उत्तम मात्रा असते. ती मल मऊ करण्यास आणि आतड्यांसंबंधी नियमित हालचालींना प्रोत्साहित करण्यास मदत करते. पुरेसे पाणी आणि संतुलित आहारासह अंजीरचे सेवन बद्धकोष्ठता ग्रस्त लोकांसाठी उपयुक्त ठरू शकते. दुधामुळे काही लोकांमध्ये पाचक समस्या देखील उद्भवू शकतात.

**शरीराला एनर्जी मिळते**

अंजीरमध्ये नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट असतात. तसंच दुधात प्रोटीन, फॅट आणि कार्बोहायड्रेट असतात. म्हणूनच अंजीरचे दूध पौष्टिक आणि ऊर्जा देणारा स्नॅक्स असू शकतो. याचे सेवन अशक्तपणा दूर करण्यात खूप परिणामकारक ठरते. ज्या लोकांचे वजन वाढत नाही किंवा एखाद्या रोगाचा उपचार समजत नाही त्यांनी अंजीर संतुलित आहाराचा भाग मानणे योग्य आहे.

**हृदयाच्या आरोग्यासाठी**

अंजीरमध्ये पोटॅशियम आणि फायबरसारखे पोषक घटक आढळतात. फायबर समृद्ध आहार हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अंजीरचे दूध थेट हार्ट अटॅक किंवा हृदयाला निरोगी ठेवण्याची खात्री देते असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

**अंजीरचे दूध कसे तयार करायचे?**

२ ते ३ सुके अंजीर घ्या आणि त्यांना चांगले धुवा. एक कप दुधात अंजीर घाला आणि कमी किंवा मध्यम आचेवर काही मिनिटे गरम करा. दूध किंचित थंड करा आणि कोमट असताना त्याचे सेवन करा.

अंजीरमध्ये नैसर्गिक साखर आणि कार्बोहायड्रेट असतात म्हणून डायबिटीज असलेल्या लोकांनी हे प्रमाण लक्षात ठेवले पाहिजे. जास्त अंजीर खाल्ल्याने फायबरमुळे गॅस होऊ शकतो, तसंच लॅक्टोज इनटॉलरन्स असलेल्या लोकांना दुधाचा त्रास होऊ शकतो. याबाबत डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य आहे.

# कान स्वच्छ करताना ....



शरीराची स्वच्छता राखणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच कानांची काळजी घेणे देखील अत्यंत गरजेचे असते. मात्र, कानातील मळ स्वच्छ करताना अनेकदा लोक नकळत अनेक चुका करतात. विचार न करता विविध टोकदार वस्तू कानात घालण्याची सवय अनेकांना असते. तुम्हीही यापैकी एक असाल, तर आजच ही वाईट सवय बदलावी. कारण कानातील मळ चुकीच्या पद्धतीनं काढल्यानं ऐकण्याच्या क्षमतेला धोका निर्माण होऊ शकतो आणि विविध गंभीर समस्या उद्भवू शकतात. कानातला मळ सुरक्षित रितीनं काढण्यासाठी नेहमी कान किंवा नाक-घसा तज्ज्ञांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

टोकदार वस्तूंचा वापर ठरू शकतो धोकादायक

कानातील मळ हा शरीराचा एक नैसर्गिक भाग असून तो कानाचे रक्षण करण्याचे काम करतो. परंतु, जेव्हा यात वाढ होते, तेव्हा तो काढताना अनेक जण हेअर पिन, सेफ्टी पिन, काड्या किंवा इयर बड्सचा सर्रास वापर करतात. कानात अशा प्रकारच्या टोकदार वस्तू घालणे अत्यंत घातक ठरू शकते. यामुळे कानाचा पडदा (एर्ड्रम) डॅमेज होण्याची शक्यता असते, ज्यामुळे कायमस्वरूपी ऐकण्याचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांच्या मते, कानात कोणतीही टोकदार वस्तू घालणे पूर्णपणे टाळले पाहिजे.

मळ काढण्याचे काही सोपे घरगुती उपाय

जर तुम्हाला घरच्या घरी सुरक्षितपणे मळ सैल करायचा असेल, तर खालील काही सोपे उपाय करता येऊ शकतात:

मीठ आणि कोमट पाणी: कानातला मळ काढण्यासाठी ही एक सोपी आणि प्रभावी पद्धत आहे. कान स्वच्छ करण्यासाठी कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ मिसळा. या पाण्यात कापसाचा एक तुकडा भिजवून तो काही वेळ कानात ठेवा. यामुळे कानातील मळ सहजपणे बाहेर येण्यास मदत होते.

कोमट तेलाचा वापर: खोबरेल तेल किंवा बदामाचं तेल थोडे कोमट करा आणि कापसाच्या साहाय्यानं कानात दोन ते तीन थेंब टाका. ते ५ ते १० मिनिटं तसंच राहू द्या. त्यानंतर डोकं एका बाजूला कलवा, ज्यामुळे मळ बाहेर येईल.

वाफ घेणं: एका भांड्यात गरम पाणी घेऊन डोक्यावर टॉवेल झाकून वाफ घ्या. यामुळे कानात साचलेला कडक मळ सैल होऊन बाहेर पडण्यास मदत होते.

हायड्रोजन पेरॉक्साइड: या पद्धतीचा वापर केवळ तज्ज्ञांच्या देखरेखीखालीच करावा. समप्रमाणात पाणी आणि हायड्रोजन पेरॉक्साइड एकत्र मिसळून त्याचे काही थेंब कानात टाकावेत आणि काही वेळानंतर टिश्यू पेपरने कान स्वच्छ करावा.

कान स्वच्छ करताना घ्यायची काळजी आणि खबरदारी जर कानात तीव्र वेदना होत असतील, खाज सुटत असेल किंवा ऐकण्यास त्रास होत असेल, तर स्वतः प्रयोग न करता तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या. इअर स्वॅब्सचा अतिवापर करणे टाळा. क्लिप्स, सेफ्टी पिन किंवा आगकाड्यांचा वापर अजिबात करू नका.तज्ज्ञांच्या मते, कान ही अतिशय संवेदनशील अवयव असून त्याची काळजी घेताना योग्य ती खबरदारी बाळगणे नेहमीच हिवाळ्याच्या किंवा कोणत्याही ऋतूत फायदेशीर ठरते.

# कारल्यासोबत 'या' भाज्या टाळा



कारल्याची भाजी पाहिली की अनेकजण तिच्या कडू चवीमुळे नाक-तोंड मुरडतात; पण चव कडू असली तरी कारले आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक भाजी मानली जाते. कारल्यामध्ये विविध जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स आढळ तात, त्यामुळे आहारात योग्य प्रमाणात कारल्याचा समावेश केल्यास आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.

कारले हे कडू चवीचे असले तरी पोषणमूल्यांच्या बाबतीत अत्यंत समृद्ध भाजी आहे. कारल्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन णब, व्हिटॅमिन अ, फोलेट, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि लोह यांसारखी विविध पोषकतत्त्वे आढळतात. याशिवाय त्यात अँटीऑक्सिडंट्सही असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात. कारल्यातील फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास आणि पोट जास्त वेळ भरलेले राहण्यास मदत करू शकते, त्यामुळे कडू चवीमुळे कारले आवडत नसले तरी त्यातील पोषकतत्त्वांमुळे त्याचा आहारात योग्य प्रमाणात समावेश करणे फायदेशीर ठरू शकते

**कारल्यासोबत कोणत्या भाज्या टाळाव्यात?**

अतितिखट भाज्या ड्ढ मिरची, लाल मिरचीचा भरपूर वापर

कारले स्वतःच कडू आणि काहींना पचायला जड वाटू शकते. त्यासोबत भरपूर हिरवी किंवा लाल मिरची वापरल्यास काही लोकांना छातीत जळजळ, आम्लपित्त किंवा पोटात अस्वस्थता जाणवू शकते.

**जास्त तेलकट बटाट्याची भाजी**

कारले आणि बटाटा एकत्र खाणे विषारी नाही; मात्र बटाट्याची भाजी जास्त तेलात बनवली असेल तर संपूर्ण जेवण जड होऊ शकते, त्यामुळे पचनाचा त्रास होत असल्यास हे संयोजन कमी प्रमाणात घ्यावे.

**फरसबी किंवा इतर जास्त फायबरच्या भाज्या**

कारल्यामध्ये आधीच चांगल्या प्रमाणात फायबर असते. त्यासोबत मोठ्या प्रमाणात फायबरयुक्त भाज्या घेतल्यास संवेदनशील पचनशक्ती असलेल्या व्यक्तींना गॅस, पोट फुगणे किंवा पोटात कुरकुर होऊ शकते.

**फुलकोबी, कोबीसारख्या भाज्या**

या भाज्यांमुळे काही लोकांना नैसर्गिकरित्या गॅस होतो. कारल्यासोबत मोठ्या प्रमाणात खाल्ल्यास हा त्रास अधिक जाणवू शकतो.

कारल्याची भाजी आणि त्यासोबत मोठ्या प्रमाणात कच्चा कांदा, काकडी किंवा इतर सलाड घेतल्यास काही संवेदनशील व्यक्तींना पोट फुगणे किंवा अपचन होऊ शकते, त्यामुळे पचनाचा त्रास होत असल्यास प्रमाण कमी ठेवणे योग्य.

# पावसाळा आणि आरोग्याची काळजी



पावसाळा सुरू झाला की वातावरणात बदल होतो आणि साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वेगाने वाढू लागतो. या दिवसांत दूषित अन्नामुळे किंवा पाण्यामुळे पोट बिघडण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवतात.

अशातच आपल्या मनात हा प्रश्न नक्कीच येतो की, पावसाळ्यात नेमके कोणते पाणी पिणे सुरक्षित ठरते? आरओ चे पाणी की उकळलेले पाणी? चला तर मग जाणून घेऊया याचे योग्य उत्तर.

**आरओ की उकळलेले पाणी: पावसाळ्यात काय ठरते योग्य?**

आरोग्यासाठी फायदेशीर उकळलेले पाणी: आरओ च्या पाण्यामध्ये अनेकदा आवश्यक घटकांची कमतरता असू शकते आणि ते पाण्यातील सर्व विषाणू व जिवाणू पूर्णपणे नष्ट करेलच असे नाही. याउलट, पावसाळ्याच्या दिवसांत उकळलेले पाणी पिणे शरीरासाठी सर्वाधिक सुरक्षित मानले जाते.

पाणी चांगले उकळल्यामुळे त्यातील बहुतांश हानिकारक सूक्ष्मजीव नष्ट होतात आणि विविध आजारांपासून संरक्षण होते.

**दूषित पाण्यामुळे होणारे प्रमुख आजार**

असुरक्षित किंवा दूषित पाणी प्यायल्यामुळे शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात. उकळलेले पाणी प्यायल्याने खालील आजारांपासून बचाव होण्यास मदत होते:

पाण्याचा प्रकार कोणताही असो, आरोग्याच्या दृष्टीने उकळवून थंड केलेले पाणी पिणे नेहमीच गुणकारी ठरते.

पचनक्रिया सुधारते: उकळलेले पाणी प्यायल्याने पोटाचे अनेक विकार आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते.

**वजन नियंत्रण:** हे पाणी शरीराची चयापचय क्रिया सुधारते, ज्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**त्वचेचे आरोग्य:** उकळलेले पाणी शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचेची नैसर्गिक चमक टिकून राहते.


# केसांना तेल लावण्याची योग्य वेळ कोणती?

केसांची निगा राखण्यासाठी तेल लावणे आपल्या घरांमध्ये अनेक वर्षांपासून चालत आलेली पद्धत आहे. आजही अनेकजण केसांना रात्री तेल लावून सकाळी धुतात. मात्र, केसांच्या वाढीसाठी तेल रात्रभर लावून ठेवणे आवश्यक आहे, असे सिद्ध करणारे ठोस वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. तेलाचा फायदा कोणते तेल वापरले जाते, किती प्रमाणात लावले जाते आणि टाळूची स्थिती कशी आहे, यावर अधिक अवलंबून असतो.

बहुतेक लोकांसाठी केस धुण्याच्या ३० मिनिटांपासून काही तास आधी तेल लावणे हा सोपा पर्याय ठरू शकतो. त्यामुळे तेलाला केसांवर पुरेसा वेळ मिळतो आणि रात्रभर तेल लावून ठेवण्याची आवश्यकता राहत नाही.

काही संशोधनांमध्ये नारळाच्या तेलामुळे केसांमधील प्रोटीनचे नुकसान कमी होण्यास मदत होऊ शकते, विशेषतः केस धुण्यापूर्वी ते लावल्यास, असे आढळले आहे. मात्र, याचा अर्थ नारळाचे तेल लावल्याने केस वेगाने वाढतात असा होत नाही. त्याचा मुख्य फायदा केसांचे नुकसान कमी करण्याशी संबंधित आहे. तुम्ही सकाळी किंवा दिवसा केस धुत असाल, तर त्यापूर्वी काही तास तेल लावू शकता. रात्रीभर तेल लावून झोपणे काही लोकांना सोयीचे वाटते, मात्र ते केसांच्या वाढीसाठी आवश्यक असल्याचे ठोस पुरावे नाहीत.

उलट काही जणांच्या टाळूवर जास्त वेळ तेल राहिल्यास चिकटपणा, खाज किंवा त्वचेवर थर जमा होण्यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. सामान्यतः ३० मिनिटांपासून काही तासांपर्यंत तेल ठेवणे पुरेसे असू शकते. केस खूप कोरडे असल्यास त्यांच्या लांबीवर आणि टोकांवर थोडे तेल लावता येते. मात्र, टाळू आधीपासून तेलकट असल्यास तेथे मोठ्या प्रमाणात तेल लावणे टाळावे. केसांच्या निगेसाठी महागडे तेल किंवा उपचार आवश्यकच आहेत असे नाही. केसांना अनुकूल असल्यास साधे नारळाचे तेलही वापरता येऊ शकते. तेल कमी प्रमाणात लावणे आणि केस धुण्यापूर्वी त्याचा वापर करणे महत्त्वाचे आहे.



# नसांमधील साचलेले सर्व घाणेरडे कोलेस्ट्रॉल लोण्यासारखे वितळेल

बदलती जीवनशैली, सतत बाहेरचे पदार्थ खाण्याची सवय आणि व्यायामाचा अभाव यांमुळे सध्या अनेकांना कोलेस्ट्रॉल वाढण्याची समस्या भेडसावत आहे. विशेषतः शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल म्हणजेच एलडीएलचे प्रमाण वाढल्यास हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. मात्र, आहारात काही आरोग्यदायी पदार्थांचा समावेश केल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते. यासाठी सकाळच्या आहारात कोणत्या तीन पेयांचा समावेश करता येईल, हे जाणून घेऊया.

कोलेस्ट्रॉल म्हणजे नेमकं काय?

कोलेस्ट्रॉल हा शरीरासाठी आवश्यक असलेला मेणासारखा, चरबीयुक्त पदार्थ आहे. शरीरातील पेशींची निर्मिती, काही संप्रेरकांची निर्मिती आणि इतर महत्त्वाच्या जैविक प्रक्रियांमध्ये कोलेस्ट्रॉलची भूमिका असते. शरीराला आवश्यक असलेले बहुतांश कोलेस्ट्रॉल यकृत तयार करते. काही प्रमाणात ते आहारातूनही मिळते.

मात्र, रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण गरजेपेक्षा जास्त झाल्यास समस्या निर्माण होऊ शकते. विशेषतः खराब कोलेस्ट्रॉल रक्तवाहिन्यांच्या भिंतींमध्ये जमा होऊन कालांतराने चरबीचा थर म्हणजेच प्लेक तयार करण्यास कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे रक्तप्रवाहावर परिणाम होऊन हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

कोलेस्ट्रॉलचे दोन प्रमुख प्रकार कोणते?

कोलेस्ट्रॉल मुख्यतः एचडीएल आणि एलडीएल या दोन प्रकारांमध्ये विभागले जाते.

एचडीएल म्हणजे चांगले कोलेस्ट्रॉल. हे रक्तातील अतिरिक्त कोलेस्ट्रॉल यकृताकडे नेण्यास मदत करते. त्यामुळे शरीरासाठी योग्य प्रमाणात एचडीएल असणे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

एलडीएल म्हणजे खराब कोलेस्ट्रॉल. याचे प्रमाण वाढल्यास ते रक्तवाहिन्यांच्या भिंतींमध्ये जमा होऊ शकते. परिणामी रक्तवाहिन्या अरुंद होण्याची शक्यता वाढते आणि हृदयविकारासह इतर हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा धोका वाढू शकतो.

म्हणूनच केवळ कोलेस्ट्रॉलचे प्रमाणच नव्हे, तर एचडीएल, एलडीएल आणि इतर रक्तातील चरबीचे घटक यांचाही विचार करणे आवश्यक असते.

कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी 'ही' ३ पेयं ठरू शकतात फायदेशीर

आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांच्या माहितीनुसार, आहारात काही आरोग्यदायी पेयांचा समावेश केल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते. दी इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, त्यांनी कोलेस्ट्रॉलच्या व्यवस्थापनासाठी काही पेयांचा आहारात समावेश करण्याबाबत माहिती दिली आहे.



ग्रीन टीमध्ये कॅटेचिन आणि इतर अँटिऑक्सिडंट घटक आढळतात. हे घटक हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. काही अभ्यासांमध्ये ग्रीन टीचे सेवन एलडीएल आणि एकूण कोलेस्ट्रॉलच्या पातळीत किंचित घट होण्याशी संबंधित असल्याचे आढळले आहे.

दिवसभरात मर्यादित प्रमाणात ग्रीन टी घेता येऊ शकतो. मात्र, त्यात साखर किंवा गोड पदार्थ मोठ्या प्रमाणात मिसळणे टाळावे.

हळदीमध्ये कर्क्युमिन नावाचे सक्रिय संयुग असते. त्यामध्ये दाह कमी करण्यास मदत करणारे गुणधर्म असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. त्यामुळे योग्य आहाराचा भाग म्हणून हळदीचे दूध घेणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते.मात्र, केवळ हळदीचे दूध प्यायल्याने रक्तवाहिन्यांमध्ये जमा झालेला प्लेक नाहीसा होतो किंवा कोलेस्ट्रॉलची समस्या पूर्णपणे दूर होते, असा दावा करणे योग्य नाही.

बीटरूट आणि गाजरामध्ये विविध जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट घटक आणि इतर पोषक घटक असतात. बीटरूटमध्ये नैसर्गिक नायट्रेट्स आढळतात, तर संपूर्ण भाज्यांमधून मिळणारे तंतुमय पदार्थ हृदयासाठी आरोग्यदायी आहाराचा भाग ठरू शकतात.

मात्र, रस काढण्याऐवजी शक्य असल्यास संपूर्ण भाजी किंवा फळ खाल्ल्यास तंतुमय पदार्थ अधिक प्रमाणात मिळतात. रसामध्ये साखर किंवा अतिरिक्त गोड पदार्थ घालणे टाळावे.

फक्त पेयांवर अवलंबून राहू नका!कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी केवळ एखादे पेय पिणे पुरेसे नाही. संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग्य वजन राखणे, धूम्रपान टाळणे आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या औषधांचे नियमित सेवन या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत.



# मुले शाळेत जातात, पण.... ?

डॉ. विवेक कोरडे

स्कूल ठीक करो' अभियानाने देशभरातील सरकारी शाळांचे वास्तव चव्हाट्यावर मांडल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने काही काळापूर्वी सादर केलेल्या 'यूडायस २०२५–२६' अहवालावर पुन्हा विचार करणे गरजेचे आहे. अहवाल प्रथमदर्शनी समाधानकारक वाटतो. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. शिक्षक–षवद्यार्थी गुणोत्तर सुधारले आहे. डिजिटल सुविधा वाढल्या आहेत. माध्यमिक स्तरावरील संक्रमण दर उंचावला आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२०' योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र उभे केले गेले आहे. पण याच अहवालात एक असा आकडा दडलेला आहे, जो भारतीय शिक्षण व्यवस्थेचे बदलते वास्तव उघड करतो. गेल्या दोन वर्षांत सरकारी शाळांमधून तब्बल ८६ लाख विद्यार्थी कमी झाले, तर जवळपास तितकेच विद्यार्थी खासगी विनाअनुदानित शाळांकडे वळले. दुसरीकडे, देशात सुमारे ४,८०० शाळा कमी झाल्या, तरीही एकूण विद्यार्थीसंख्या वाढली. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्राथमिक स्तरावर प्रवेश घेर्णा ?या विद्यार्थ्यांपैकी केवळ ५१.९ टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचतात, तर माध्यमिक स्तरावरील सकल प्रवेश दर (उएठ) अजूनही ७१.७ टक्क्यांवर आहे. याचा अर्थ दहावीच्या वयोगटातील जवळपास दर तीन विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेबाहेर आहे. हे सर्व आकडे एकत्र वाचले, तर प्रश्न पडतो भारतात खरोखर शिक्षण सुधारत आहे का, की आपण फक्त शिक्षणाच्या आकडेवारीत सुधारणा पाहत आहोत?

सरकारच्या दृष्टीने गळतीचे प्रमाण कमी होणे सकारात्मक आहे. ते आहेही. कारण गेली अनेक दशके भारतातील शिक्षण व्यवस्थेची मोठी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणे ही होती. परंतु कोणत्याही आकडेवारीचे मूल्यांकन स्वतंत्रपणे करता येत नाही. ती इतर सामाजिक घडामोडींच्या तुलनेत पाहावी लागते. गळती कमी होत असताना जर सरकारी शाळांमधून ८६ लाख विद्यार्थी कमी होत असतील, तर हा विरोधाभास आहे. विद्यार्थी शिक्षण सोडत नाहीत; ते शिक्षण व्यवस्था बदलत आहेत. याचा अर्थ काय? याचा अर्थ भारतीय पालकांचा विश्वास सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवरून खासगी शिक्षण व्यवस्थेकडे सरकत आहे. हा बदल अचानक झालेला नाही. गेल्या दोन दशकांपासून हळूहळू तयार होत असलेल्या सामाजिक मानसिकतेचा तो परिणाम आहे. आज मध्यमवर्गीय कुटुंब असो किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंब, पालक मुलांना सरकारी शाळेत नव्हे तर खासगी शाळेत घालण्यासाठी कर्ज काढण्यासही तयार आहेत. कारण त्यांच्या मनात एक ठाम समज निर्माण झाला आहे 'चांगले शिक्षण म्हणजे खासगी शिक्षण.' हा समज पूर्णपणे खरा आहे का, हा वेगळा प्रश्न आहे. परंतु धोरणकर्त्यांनी स्वत:ला विचारण्याचा प्रश्न वेगळाच आहे– देशातील नागरिकांचा सरकारी शिक्षणावरील विश्वास का कमी होत आहे? हा प्रश्न यूडायस अहवालापेक्षा मोठा आहे.

**प्रश्न बदलला आहे**

गेल्या तीन दशकांत भारताने प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा (ठऊए), सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना आणि समग्र शिक्षा यांसारख्या उपक्रमांमुळे शाळाबाह्य मुलांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दिशेने देशाने महत्त्वाचे पाऊल टाकले. एकेकाळी 'प्रत्येक मूल शाळेत' हे राष्ट्रीय उद्दिष्ट होते आणि त्यात भारताला मोठ्या प्रमाणात यश मिळाले. मात्र आज भारतीय शिक्षण व्यवस्थेपुढील प्रश्न बदलला आहे. आता विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश मिळवून देणे हे सर्वात मोठे आव्हान राहिलेले नाही; त्यांना माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत टिकवून ठेवणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे खरे राष्ट्रीय आव्हान झाले आहे. याहूनही महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, विद्यार्थी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण करून बाहेर पडतात तेव्हा ते जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम झालेले असतात का? त्यांच्यामध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवादकौशल्ये, समस्यांचे विश्लेषण करण्याची वृत्ती, रोजगारक्षम कौशल्ये आणि संविधानिक मूल्यांची जाणीव विकसित झाली आहे का? या मूलभूत प्रश्नांची उत्तरे केवळ प्रवेशदर, गळती किंवा शिक्षकांची संख्या यांसारख्या प्रशासकीय आकडेवारीतून मिळत नाहीत.

याच ठिकाणी यूडायस अहवालाची मूलभूत मर्यादा स्पष्ट होते. हा अहवाल शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची नोंदणी, शिक्षकांची उपलब्धता, संगणक, इंटरनेट, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर पायाभूत सुविधांचे अत्यंत उपयुक्त व व्यापक चित्र मांडतो. धोरण आखण्यासाठी ही माहिती निश्चितच आवश्यक आहे; परंतु शिक्षणाची खरी गुणवत्ता मोजण्यासाठी ती पुरेशी नाही. कारण हा अहवाल विद्यार्थी किती शिकत आहेत, ते संकल्पना समजून घेऊन वाचतात का, चिकित्सक विचार करतात का, वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करतात का, रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करतात का आणि जबाबदार, संवेदनशील व संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवणारे नागरिक म्हणून घडत आहेत का, याचे उत्तर देत नाही. म्हणूनच यूडायस हा 'स्कुलिंग रीपोर्ट' आहे; 'लर्निंग रीपोर्ट' नाही. तो शिक्षण व्यवस्थेच्या प्रशासकीय स्थितीचे अचूक चित्र मांडतो; मात्र विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेचे, बौद्धिक विकासाचे आणि शिक्षणाच्या वास्तविक परिणामांचे मूल्यांकन करत नाही. आज भारताच्या शिक्षण व्यवस्थेला केवळ शाळांची संख्या किंवा प्रवेशदर वाढविण्यापेक्षा शिकण्याची गुणवत्ता, कौशल्यविकास आणि सार्वजनिक शिक्षणावरील विश्वास वाढविणाऱ्या नव्या मूल्यांकन प्रणालीची अधिक गरज आहे. अशा परिवर्तनाशिवाय कोणतीही सकारात्मक आकडेवारी शिक्षण व्यवस्थेच्या यशाचे अंतिम प्रमाणपत्र ठरू शकत नाही.

**शाळांचे एकत्रीकरण की शिक्षणापासून अंतर?**

यूडायस अहवालात शाळांची संख्या कमी झाल्याचे दिसते. प्रशासन त्याला 'स्कूल रॅशनलायझेशन' म्हणते. शून्य प्रवेश असलेल्या किंवा एकाच शिक्षकावर चालर्णा ?या शाळा एकत्र करणे आर्थिकदृष्ट्या योग्य वाटू शकते. पण शिक्षण हा केवळ आर्थिक विषय नाही. एका डोंगराळ गावातील प्राथमिक शाळा बंद झाली, तर त्या गावातील सहा वर्षांच्या मुलासाठी 'दुसरी शाळा' ही फक्त दोन किलोमीटरवरील इमारत नसते; तर तो शिक्षणापर्यंत पोहोचण्यातील नवा अडथळा असतो. एका मुलीसाठी पाच किलोमीटरचा प्रवास हा केवळ अंतर नसतो; तो अनेकदा शिक्षण सोडण्याचा प्रारंभ असतो. धोरणकर्त्यांनी कार्यक्षमतेचा विचार करायलाच हवा. पण शिक्षणात कार्यक्षमता आणि समता यांचा समतोल राखला नाही, तर आकडेवारी सुधारेल; वास्तव नाही.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० ने शिक्षणाला केवळ परीक्षा, गुण आणि पदवीपुरते मर्यादित न ठेवता कौशल्यविकास, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि जीवनोपयोगी शिक्षणाची नवी दिशा दिली आहे. त्यामुळे यूडायस अहवालातील प्रवेशदर, गळतीतील घट आणि पायाभूत सुविधांमधील सुधारणा या सकारात्मक बाबी असल्या, तरी त्या धोरणाच्या यशाचे अंतिम मोजमाप ठरू शकत नाहीत. शिक्षणाचे खरे यश विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेत, रोजगारक्षम कौशल्यांमध्ये आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाच्या विकासात दिसले पाहिजे. मात्र आजची वस्तुस्थिती काहीशी विरोधाभासी आहे. एका बाजूला सरकार शिक्षणातील प्रगतीची आकडेवारी मांडत असताना, दुर्स ?या बाजूला गेल्या दोन वर्षांत सरकारी शाळांमधून तब्बल ८६ लाख विद्यार्थी खासगी शाळांकडे वळल्याचे वास्तव सार्वजनिक शिक्षणावरील कमी होत चाललेल्या विश्वासाची जाणीव करून देते. यामागे केवळ इंग्रजी माध्यमाचे आकर्षण नसून गुणवत्तेतील असमानता, शिक्षकांची कमतरता, पायाभूत सुविधांतील तफावत आणि सार्वजनिक शिक्षणाविषयी निर्माण झालेली नकारात्मक प्रतिमा ही कारणे आहेत. त्याचवेळी शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेले व्यापारीकरण आणि खासगी शिक्षणाचा विस्तार यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण आर्थिक क्षमतेवर अवलंबून राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे भारतापुढील खरे आव्हान नवीन शाळा उभारण्याचे नसून सरकारी शाळा पुन्हा गुणवत्तेचे, विश्वासाचे आणि सामाजिक समतेचे केंद्र कशा बनतील, हे आहे. कारण कोणत्याही विकसित राष्ट्राची शिक्षणव्यवस्था केवळ खासगी संस्थांवर नव्हे, तर सक्षम आणि विश्वासार्ह सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवरच उभी असते.

यूडायस २०२५–२६ अहवालाने भारतीय शिक्षण व्यवस्थेचे दोन चेहरे आपल्या समोर आणले आहेत. एका चेर्ह ?यावर गळती कमी झाल्याचे, शिक्षक वाढल्याचे आणि पायाभूत सुविधा सुधारल्याचे समाधान आहे; तर दुसऱ्या चेहऱ्यावर सरकारी शाळांमधून ८६ लाख विद्यार्थ्यांचे स्थलांतर, माध्यमिक शिक्षणातील मोठी गळती, गुणवत्तेबाबतची अनिश्चितता आणि सार्वजनिक शिक्षणावरील कमी होत चाललेला विश्वास हे चिंताजनक वास्तव आहे. त्यामुळे आज शिक्षण क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न 'किती विद्यार्थी शाळेत आहेत?' हा राहिलेला नाही. खरा प्रश्न असा आहे की 'ते कोणत्या दर्जाचे शिक्षण घेत आहेत, त्यातून त्यांचे भविष्य घडत आहे का आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्था पुन्हा समाजाच्या विश्वासाचे केंद्र बनत आहे का?' जर या प्रश्नांची उत्तरे अजूनही अनिश्चित असतील, तर आपण यूडायसमधील आकडेवारीचा उत्सव साजरा करावा की भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या भविष्यासाठी आत्मपरीक्षण करावे?

# किडलेल्या यंत्रणेचे वर्तमान

देशभर गाजलेल्या 'नीट'नंतर महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षेचे पेपर फुटले होते. आता त्याच पावलावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पाऊल टाकल्याचे दिसते. आयोगाच्या औषध निरीक्षक, गट–ब पदासाठीचे पेपर प्रेयसीला देण्यासाठी एका महाभागाने फोडल्याने संपूर्ण भरती प्रक्रियाच रद्द करावी लागणे, ही घटना राज्यातील स्पर्धा परीक्षा यंत्रणेच्या गाभ्यालाच हादरवणारी आहे. या प्रकरणात अटक झालेल्या सहा जणांत आयोगाचे तीन अधिकारीही आहेत, यावरून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येते. उपसचिवपदावरील अधिर्का ?याला या प्रकरणात अटक होणे यातून आयोगाची अंतर्गत यंत्रणा किती किडलेली असेल, याचा अंदाज येतो. सुरुवातीला हे प्रकरण एका प्रेमप्रकरणापुरते मर्यादित असल्याचे वाटत होते.

एका प्रियकराने प्रेयसीला परीक्षेत चांगले गुण मिळावे यासाठी आयोगातील कर्मर्चा ?याशी संधान साधून पेपर फोडले. मात्र, पुढे संबंधित तरुणीने नकार दिल्यावर त्यानेच हे प्रकरण उघड केल्याची कथा पुढे आली. पण तपास जसजसा पुढे सरकतो आहे, तसतसे हे प्रकरण केवळ प्रेमकहाणीपुरते मर्यादित नसल्याचे उघड होत आहे. एकाच उमेदवाराला पेपर मिळाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज असला, तरी विरोधी पक्षांतील नेत्यांनी याबाबत केलेले आरोप गंभीर आहेत. या पेपरफुटीत लाखोंची उलाढाल झाल्याचे आरोप आता होत आहेत. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनीही यात आयोगातील व्यक्तीचाच हात असल्याची शंका उघडपणे बोलून दाखवली आहे.




या प्रकरणात राजकीय आरोपप्रत्यारोपांची राळ आता प्रचंड प्रमाणात उडणार असली तरी या गोंधळाचा फटका ज्या निर्दोष परिक्षार्थींना बसला आहे, त्यांच्या भविष्याचे काय? या परीक्षेत उत्तीर्ण होऊन, जुलैमध्ये जवळपास पाचशे उमेदवारांच्या मुलाखती पार पडून तात्पुरती गुणवत्ता यादीही जाहीर झाली होती. आता ती संपूर्ण प्रक्रियाच रद्द ठरवावी लागली.

या देशात अभ्यास, मेहनत, ज्ञान यांना काही किंमत आहे की नाही, हा प्रश्न तरुण पिढीच्या मनात सतत उद्भवू लागला, तर त्याचे देशाच्या भविष्यावरच गंभीर परिणाम होतील.

प्रचंड वाढलेल्या बेरोजगारीतून नोकरीसाठी वाट्टेल ते करायला तयार होणारी ही मानसिकता बदलायची असेल तर प्रचलित शिक्षण व्यवस्थेतच मूलभूत परिवर्तन करणे गरजेचे ठरते.

# पाच्छापूर किल्ला उपेक्षित पराक्रमाची गोष्ट!

उत्तर कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील हुक्केरी तालुक्यात पाच्छापूर हे गाव वसलेले आहे. पाच्छापूर म्हणजे 'पातशहा–पूर' याचा अपभ्रंश! महाराष्ट्रात सुधागडच्या पायथ्यालासुद्धा पाच्छापूर नावाचे गाव आहे. औरंगजेबाचा मुलगा शहजादा अकबर या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांना भेटला म्हणून त्याचे नाव असे पडले. तसाच काहीसा इतिहास कर्नाटकातील या गावाचा असणार. बेळगाव, संकेश्वर आणि गोकाक या तिन्ही शहरांच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या गावात, एका १५० फूट उंच टेकडीवर पाच्छापूरचा दुर्ग उभा आहे. जरी हा किल्ला आज पर्यटनाच्या दृष्टीने दुर्लक्षित असला, तरी उत्तर कर्नाटकातील मराठा साम्राज्य आणि प्रादेशिक सत्तांच्या संघर्षात या



किल्ल्याचे स्थान सैनिकीदृष्ट्या अत्यंत मोक्याचे होते.

या किल्ल्याची मूळ निर्मिती १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात सावनूरच्या नबाबांनी म्हणजेच मियाना घराण्याने केली. आपल्या राज्याच्या उत्तर सीमा सुरक्षित ठेवणे आणि गोकाककडे जाणा ?या व्यापारी मार्गांवर नजर ठेवणे हा यामागील मुख्य हेतू होता. पूर्वी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या गावाला वेढणारी एक दगडी तटबंदी व वेशीचा दरवाजा होता. आज तटबंदी नावाला उरली आहे, पण गावच्या मागच्या बाजूस दरवाजा आजही तग धरून उभा आहे. टेकडीच्या माथ्यावर बालेकिल्ला विस्तारलेला आहे, ज्याला सुरक्षेसाठी ७ मजबूत बुरुज उभारण्यात आले होते. पूर्व दिशेच्या मुख्य महाद्वारावर पौराणिक 'शरभ' आणि कमळाचे सुंदर कोरीव काम आढळते. टेकडीवर खडकात खोदलेली पाण्याची दोन मोठी टाकी आहेत. तसेच उद्ध्वस्त वाडय़ाचे अवशेष पाहायला मिळतात.

पाच्छापूर किल्ल्याचा सर्वात महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा पेशवेकालीन मराठा मोहिमेशी जोडलेला आहे. १७४६ मध्ये चिमाजी अप्पा यांचे सुपुत्र सदाशिवराव भाऊ यांनी महादजी पंत पुरंदरे आणि सखाराम बापू यांच्यासमवेत कर्नाटकात मोहीम आखली.शहर मार्गदर्शक आणि स्थानिक माहिती मिळवणेसावनूरच्या नबाबाने मराठय़ांचे वर्चस्व नाकारल्याने, मराठा सैन्याने नबाबाच्या ताब्यातील एक–एक ठाणे जिंकण्यास सुरुवात केली. ५ डिसेंबर १७४६ रोजी मराठा सैन्याने पाच्छापूर किल्ल्यावर हल्ला करून तो हस्तगत केला. या विजयानंतर नबाबाचा पूर्ण पराभव झाला आणि मराठय़ांनी पाच्छापूर, गोकाक, बदामी, नरगुंद यांसह २२ परगणे (जिल्हे) मराठा साम्राज्यात पुन्हा समाविष्ट केले.इतका ऐतिहासिक व सैनिकी वारसा लाभलेला हा किल्ला आज अत्यंत वाईट अवस्थेत आहे. पुरातत्व खाते आणि स्थानिक प्रशासनाच्या शून्य देखभालीमुळे किल्ल्याची तटबंदी ढासळली असून संपूर्ण टेकडीवर काटेरी झुडपे वाढली आहेत.सर्वात संतापजनक आणि वेदनादायी बाब म्हणजे, स्थानिक गावक ?यांकडून या ऐतिहासिक किल्ल्याच्या मुख्य दरवाजाचा आणि तटबंदीचा वापर सर्रास उघडय़ावर शौचास जाण्यासाठी केला जात आहे. ज्या भूमीवर मराठय़ांचे रक्त सांडले आणि इतिहास घडला, ती जागा आज घाणीचे आणि दुर्गंधीचे साम्राज्य बनली आहे!

# कोवळ्या जिवांचे कोळसे

नुकतेच जन्मलेले कोवळे जीव. त्यांचे डोळे नीट उघडलेही नव्हते. दुनिया म्हणजे असते तरी काय हे समजायच्या आत, कृत्रिम श्वास पुरविणाऱ्या व्हेंटिलेटरमध्ये स्फोट होण्याचे निमित्त झाले. आग लागली. सगळीकडे धूर झाला आणि तीन कोवळ्या जिवांचा खराखुरा श्वास कायमचा शांत झाला. अमरावतीच्या स्त्री रुग्णालयात सोमवारी पहाटे घडलेला हा प्रसंग जेवढा विदारक, तेवढाच वेदनादायी आहे. कुठल्याही सहृदयी व्यक्तीचे मन पिळवटून टाकणारा, अंतर्बाह्य व्यथित करणारा आहे.

राज्यातील सगळ्याच रुग्णालयांना सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आदेश दिले जातील. ते नंतर सोयीस्कररीत्या दुर्लक्षितही केले जातील. पुन्हा कुठली तरी भयंकर घटना घडत नाही तोवर त्या अहवालांचे स्मरणही होणार नाही. स्मरण आणि विस्मरणाच्या पाळण्यात हेलकावणारी व्यवस्था जोवर स्थिर होत नाही, कठोर होत नाही, जबाबदार होत नाही, तोवर नव्याने जन्माला आलेले नवे नियम, अटी सगळे व्यवस्थेच्या व्हेंटिलेटरवरच कृत्रिम श्वास घेत तडफडत असतील. अशाने पाळण्याचा स्पर्शही न अनुभवलेल्या आणि काचेच्या पेटीतच आयुष्याची अखेर झालेल्या जिवांना न्याय कसा मिळेल? ही भयंकर घटना 'दुर्घटना' ठरवून कुणाला तरी सोडविण्याचा प्रयत्न केला, तर त्या नवजातांच्या मायबापांच्या डोळ्यांतून सातत्याने ओघळर्णा ?या अश्रूंशी प्रतारणा ठरेल.

नियम बाजूला ठेवून रुग्णालये चालविणे हे आगीशी खेळण्यापेक्षा कमी घातक नव्हे; पण हा खेळ वारंवार खेळला जातो. दर वेळी कुठले तरी कारण घडते आणि आग लागते. त्यावर उपाय शोधेपर्यंत दुसरे कारण घडते. हे आपल्याकडेच घडते असे नाही.



तमिळनाडूतील अठ्ठावीस, भुवनेश्वरचे बावीस, मुंबईतील आठ मृत्यू अजून विस्मृतीत गेलेले नाहीत. विदर्भातील भंर्डा ?यात काही वर्षांपूर्वी दहा चिमकुले भाजून मृत्युमुखी पडले तेव्हा आरोग्य विभाग हादरला होता. त्यांनी वेगवेगळ्या सुधारणा केल्या खऱ्या; मात्र तिथे अजूनही पूर्णवेळ अग्निसुरक्षा अधिकारी नाही. नागपूरचे अधिकारी अधूनमधून तिकडे जाऊन सुरक्षासोयींची पाहणी करतात.

नागपुरातील 'वेलट्रीट'ने प्रमुख परवानग्यांशिवाय थाटलेल्या रुग्णालयात आग लागली तेव्हा, ती विझविण्यासाठी जावे असा मार्गच अग्निशमन पथकाला सापडत नव्हता. त्या आगीत चौघांच्या आयुष्याचा कोळसा झाला. ज्या अमरावतीत सोमवारी तीन बालके दगावली, त्याच शहरातील एका दुर्स ?या रुग्णालयात नऊ वर्षांपूर्वी आग लागून चार रुग्णांना जीव गमवावे लागले होते. इतक्या घटना घडूनसुद्धा कुठलीच ठोस यंत्रणा विकसित होत नाही हे खरे दुर्दैव आहे.

आग भडकल्यावर ती शांत करणे ही अग्निसुरक्षा नव्हे; ती लागूच नये म्हणून प्रयत्न करणे, लागल्यास पसरण्यापासून रोखणे, रुग्णांना सुरक्षित बाहेर काढणे ही खरी सुरक्षा. अमरावतीत परिचारिका आणि डॉक्टरांनी जिवावर उदार होऊन काही मुलांना आगीतून बाहेर काढले. ते कौतुकास्पद. मात्र, अशी वेळच येऊ नये म्हणून केलेले प्रयत्न अधिक कौतुकास्पद ठरतील. त्यासाठी राज्यातील प्रत्येक रुग्णालयाचे अग्निशमन आणि वीजव्यवस्था अंकेक्षण व्हावे, काही त्रुटी आढळल्या तर त्या निश्चित कालावधीत दूर व्हाव्यात. आयसीयू, एनआयसीयू, ऑपरेशन थिएटर अशी संवेदनशील ठिकाणे 'हाय रिस्क झोन' म्हणून विकसित व्हावीत. त्यांच्यासाठी विशेष सुरक्षा 'प्रोटोकॉल' असावा.

सुरक्षेची प्रमाणपत्रे, देखभाल, वायरींची तपासणी, धूरशोधक यंत्रणा, अलार्म, आपत्कालीन स्थलांतराची व्यवस्था या सगळ्या बाबी अनिवार्य व्हायला हव्यात. दर्जेदार यंत्रांची खरेदी, त्यांची नियमित तपासणी करण्याची काळजी घ्यावी. कारण रुग्णालय ही इमारत नसते. ते जीवनदायी उपचार केंद्र असते. कुठलेही आईबाप आपल्या मुलाला विश्वासाने रुग्णालयात नेतात. पोटचा गोळा 'देवदूता'च्या हाती सोपवितात आणि निश्चिंत होतात.

मात्र अशा घटनांमुळे विश्वासाला आग लागते, पोटच्या गोळ्याच्या हकनाक जाण्याचे चटके आयुष्यभर बसतात. बाळ गमावलेल्यांची मानसिक अवस्था काय असेल याची कल्पनाही करवत नाही.

अशा घटनांनी समाज सुन्न होतो. रुग्णालयांना आपण उपचाराची केंद्रे समजत असू, तर ते मृत्यूचे सापळे बनू नयेत ही काळजी घ्यावी लागेल. कोवळ्या जिवांचे होणारे कोळसे कुणालाच परवडणारे नाहीत!